# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**तृतीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (V)**

**जनरल पेपर POL ३५३ (SPl-४) ३५११७**

**आधुनिक राजकीय विश्लेषण**

## Modern Political Analysis

**तृतीय वर्ष कला प्रथम सत्र- V**

**राज्यशास्त्र- जून २००९**

**(सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)**

**तृतीय वर्ष कला प्रथम सत्र- V**

**१) राजकीय विश्लेषण**

- राजकीय विश्लेषण अर्थ आणि स्वरूप
- परंपरागत राजकीय विश्लेषण ऱ्हास
- आधुनिक राजकीय विश्लेषण उदय
- मूल्यमापन

**२) राजकीय व्यवस्था**

- राजकीय व्यवस्था अर्थ, व्याख्या आणि व्याप्ती
- व्यवस्था दृष्टिकोन- आदान-प्रदान प्रक्रिया
- रचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन
- राजकीय व्यवस्थेची क
- मूल्यमापन

**३) राजकीय संस्कृती-**

- राजकीय संस्कृती अर्थ, व्याख्या, स्वरूप आणि महत्त्व
- राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक
- राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण
- राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे घटक
- मूल्यमापन

**४) राजकीय सामाजिकरण**

- राजकीय सामाजिकरण-अर्थ, व्याख्या, स्वरूप, आणि महत्त्व
- राजकीय सामाजिकरण घडविणारी माध्यमे
- राजकीय सामाजिकरण  आणि राजकीय व्यवस्था
- राजकीय सामाजिकरण आणि राजकीय संस्कृती
- मूल्यमापन

# आधुनिक राजकिय विश्लेषण- S4
## प्रकरण- १ ले
## राजकिय विश्लेषण अर्थ व स्वरूप

**प्र.१ला. पारंपरिक राजकीय विश्लेषणाचाअर्थ, स्वरूप, वैशिष्टये आणि मर्यादा सांगा?**

१९५३ साली डेव्हिड ईस्टनने The Political System हा ग्रंथ प्रकाशित करून राजकिय विचारवंतामध्ये खळबळ उडवून दिली आणि राज्यशास्त्रात आधुनिक पर्व सुरू केले. म्हणून डेव्हिड ईस्टनला आधुनिक राज्यशास्त्राचा जनक म्हटले जाते. विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळी आणि विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात राज्यशास्त्रीय अध्ययनात नव्या नव्या प्रवाहाचा उदय झालेला आहे. या नव्या प्रवाहाच्या स्वागतासाठी जगभरात राज्यशास्त्रातील फळी पुढे येऊ लागली. यापैकी अनेकांनी पारंपरिक राज्यशास्त्र त्याज्य मानले. राज्यशास्त्रीय चिंतनाच्या पारंपरिक वारशाला नाकारून ती परंपरा कवडीमोल ठरविली. पारंपरिक राज्यशास्त्रास अशास्त्रीय मानून राज्यशास्त्राची नव्याने मांडणी सुरू केली. त्यासाठी नवे नवे सिद्धांत आणि संकल्पनाचा वापर राज्यशास्त्र होऊ लागला. या आधुनिक राजकीय चिंतन आणि विवेचनाला आधुनिक राजकीय विश्लेषण म्हटले जाऊ लागले. या काळात नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रापासून तंत्रे आणि सिद्धांत स्वीकारल्यामुळे राज्यशास्त्र हे अधिक शास्त्रीय बनले आहे, असा दावा आधुनिक राजकीय विश्लेषक करत आहेत.

**परंपरागत राजकिय विश्लेषण अर्थ व स्वरूप -**

राज्यशास्त्राच्या निर्मितीपासून ते दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या अडिच हजार वर्षाच्या विश्लेषणास पारंपारिक राजकिय विश्लेषण असे म्हणतात. राज्यशास्त्र शब्दाला इंग्रजीत Politics असे म्हणतात. या संज्ञेचा जन्म Polis या ग्रीक शब्दापासून झालेला आहे. त्याचा मूळ अर्थ "शहराच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेला किल्ला" असा आहे. नंतरच्या काळात Polis शब्दाला विशेष अर्थ प्राप्त झाला. "स्वयंपूर्ण नगरामध्ये स्वतःचे संरक्षण करू शकणारा, नियंत्रित श्रमविभाजन साधणारा आणि आपल्या विविध घटकामध्ये व्यवस्थित संबंध प्रस्थापित करणारा समाज" हा अर्थ लागला जाऊ लागला. राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटलच्या यांनी आपल्या ग्रंथाला Politics नाव दिल्यामुळे 'राज्यकारभाराचे शास्त्र' म्हणून पॉलिटिक्स हा शब्द प्रचलित झाला. ॲरिस्टॉटलने १५८ नगरराज्याचा तुलनात्मक अभ्यास करून ही संज्ञा मांडली. मात्र त्यानी Politics या संकल्पना विचार नगरराज्यापुरता केला होता. नगरराज्याच्या व्यवहाराचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय अशी राज्यशास्त्राची व्याख्या केली जाऊ लागली. राजकारण आणि राज्यशास्त्र या दोन्ही अर्थाने पॉलिटिक्स ही संज्ञा बरीच वर्ष वापरली जात होती. पुढे राज्यशास्त्रासाठी पोलिटिकल सायन्स ही संज्ञा रूढ झाली. ग्रीक नगरराज्यांच्या ऱ्हासानंतर मोठमोठी साम्राज्ये निर्माण झाली. राज्याच्या भौगालिक सीमा व लोकसंख्या वाढत गेल्यामुळे स्वयंपूर्ण नगरराज्याची संकल्पना मागे पडली. युरोपातील प्रबोधन युग आणि औद्योगिक क्रांतीमुळे सामान्य माणसांचा राज्यकारभारात सहभाग वाढत गेल्यामुळे राज्यांना राष्ट्र-राज्याचा संदर्भ प्राप्त होऊ लागला. राज्यसंस्थेची संकल्पना ग्रीक नगरराज्यापेक्षा संपूर्णतः वेगळी व व्यापक होती. राज्य संकल्पनेस कायद्यासाठी समान भूप्रदेशात सुसंघटित झालेले लोक या अर्थाने ही संकल्पना वापरली जाऊ लागली. पहिल्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर घडलेल्या घडामोडीमुळे राष्ट्र राज्यांची संकल्पना अपुरी वाटू लागली. आधुनिक काळात जागतिक सरकार स्थापना करण्याच्या दृष्टीने काही संघटनात्मक प्रयत्न सुरू झाले. राष्ट्रीय निष्ठा आणि आणि राष्ट्रीय सीमांतर्गत परिस्थितीच्या संदर्भात केला जाणारा राजकीय विचार अपुरा किंवा कालबाहय मानला जाऊ लागल. त्यामुळे राज्यशास्त्राचा अभ्यास राष्ट्रराज्या पुरता मर्यादित न राहता त्यास आंतरराष्ट्रीय संस्थाचा अभ्यास होऊ लागला. या बदलत्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्राने नव्या संकल्पना शोधल्या पाहिजेत. आपल्या अभ्यासविषयाला नवे वळण दिले पाहिजे अशी जाणीव त्याक्षेत्रात कार्यरत अध्यापन आणि संशोधकांना झाली. पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाबद्दल असमाधानी असलेल्या अभ्यासकांनी आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या उदयाला कारणीभूत झालेले दिसतात.

पारंपरिक राज्यशास्त्र राज्य आणि त्यांच्या विविध अंगाचा अभ्यास हा मुख्य विषय होता.पारंपरिक राज्यशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. **ब्लंटश्ली-** यांच्यामते, राज्याच्या मूलभूत स्वरूपाचे, घटकाचे, व्यक्त स्वरूपाचे आणि विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.
२. **पोलॉक-** राज्याच्या स्वरूपाचे, विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.
३. **आर.जी.गेटेल-** यांच्यामते, भूतकालीन, वर्तमानकालीन व भविष्याकालीन राज्यसंस्था, राजकीय संघटना व राजकीय कार्य, त्याचप्रमाणे राजकीय संस्था व राजकीय सिद्धांत यांचा अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र होय.

**पारंपरिक राज्यशास्त्र अभ्यासाची व्याप्ती-**

वरील व्याख्याचा विचार केल्यास पारंपरिक राज्यशास्त्राचा राज्य हा मुख्य अभ्यासाचा विषय होता. परंपरागत राज्यशास्त्रीय लेखन राज्य संकल्पने भोवती केंद्रीत झालेले दिसते. या लेखनाचे अध्ययन करून पारंपरिक राज्यशास्त्राची व्याप्तीत पुढील अभ्यास विषयाचा समावेश होता.

१. राज्याची निर्मिती, उत्पत्ती, विकास, स्वरूप यांचे अध्ययन पारंपरिक राज्यशास्त्रात केले जात असे.
२. पारंपरिक राज्यशास्त्रात राज्याच्या उदय व उगमासंबंधी मांडलेल्या सिद्धांताचा अभ्यास अभिप्रेत होता.
३. राज्याच्या विविध अंगाचा अभ्यास केला जात होता.
४. पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात राज्याचे कार्यक्षेत्र व त्यासंबंधी सिद्धांताचे अध्ययनाला प्रमुख स्थान होते.
५. राज्य व्यवस्थेचे नियंत्रण करणाऱ्या शासन संस्थेच्या विविध घटकाचा त्यात वैधानिक, कार्यकारी आणि न्यायालयीन संस्था व कार्यपध्दतीचा अभ्यास होत असे.
६. राजकीय व्यवहारातील मूलभूत संकल्पना सार्वभौम व विधिनियम कायदा, कायद्याचे अधिराज्य इत्यादी संकल्पनाचा अभ्यास केला जात होता.
७. लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, फॅसिझम इत्यादी महत्त्वपूर्ण विविध राजकीय तत्वप्रणालीचा उदय, विकास, महत्त्व आणि त्यातील मर्यादाचे अध्ययन केले जात होते.
८. राज्याच्या घटनात्मक व्यवहाराचा अभ्यास त्याप्रमाणे राजकीय संस्था व संघटनाचा व्यावहारिक कार्यपध्दतीचा अभ्यास केला जात असे.

पारंपरिक राज्यशास्त्राच्या व्याप्तीत राज्य संकल्पनेच्या संबंधित विविध संकल्पनाचा समावेश दिसतो. कारण पारंपरिक राज्यशास्त्राचा राज्य हा प्रमुख विषय होता.

**पारंपरिक राज्यशास्त्र अभ्यासाचे स्वरूप व वैशिष्टये-**

**१. अध्ययन राज्यकेंद्री-** पारंपरिक अभ्यासात राज्य ही संकल्पना अभ्यासात केंद्रबिंदु मानलेली आहे. पारंपरिक राज्यशास्त्रातील सर्व ग्रंथ राज्याची उत्पत्ती, कार्यक्षेत्र, व्याप्ती, मर्यादा हा राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा मध्यवर्ती गाभा होता. राज्य संस्थेला सर्वोच्च स्थान प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने बहुसंख्य पारंपरिक राज्यशास्त्रज्ञांनी लेखन केलेले दिसते. बहुसंख्य राज्यशास्त्रज्ञ राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे असे मानत आलेले आहेत. त्यामुळे पारंपरिक राज्यशास्त्राचा राज्य हा आत्मा राहिलेला दिसतो.

**२. तत्त्वज्ञानाला प्राधान्य-** पारंपरिक राजकीय अभ्यासकांनी सामान्य गृहिताच्या आधारावर आपल्या विचाराची मांडणी केली आहे. काही गृहिते भूतकाळातील नगरराज्य, वर्तमान काळातील राष्ट्रराज्य आणि भविष्यातील विश्वराज्य यांच्या निर्मिती संबंधी असल्यामुळे पारंपरिक अभ्यासकांनी त्या आधारावर राज्यशास्त्राचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. विगमनात्मक आणि निगमनात्मक पद्धतीने राज्यशास्त्राची मांडणी करण्याच्या प्रयत्न करणाऱ्या राज्यशास्त्रज्ञांनी तत्त्वज्ञानाला राज्यशास्त्राच्या अभ्यासात मध्यवर्ती स्थान दिलेले दिसते. सर्वच विचारवंताचा प्रयत्न आदर्श राज्याची निर्मिती करण्यासाठी आवश्यक कार्यक्रम आणि मूल्यांची मांडणी करण्यासाठी खर्च झालेली दिसतात.

३. **पारंपरिक विवेचनाची बैठक अशास्त्रीय-** पारंपरिक राज्यशास्त्राच्या बैठकीवर इतिहास, कायदा व तत्त्वज्ञान इत्यादीचा खूप प्रभाव दिसून येता. आधुनिक काळात हे दृष्टिकोन शास्त्रीय मानले जात नाहीत. उदा. प्लेटोचे आदर्श राज्य संकल्पना पारंपरिक राज्यशास्त्रज्ञांनी शब्दप्रामाण्य आणि ग्रंथप्रामाण्याला महत्त्व दिले. पारंपरिक मताची चिकित्सा न करता स्वीकार केला उदा. सॉक्रेटिसचा ज्ञान म्हणजे सद्‌गुण या मताच्या आधारावर प्लेटो आणि ॲरिस्टॉटलने विचारांची ईमारत उभी केली. त्यामुळे पारंपारिक राज्यशास्त्रातील लेखन आधुनिक काळात अशास्त्रीय मानले गेले.

४. **इतिहासाला प्राधान्य-** भूतकाळातील इतिहासाच्या आधारावर माहिती मिळवून राजकीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न पारंपरिक राज्यशास्त्रात झालेला दिसतो. ऐतिहासिक घटना व अनुभवाच्या आधारावर मानवाच्या राजकीय व्यवहाराचे अध्ययन करण्यात आले आणि त्या अध्ययनातून हाती आलेल्या सामान्य निष्कर्षाच्या आधारावर सिद्धांत मांडणी करण्यात आली. उदा. कार्ल मार्क्सने इतिहासाच्या आधारावर राजकीय सिद्धांत मांडलेले दिसतात. ऐतिहासिक आधारावर सिद्धांत मांडणी मोठया प्रमाणावर झाल्यामुळे वास्तवतेकडे दुर्लक्ष झाले. इतिहासातील अनेक गोष्टींची चिकित्सा न करता स्वीकारण्यात आल्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासात वास्तवतावादा उरला नाही.

५. **कायदयाला महत्व-** राज्याचा मुख्य आधार कायदा असतो. राज्याच्या राजकीय व्यवहारात कायदयाला महत्व असते. त्यामुळे पारंपरिक राजकीय विश्लेषणाच्या अभ्यासात कायदयाच्या अभ्यासावर भर दिला गेला. एखादया देशाचा अभ्यास करतांना त्या देशाच्या संविधान, प्रथा, परंपरा, कायदे व न्यायालयीन निर्णय याचा अभ्यास केला जाऊ लागला. उदा. इंग्लंडच्या कायद्याचे अधिराज्य संकल्पनेचा अभ्यास डायसीचा लॉ ऑफ दि कॉन्स्टिटयुशन हा ग्रंथ कायद्याच्या औपचारिक अभ्यासाला महत्त्व दिल्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासात अनौपचारिक अभ्यासाकडे दुर्लक्ष केले. औपचारिक घटकाच्या अभ्यासामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाला गतिहीनता प्राप्त झाली.

पारंपरिक राज्याच्या स्वरूप आणि वैशिष्टयांचा विचार करता राज्य अभ्यासाला मध्यवर्ती स्थान, तत्त्वज्ञानाचा अतिरेक, इतिहासाचा अतिआधार, कायद्याच्या अभ्यासावर भर इत्यादी प्रमुख गोष्टींचा समावेश होता.

**टिप- पारंपरिक विश्लेषणाच्या मर्यादा, ऱ्हास, दोष व मूल्यमापन**

दुसऱ्या महायुद्धानंतर राज्यशास्त्रात नवीन नवीन संकल्पना व विचार मांडण्यास सुरूवात झाली. पारंपरिक राज्यशास्त्र परंपरेची चिकित्सा करून ती दोषपूर्ण आणि अशास्त्रीय असल्याचे आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी जाहीर केले. ईस्टन व कॉर्बनने राजकीय तत्त्वज्ञान व त्यावर आधारलेल्या राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाल्याचे जाहीर केले. आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी पारंपरिक राज्यशास्त्रात पुढील मर्यादा व दोष सांगितलेले आहेत.

१. **मर्यादित अभ्यास -** पारंपरिक राज्यशास्त्रात राज्याची निर्मिती, रचना व कार्य यांच्या अभ्यास केला जात असे. आधुनिक विचारवंताच्या मते हा दृष्टिकोन मर्यादित व अपुरा आहे. राज्यशास्त्र म्हणजे राजकीय व्यवस्थेचा अभ्यास होय. त्यातील राज्य ही एक व्यवस्था आहे. प्रत्येक व्यवस्थेला विशिष्ट अशी पार्श्वभूमी असते. व्यवस्था आणि पार्श्वभूमी यात सुसंगती आवश्यक असते तरच व्यवस्था टिकते. व्यवस्थेत विसंगती निर्माण झाल्यास तिचे विघटन होते. तसेच प्रत्येक व्यवस्थेत दुय्यम व्यवस्था व रचना असतात. प्रत्येक रचनेत काही घटक असतात. हे घटक विशिष्ट कार्य करतात. अशी व्यवस्थेची अंर्तगत रचना असते. ती परिस्थितीच्या सदंर्भात कार्य करते. या अर्थाने राज्य संस्थेचा अभ्यास पारंपरिक राज्यशास्त्रज्ञांनी केला नाही. राज्याचे उदय, स्वरूप, कार्य, राज्य निर्मितीचे सिद्धांत या पुरते राज्यशास्त्राचा अभ्यास मर्यादित राहिल्यामुळे पारंपरिक राज्यशास्त्र मर्यादित अभ्यासावर भर देतो ही टिका केली जाते.

२. **शास्त्रीय दर्जा कमी-** आधुनिक विश्लेषकांच्या मते नैसर्गिक शास्त्रासारखी निश्चितता व प्रयोगक्षमता राज्यशास्त्रात नाही. तसेच सर्व सामाजिक शास्त्र एकाच मापाने मोजता येत नाही. अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र ही प्रमुख सामाजिक शास्त्र असले तरी अर्थशास्त्र राज्यशास्त्रापेक्षा जास्त निश्चित आहे. कारण आर्थिक व्यवहाराचे सांख्यिकीकरण व यांत्रिकीकरण करता येते. पण पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात मूल्ये व आदर्श यांच्या अध्ययनावर जास्त भर दिल्यामुळे राज्यशास्त्राला शास्त्रीय दर्जा टिकवून ठेवता आला नाही. मूल्याचे अध्ययनातील महत्व कमी

केल्याशिवाय आणि वस्तुनिष्ठ अभ्यास दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय राज्यशास्त्राला शास्त्रीयता मिळू शकत नाही ही उणीव पारंपरिक राज्यशास्त्रात असल्यामुळे राज्यशास्त्राचा ऱ्हास झाला अशी टीका केली जाते.

३. **आंतरशास्त्रीय दृष्टीकोनाचा अभाव-** सामाजिक शास्त्रे मानवाच्या सामाजिक व्यवहाराच्या विविध अंगाचा अभ्यास करतात. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र हे अभ्यास विषय मूलत: एकच आहेत. अर्थशास्त्र आर्थिक व्यवहाराचे तर राज्यशास्त्र राजकिय व्यवहाराचा अभ्यास करतात. तरी देखील या व्यवहाराची परस्परापासून फारकत करता येत नाही. म्हणून कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास करतांना इतर सामाजिक शास्त्राची मदत घेतली जावी त्या शिवाय कोणत्याही घटनेचे सखोल अध्ययन करता येणार नाही. या आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव पारंपरिक राज्यशास्त्राचे असल्यामुळे शास्त्रीय दर्जा कमी झाला असे आधुनिक राज्यशास्त्रज्ञांना वाटते.

**४. मर्यादित तंत्राचा वापर-** आधुनिक राजकीय विश्लेषण नैसर्गिकशास्त्रातील आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन नवीन तंत्राचा वापर राज्यशास्त्राच्या अभ्यासात केला जात आहे. मात्र पारंपारिक राज्यशास्त्रात इतिहास, कायदा व तत्वज्ञानाच्या अभ्यासावर अतिभर दिल्यामुळे राज्यशास्त्र अभ्यासाला शास्त्रीयता मिळू शकली नाही. संख्याशास्त्राच्या वापराचा अभाव, मूल्यमुक्त संशोधन आणि नव्या अध्ययनपदधतीच्या अभावामुळे इतर सामाजिक शास्त्रापेक्षा राज्यशास्त्राच्या अभ्यासाची कमी महत्त्व मिळाले.

**५. मूल्यप्राधान्य व नैतिकतेवर भर-** पारंपरिक राज्यशास्त्रात निव्वळ राजकीय आदर्शाचे अभिप्राय नाहीत तर त्यांची तर्कशास्त्रीय विश्लेषणेही मांडलेली आहेत. या अभिप्रायाचे आधार व स्पष्टीकरणाचा यांचाही ऊहापोह असल्यामुळे पारंपारिक राज्यशास्त्रात मूल्यगर्भितता अटक होती. राज्यशास्त्राचा ऐतिहासिक विकासक्रम त्याची संस्थात्मक गोवणूक आणि लोकांच्या अपेक्षा या सर्वांच्या परिणामस्वरूप राज्यशास्त्र आदर्शात्मक बनले. राज्यशास्त्राच्या आदर्शात्मक दृष्टिकोनाचा विचार नैतिक तत्त्वज्ञानाचा किंवा सामाजिक नीतिशास्त्राचा एक भाग म्हणून केलेला आहे. राजकीय समाजाचे नैतिकीकरण करण्याच्या नादात पारंपरिक राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय सत्तेमागे पारलौकिक अधिष्ठाने उभी करण्याचा अशास्त्रीय प्रयत्नही केलेला आहे. उदा. हेगेलने राज्यसंस्थेचे केलेले दैवतीकरण

**प्र. २ रा. पारंपारिक राज्यशास्त्र स्वरुप आणि दृष्टीकोन वा अभ्यासपदधती स्पष्ट करा?**

विविध अभ्यासकांनी राज्यशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळया अभ्यासपद्धती आणि दृष्टिकोनाचा वापर केलेला दिसतो. या विषयाची मूलतत्त्वे, आशय व उद्दिष्टे याविषयीच्या अभ्यासकांच्या धारणाच्या अनुसरून त्यांनी आपआपले दृष्टिकोन मांडलेले आहेत. पारंपारिक दृष्टिकोनाची भिस्त इतिहास, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान व विधिशास्त्रावर विशेष दिसून येते.

१. **तत्वज्ञानविषयक दृष्टिकोन-** (Philosophical Approach) प्रबोधन काळापूर्वी राज्यशास्त्रात तत्वज्ञानविषयक दृष्टिकोनाला कमालीचे महत्व होते. निगमन पद्धतीने राज्यशास्त्राची मांडणी हे या दृष्टिकोनाचे वैशिष्टये होते. निगमन पद्धतीचा भर अनुभवपूर्व विचारावर होतो. प्लेटो, रूसो यांच्या पासून कांट व मिल या सर्व तत्वचिंतकानी या दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. या दृष्टिकोनानुसार तथ्याकडून सिद्धांताकडे जाण्याऐवजी राज्याच्या स्वरूपासंबंधी किंवा प्रत्यक्ष अनुभवावर स्वीकार केलेल्या गृहितापासून सुरूवात करून प्रत्यक्षात निर्माण करता येतील असा संस्था निर्मितीचा प्रयत्न केला जातो. राजकीय संस्थाचे मूल्यमापन नैतिक व तत्त्वज्ञानात्मक संकल्पनाच्या आधार केले जाते. या निकषाच्या आधारावर राज्यसंस्थेची साध्येही निर्धारित केली जात असत. या दृष्टिकोनावर नैतिकता, आदर्श, धर्म या गोष्टीचा प्रभाव होता. या दृष्टिकोनात काही ग्रंथातील विधाने वा विद्ववानाची मते अचिकित्सक पणे स्वीकारलेली आहेत. त्यांचे निष्कर्ष बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीला न टाकता वर्षानुवर्ष प्रमाण मानले गेले. उदा. प्लेटोच्या रिपब्लीक ग्रंथात आदर्श राज्याचे रेखाटलेले चित्र या दृष्टिकोनातील सिद्धांत केवळ कल्पनेवर आधारलेले आहेत. वैज्ञानिक निकषावर टिकणारे नाहीत. प्रबोधन काळात विज्ञानाचा उदय झाल्यावर निगमन तत्वावर आधारलेले सिद्धांत शास्त्रीय निकषावर तपासले जाऊ लागले. शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य ताज्य ठरले. ज्यांचे प्रामाण्य सिद्ध करता येईल, प्रयोग करता येईल अशी विधाने सत्य मानली गेली. विज्ञानाची प्रगती झाल्यामुळे अपुऱ्याज्ञानावर आधारित गैरसमज गळून पडले. नव्या ज्ञानाचा वापर करुन जुन्या तत्त्वाची फेरतपासणी

झाली. म्हणून आधुनिक काळात तत्वज्ञान विषयक दृष्टिकोन कालबाहय मानला जाऊ लागला. पण अलीकडच्या काळात तत्त्वज्ञानविषयक दृष्टिकोनाचे लिओ स्ट्राऊस हे कट्टर समर्थक मानले जातात. त्यांच्यामते राजकीय सिद्धात व राजकीय तत्त्वज्ञान या दोहांच्या समन्वयातून राजकीय विचार उत्पन्न होत असतात. त्यामुळे राज्यशास्त्राला मूल्याचा आधार घ्यावा लागत असल्यामुळे राजकीय तत्त्वज्ञान कधीच कालबाहय होऊ शकत नाही. इष्टानिष्टतेचा विचार हीच राजकीय कृतीमागील प्रमुख प्रेरणा असते. म्हणून हा दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या कक्षेतून कधीच वगळता येणार नाही.

२. **ऐतिहासिक दृष्टिकोन- (Historical Approach)** इतिहास हा पारंपरिक राजकीय विश्लेषणाचा दुसरा प्रमुख आधारस्तंभ आहे. या दृष्टिकोनाचा आधार घेणाऱ्या विचारवंतांनी इतिहासामधून राजकीय संस्थासंबंधीची माहिती मिळवून राजकीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. इतिहास ही सर्व सामाजिक शाळाची प्रयोगशाळा मानली जाते. राज्यशास्त्रात जे प्रयोग होतात. त्यांचा आधार इतिहास होय. प्रत्येक प्रयोग, प्रत्येक सरकार वा युद्ध हा एक प्रकारचा प्रयोग असतो. प्रा.लास्कीच्या मते राज्याच्या इतिहासात जे काही अनुभव जमा होतात त्यांना एकत्र करण्याचे कार्य राज्यसत्तेने केले पाहिजे. कारण राजकिय संस्था उदय पावतात, विकसित होतातआणि लोप पावतात. राजकिय संस्था इतिहासाचे अपत्य आहेत. उदा. साम्यवाद निर्माण होण्यामागे भांडवलशाहीने समाजाचे केलेले शोषण होय. जगात ज्या ज्या क्रांत्या झाल्या त्या मागे सत्तेचे कारण मूलभूत होते. रूढी, परंपरा, चालीरिती या इतिहासाचे अपत्य होय. ऐतिहासिक अनुभवाच्या आधारावर मानवी व्यवहाराचे विवेचन करता येते. राजकीय संस्थाच्या कार्यपद्धतीबाबत आखाडे बांधता येतात. या आखाडयांमध्ये सर्वकालीन सत्य शोधणे अशक्य असले तरी सामाजिक वर्तनाची सर्वसाधारण कल्पना येऊ शकते. राज्यशास्त्रात राजकीय मानवाच्या ऐतिहासिक वर्तनाचा मागोवा घेतला जाऊ शकतो. म्हणून लास्की, कार्ल मार्क्स, जोन्स स्मिथ यांनी ऐतिहासिक दृंष्टिकोनाचा अवलंब करून सिद्धांत मांडणी केलेली आढळते. कार्ल मार्क्सने ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करून ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी केली. शासनसंस्था, राजकीयपक्ष, घटनात्मक व्यवहार याचा विकास कसा झाला याचा शोध या दृष्टिकोनाद्वारे घेता येतो. सर जॉन सिलीच्या मते, इतिहास राज्यशास्त्राचे मूळ आहे राज्यशास्त्र हे इतिहासाचे फळ आहे. ऐतिहासिक कागदपत्रे, टाचणे, डायऱ्या, पत्रव्यवहार इत्यादीच्या आधारावर राजकीय संस्था आणि मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास या दृष्टिकोनाच्या आधारावर केला जात असतो. परंतु या दृष्टिकोनाच्या काही मर्यादा आहेत. सिजविकच्या मते या दृष्टिकोनानुसार भविष्यकाळातील प्रश्नाबद्दल निर्णय घेणे कठीण जाते. इतिहास घटनाचे केवळ कथन असते. तसेच इतिहासाची हा पुनरावृत्ती होत नसते इत्यादी मर्यादा या दृष्टिकोनाच्या असल्या तरी पारंपरिक राज्यशास्त्रात अनेक विचारवंतांनी वापर केलेला दिसतो.

३. **कायदेविषयक दृष्टिकोन-**(Legal Approach) राज्यशास्त्राकडे पाहण्याचा कायदेविषयक दृष्टिकोन प्रसिद्ध आहे. राज्याची उभारणी हीच कायद्याच्या पायावर झालेली असते. राज्य ही वैधानिक संस्था आहे. कायदा हा राजकीय व्यवहाराचा मुख्य पाया आहे. राज्याचे सर्व व्यवहार कायदयाच्या आधारावर चालतात. राज्यशास्त्राच्या अभ्यासात कायदयाला महत्त्वाचे स्थान आहे. एखादया देशाच्या राजकीय जीवनाचा वा राजकीय संस्थेचा अभ्यास केला जातो. तेव्हा तिला घडविणाऱ्या कायदाचा विचार आपोआप केला जातो. राज्यकारभाराचे कायदे, न्यायालयीन निर्णय याचाही विचार या दृष्टिकोनात केला जातो. एखादया देशाच्या राजकीय जीवनाचा अभ्यास करतांना घटनात्मक व्यवहार, संविधान, न्यायालयीन निर्णय, प्रशासकीय कायदा इत्यादीच्या आधारावर विश्लेषण केले जाते. उदा. ब्रिटनचा अभ्यास करतांना प्रा. डायसीचाThe Law of constitution या ग्रंथाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. भारताच्या घटनात्मक व्यवहाराचा अभ्यास करतांना दूर्गादास बसू यांच्या टिकाटिपणणीचा आधार घ्यावा लागतो.

४. **संस्थात्मक कायदेविषयक दृष्टिकोन-** (Legal-Institutional Approach) राज्यसंस्थेला सामाजिक संदर्भापासून तोडून तिचा स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या आणि प्रत्यक्ष व्यवहारापेक्षा सांविधानिक व वैधानिक तरतूदींना प्रमाण मानून चालणाऱ्या दृष्टिकोनाला विधिनिष्ठ संस्थात्मक दृष्टिकोन असे म्हणतात.

**अ) संस्थात्मक औपचारिक प्रक्रियाचा अभ्यास-** राजकीय संस्थाची निर्मिती, वैशिष्टये, तसेच विविध पदांची व यंत्रणाची संविधानात व कायदात नमूद केलेली कार्य हा दृष्टिकोन विचारात घेत असल्यामुळे या दृष्टिकोनाला औपचारिक दृष्टिकोन असेही म्हणतात. या दृष्टिकोनानुसार राजकीय संस्थाचा विचार स्वतंत्र चल असा करतात. या संस्थाच मानवी वर्तन नियंत्रित व प्रभावित करतात. मानवी वर्तनातून त्या नियंत्रित वा प्रभावित होत नाहीत हे या दृष्टिकोनाचे मुख्य गृहितक होते. या दृष्टिकोनातून राज्यसंस्था ही राज्यशास्त्राचा मध्यबिंदू असते. राज्यसंस्थेची कृती सरकारद्वारे घडते. सरकारचे कृतीचे साधन कायदा असते. म्हणून कायद्याचा अंतर्भाव राज्यशास्त्राच्या व्याप्तीत केला पाहिजे. प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या संस्थाचे वर्गीकरण करणे हे या अध्ययन पद्धतीचे वैशिष्टये आहे. या दृष्टिकोनाच्या समर्थकांच्या दृष्टीने सर्व गाभ्याचे प्रश्न मूलतः औपचारिक असतात.या दृष्टिकोनात विविध राजकीय संस्थाची रचना, कार्य व औपचारिक यंत्रणा इ. प्रक्रियाचे अध्ययन महत्त्वाचे असते. यात विविध कार्यपद्धतीचा अभ्यास केला जातो. उदा. कायदेमंडळाची रचना, कार्य व अधिकार यांचा विश्लेषणात्मक अभ्यास पारंपरिक राज्यशास्त्रात केला जात असे.

संस्थात्मक दृष्टिकोना तथ्य संकलनावर भर दिला जातो. तथ्येच स्वतः स्पष्टीकरणे देतात असे मानले जाते. अर्मूत सैद्धान्तीकरणाला फाटा देण्यात आला. राज्यसंस्थेमध्ये निर्माण झालेल्या समस्या राजकीय सुधारणा करून दूर केल्या जाऊ शकतात असा विश्वास हा दृष्टिकोनाचे समर्थक करतात. व्यावहारिक सुधारणा मांडण्याचा प्रयत्न करतात. या दृष्टिकोनाला सांविधानिक शासन प्रत्यक्षात कसे आणता येईल याचा ध्यास होता. राज्यसंस्था सीमित करण्यासाठी विविध उपाययोजना या दृष्टिकोनाचे समर्थक मांडतात. शासनाच्या संस्थीकरणाला महत्त्व देतात. लोकांची सार्वभौम सत्ता व मर्यादित शासन यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करतात. या दृष्टिकोनाच्या प्रर्वतकांनी शासनपद्धतीचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा. लोकशाही विरूद्ध हुकूमशाही असे वर्गीकरण करून लोकशाहीचे अध्यक्षीय व संसदीय

**ब) अनौपचारिक प्रक्रियाचा अभ्यास -** कोणत्याही शासन व्यवस्थेमध्ये कायदा व औपचारिक निर्णय महत्त्वाचे असतात. पण राजकीय निर्णय होण्यामागे काही आनौपचारिक घटक कारणीभूत असतात. राजकीय निर्णयामागे कितीतरी दबाब वा पुष्कळदा प्रलोभने दाखविली जातात. लोकशाहीत नेत्यांची निवड करतांना कित्येक घटक कारणीभूत असतात. उदा.पंतप्रधानाची निवडतांना त्यांची जात, आर्थिक स्थान,पाठिंबा इ.गोष्टी राजकीय प्रक्रियेत महत्त्वपूर्ण असतात.

संस्थात्मक विधिनिष्ठ दृष्टिकोनात औपचारिक गोष्टीच्या अभ्यासावर जास्त भर दिला जातो. तसेच या दृष्टिकोनातील वर्गीकरण आणि वर्णनात्मक प्रतिपादनातून शासनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीवर मुळीच प्रकाश पडत नाही. शासनबाहय घटकाचा विचार या दृष्टिकोनात केला जात नसल्यामुळे केवळ विधिशास्त्रीय चौकटीत राज्यसंस्थेचा अभ्यास एकांगी ठरतो अशी टीका या दृष्टिकोनावर केली जाते. राज्यसंस्था समाजातील अन्य क्षेत्रापासून स्वतंत्र व स्वायत्त कधीच नसते. समाजात घडणाऱ्या बदलाचा तिच्यावर अपरिहार्यपणे परिणाम होत असतो याकडे हा दुर्लक्ष करतो. शासन यंत्रणा व तिचे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण यांच्यातील आंतरक्रिया विचारात घेतल्याशिवाय राजकारणाचा अभ्यास होऊ शकत नाही हे या दृष्टिकोनाचे समर्थक लक्षात घेत नाही.

५. **तुलनात्मक दृष्टिकोन-**(Comparative Approach) राज्यशास्त्राच्या अध्ययनातील तुलनात्मक अध्ययनपद्धती ही अत्यंत उपयुक्त अध्ययन पद्धती मानली जाते. ही पद्धती राजकीय सिद्धांताच्या आणि राजकीय व्यवस्थेच्या तुलनात्मक अध्ययनासाठी वापरता येते. के.सी. व्हिअर यांचा आधुनिक राज्यघटना आणि संघराज्यपद्धती यांचा तुलनात्मक अभ्यास याच दृष्टिकोनाच्या आधारावर केला गेलेला होता. पारंपरिक राज्यशास्त्रात तुलनात्मक अभ्यासाला फार महत्त्व होते. पारंपरिक राज्यशास्त्रात दोन संस्थामध्ये तुलना केली जायची यापैकी कोणत्या संस्थेत किती गुण व दोष आहेत हे शोधले जायचे गुण दोष कसे कमी करता येतील यावर उपाय सांगितले जायचे उदा. ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनाचा तुलनात्मक अभ्यास करून आपले सिद्धात मांडले. तुलनात्मक अध्ययन पद्धती पारंपरिक काळात नव्हे तर आधुनिक काळात ही लोकप्रिय आहे. कारण या अध्ययन पद्धती वैज्ञानिक पद्धतीप्रमाणे

अध्ययन केले जात असते. विविध संस्थांतील साम्यस्थळे आणि विविधता लक्षात घेऊन तुलना केली जाते. त्यातून कोणत्या राजकीय यंत्रणा श्रेष्ठ आहेत हे देखील स्पष्ट केले जात असते. तुलनेच्या माध्यमातून राजकीय संस्थेतील गुणदोषाची अध्ययन होत असल्याने त्यात सुधारणा देखील सुचविलेल्या जाऊ शकतात म्हणून हा दृष्टिकोन आजही उपयुक्त मानला जातो.

**प्र. २रा आधुनिक राजकीय विश्लेषण उदय, अर्थ व स्वरूप सांगा?**

आधुनिक राजकीय विश्लेषणात नवे दृष्टिकोन आणि आधुनिक अभ्यास पद्धतीचा वापर केला गेला. नव तंत्राचे साहाय्य घेतले गेलेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आधुनिक राज्यशास्त्राचा उदय झालेला असला तरी या नव्या विचारांची सुरूवात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेली दिसते. पारंपारिक राज्यशास्त्राकडून आधुनिक राज्यशास्त्राकडे येण्यासाठी जो मधला काळ लागला त्याला संक्रमण काळ मानला जातो. या काळात मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऑगस्ट कॉम्तने समाजशास्त्र व राज्यशास्त्राची केलेली तुलना तर वॉल्टर बॅगहॉटनी लिहीलेला ब्रिटिश राज्यघटना हा ग्रंथ ग्रॅहम वालासचा Human Nature in Politics हा क्रांतीकारी ग्रंथ त्यात मांडलेला वर्तनवाद, मॅक्स वेबरची मूल्यविरहीत अध्ययन पद्धत, टालकॉट पार्सन्सची सर्व सामाजिक शास्त्रांना वापरता येणारी व्यवस्था पद्धत, आर्थर बेंटलेचा वास्तवतावाद, मेरियम आणि लासवेल यांनी राज्यशास्त्रात सत्तेला दिलेले महत्त्व इ. विचारवंतांनी राज्यशास्त्राला आधुनिक बनविण्यासाठी वेगवेगळे सिद्धात मांडले.याच काळात १९५३ मध्ये डेव्हिड ईस्टनने The Political System हा ग्रंथ प्रकाशित करून आधुनिक राज्यशास्त्राचा उदय घडवून आणला. ईस्टनचे विवेचन प्रमाणभूत मानून ग्रॅबिएल अल्मंड, डेव्हिड ॲप्टर, कोलमन, पॉवेल इत्यादी विचारवंतांनी विपुल लेखन करून आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या विकासास हातभार लावला.

**आधुनिक राजकीय विश्लेषणाचे स्वरूप -** ग्रॅबिएल आल्मंडने नव्या राजकीय व्यवस्थेची स्वरूप विशद केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे होत.

१. **वाढत्या व्याप्तीचा शोध-** आधुनिक राजकीय विश्लेषणामुळे राजकीय विश्लेषणाचे क्षेत्र वाढले. पूर्वीच्या विश्लेषणात उदारमतवादी लोकशाही पद्धतीवर भर दिला जात असे. पण आता आंतरराष्ट्रीय राजकारण वा परिस्थितीत झपाटयाने फरक पडत चालला असून नव्याने स्वतंत्र झालेल्या नवोदित राष्ट्रामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरुप झपाटयाने बदलेले आहे. त्याचा अभ्यास नव्याने सुरू झाला आहे. अमेरिका व युरोपात यावर संशोधन करणारी संशोधन केंद्र स्थापन झाली आहेत. आधुनिक राजकीय विश्लेषणात आल्मंड व पॉवेल या विचारवंतांनी मोलाचा वाटा उचलेला आहे.

२. **नवीन वर्तनवादी क्रांती-** राज्यशास्त्र अध्ययनाची जुनी पारंपारिक पद्धती मागे पडत असून इतिहास, कायदा, तत्वज्ञान यांच्या औपचारिक अभ्यासापेक्षा राजकीय घडामोडीचा अभ्यास अधिक महत्त्वाचा ठरू पाहत आहे. राजकीय प्रश्न, विविध गट व त्यांचा प्रभाव हा अभ्यास आधुनिक दृष्टया जास्त महत्त्वाचा ठरत आहे. त्यातून राज्यशास्त्राच्या अभ्यासाला नवी निश्चितता आणण्याचा प्रयत्न होत आहे त्यालाच वर्तनवादी क्रांती हे नाव दिले आहे.

३. **नव्या सिद्धाताची उभारणी-** राज्यघटना, शासनसंस्था इ. कल्पना राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून पुरेशा प्रभावी ठरत नव्हती त्यात अपूर्णता जाणवत होती. त्यामुळे आज समाजशास्त्र, अर्थशास्त्र व मानसशास्त्र इ. चा आधार घेऊन सिद्धांताची मांडणी केली जात आहे. राजकीय सिद्धात आणि तुलनात्मक शासन यांच्यातील संबंध स्पष्ट करणे. तुलनात्मक शासन आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारातील संबंध स्पष्ट करणे इ.गोष्टीच्या अभ्यासामुळे राज्यशास्त्राला शास्त्रीय दर्जा प्राप्त झाला.

४. **नव्या निश्चिततेचा शोध-** पाश्चिमात्य समाजातील शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीच्या अनुषंगाने राज्यशास्त्राच्या अध्ययनात अधिक निश्चिती आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. याबाबत राजकीयव्यवहाराचे मोजमाप, नियंत्रण, अवलोकन आणि विश्लेषण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

५. **राजकीय प्रक्रियेचा अभ्यास-** राज्य या संस्थेच्या अभ्यासावर भर देण्याऐवजी आधुनिकतावादयांनी राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासावर भर दिला. राजकीय व्यवस्थेतील शासन संस्थेच्या वाढलेल्या कक्षा शोधण्याचा प्रयत्न आधुनिकतावादी करतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदल्याच्या अनुषगाने होणारे राजकारण आणि प्रत्यक्षातील राजकारण याचा विचार देशाच्या व्यवस्थेच्या अंतर्गत ठिकाणी महत्त्वाची मानली जातात.

६. **राज्यशास्त्राचा सम्रग अभ्यास-** राज्यशास्त्राचा सर्वांगीण अभ्यास व्हावा म्हणून राज्यशास्त्रावर समाजशास्त्र, मानसशास्त्र व विश्लेषणात आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा वापर केला जात आहे. त्यासाठी राज्यशास्त्राचा अभ्यास करतांना इतर सामाजिक शास्त्र आणि त्यातील तंत्र व दृष्टिकोनाचा वापर केल्यामुळे राज्यशास्त्राच्या सम्रग अभ्यास आधुनिक विश्लेषणात होऊ लागला.

**आधुनिक राजकीय व्यवस्थाच्या उदयाची कारणे -**

आधुनिक राज्यव्यवस्था २० व्या शतकात विकसित झाली. १९ व्या शतकातील अनेक विचारवंतानी त्यांचा पाया घातला.२०व्या शतकात नवीन तंत्रज्ञान जन्माला आले. आधुनिक राजकीय व्यवस्थाच्या उदयाची कारणे पुढीलप्रमाणे होत.

**१. नवोदित आफ्रो-आशियाई राष्ट्रांचा उदय-** दुसऱ्या महायुद्धापूर्वी जगातील राजकीय व्यवस्थेवर इंग्लंड, अमेरिका व युरोपियन राष्ट्रांचे वर्चस्व होते. जागतिक घडामोडीत या राष्ट्राचा सिंहाचा वाटा होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमी राष्ट्रांचे वर्चस्व कमी होऊन नवोदित आफ्रोआशियाई राष्ट्रांना आपल्या स्वातंत्र्याची व जबाबदारीची जाणीव झाली. त्यामुळे या राष्ट्रांना बाजुस ठेऊन पश्चिमी राष्ट्रांना राजकारण करता येत नाही. नव्या राजकीय व्यवस्थेवर या घडामोडीचा परिणाम झाला.

**२. नवोदित राष्ट्रांचे नवे प्रयोग-** दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी नवे प्रयोग सुरू केले. आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण केले. पश्चिमी राष्ट्रातील संस्थाचा वापर आपल्या राष्ट्रात केला तरी देखील त्यांना अपेक्षित यश आले नाही. यातूनच आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाला प्रेरणा मिळाली.

**३. संसदिय लोकशाहीचा पराभव-** इंग्लंडच्या संसदिय लोकशाहीचा अवलंब सर्वच राष्ट्रांनी केला. परंतु २० व्या शतकात लोकशाहीचा प्रयोग अपयशी ठरला. सर्व राष्ट्रांना लोकशाही मानवेल असे नाही. कारण पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी व इटली येथील लोकशाही अपयशी ठरून नाझीवाद व फॅसिझम निर्माण झाल्या. त्या राष्ट्रानी जलद विकास घडवून आणला. लोकशाही पद्धतीचे या देशात निर्माण झालेले आर्थिक अपयशातून राजकीय अपयश निर्माण झाले. त्यातून त्या देशात सर्वंकष हुकुमशाहीचा जन्म झाला. शासनप्रकार कितीही चांगली असली तरी सर्वच देशात सारख्या प्रमाणात लागू करता येत नाही हे सिद्ध झाले त्यातून अभ्यासकांना अभ्यासाचे नवे दालन उघडले गेले आणि आधुनिक राजकीय व्यवस्थाच्या उदयाला आवश्यक वातावरण निर्माण झाले.

**४. साम्यवादाचा उदय-** २० व्या शतकात रशियात साम्यवादी क्रांती झाली. राजकीय विश्लेषकापुढे साम्यवादी तत्वज्ञान जबरदस्त वैचारिक आव्हान होते. आफ्रिका व आशिया खंडातील अनेक राष्ट्रानी साम्यवाद स्वीकारला. साम्यवादाने समता व आर्थिक भरभराटीचे वातावरण निर्माण केले. व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधन लादले असले तरी साम्यवादाचा विकास जलद रितीने झाला. त्यामुळे साम्यवाद हा विकासाचा नवा पर्याय अभ्यासकांसमोर ठाकला त्यातून अभ्यासकांना अभ्यासाचे नवे दालन उघडले गेले.

**५. अटलांटिक समाजाच्या वर्चस्वाचा अंत-** दुसऱ्या महायुद्धानंतर अटलांटिक समाज म्हणजे इंग्लंड, अमेरिका व युरोप खंडातील देश होय. या प्रदेशातील देशानी जगावर राज्य केले. पण दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे स्वरूप बदलले. आफ्रो आशियाई देशात स्वातंत्र्याची जाणीव निर्माण झाली. या जाणीवेमुळे आंतरराष्ट्रीय व्यवहाराची व्याप्ती वाढली. आंतरराष्ट्रीय राजकारणात या देशाचे स्थान दुय्यम असले तरी जागतिक राजकारणात या देशाना दुर्लक्षून चालणार नाही. या देशाचा विचार करणे अपरिहार्य आहे. हे वास्तव लक्षात आल्याने अभ्यासकांचे लक्ष आफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या अभ्यासकांकडे वेधले गेले त्यातून आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या उदयाला पोषक पार्श्वभूमी निर्माण झाली.

**आधुनिक राजकीय विश्लेषणाची वैशिष्टये-** पारंपरिक राज्यशास्त्र धर्म, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान यांच्या चक्रव्यूहात अडकले. परिमाणतः पारंपरिक राज्यशास्त्र पुराणमतवादी ठरले. या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी आधुनिक राज्यशास्त्राज्ञांनी इतर सामाजिक शास्त्राची मदत घेतली. विविध ज्ञानशाखाकडून तंत्रे व अध्ययनपद्धतीची उसनवारी केली. तात्त्विक बार्बीपेक्षा दैनंदिन राजकीय जीवनाशी संबंधित विषयाना अध्ययनात प्राधान्य दिले. त्यामुळे राज्यशास्त्रात नव्या प्रवाहाचा जन्म झाला. आधुनिक राज्यशास्त्राची ठळक वैशिष्टये नमूद करता येतात.

१. **अनुभववाद-** ह्यूमन नेचर इन पॉलिटिक्स हे ग्राहाम वॅलासाचे पुस्तक म्हणजे अनुभववादाचा राज्यशास्त्राच्या अभ्यासातील प्रथम वापराचे उदाहरण आहे. या पुस्तकात मानसशास्त्राच्या अंगाने राजकारणाचा अभ्यास केलेला आहे या प्रयत्नातून अनुभववादाला राज्यशास्त्रात चालना मिळाली. १९४० नंतर अमेरिकन राज्यशास्त्राज्ञांनी त्यांचा वापर सर्व क्षेत्रात सुरू केला. प्रत्याक्षार्थवाद, व्यवस्थात्मक विश्लेषण, वर्तनवाद ही अनुभववादाची अपत्ये आहेत. मूल्यनिरपेक्षता, वस्तुनिष्ठता आणि व्यक्तिनिष्ठतेचा अभाव ही अनुभववादाची त्रिसूत्री आधुनिक राजकीय विश्लेषणात वापरली जाऊ लागली हे प्रमुख वैशिष्टये आधुनिक राज्यशास्त्राचे आहे.

२. **आंतर-विद्याशाखीय दृष्टिकोन-** दुसऱ्या महायुद्धानंतर राजकीय विश्लेषकांनी समाजशास्त्र, मानसशास्त्र, नैसर्गिक शास्त्रातील सैद्धांतिक दृष्टिकोन आणि पद्धतीशास्त्रीय तंत्रे आत्मसात केली. नव्याने उदयाला आलेल्या राष्ट्राचा अभ्यास करण्यासाठी अन्य सामाजिक शास्त्राचा मदत घेतल्याशिवाय तरणोपाय नव्हता. त्यामुळे इतर सामाजिक शास्त्र व नैसर्गिक शास्त्राकडून संकल्पनात्मक व तंत्रात्मक आदानप्रदानातून राज्यशास्त्राचे अध्ययनक्षेत्र समृद्ध झाले. आंतरशास्त्रीय दृष्टिकोनामुळे मानवी जीवनातील विविध प्रश्नांच्या अभ्यासासाठी वापरले जाऊ लागल्यामुळे विविध शास्त्रे परस्परांच्या जळव येऊ लागले. त्यामुळे प्रश्नाचे सखोल आकलन होण्यास हातभार लागला.

३. **तार्किक प्रत्याक्षर्थवाद-** विगमन पद्धत ही विज्ञानाची वैध अभ्यासपद्धती आहे. ती वापरून शास्त्रीय पद्धतीने ज्ञान मिळविता येते. या पद्धतीने केलेल्या अभ्यासात कुठेही तत्त्वमीमांसेला जागा असत नाही. काटेकोर तर्कशास्त्रीय कार्यकारणातून सिद्ध झालेल्या शास्त्रीय विधानांना स्वीकारले जावीत. वरील कसोटयांवर खरी न उतरणारी विधाने नाकारावीत असे मानल्या गेल्यामुळे पारंपरिक राज्यशास्त्रातील अनेक वस्तूनिष्ठ सत्य या कसोटीवर खोटी ठरविण्यात आली. कारण तार्किक प्रत्यक्षार्थवादानुसार जी विधाने भूमितीतील प्रमेयांप्रमाणे तर्कसिद्ध असतात किंवा जी अनुभवसिद्ध असतात तेवढीच विधाने प्रमाण मानावीत ही भूमिका आधुनिक राजकीय विश्लेषणाने देखील मान्य केल्याने हे देखील महत्त्वपूर्ण वैशिष्टये ठरते.

४. **परिमाणन-** आधुनिक राजकीय विश्लेषणाने गणित आणि संख्याशास्त्राचा संशोधनात मोठया प्रमाणात वापर केलेला दिसतो. गणित आणि संख्याशास्त्राच्या आधारावर घटिते मांडण्याची प्रवृत्ती वेगाने वाढत आहे. परिमाणन तंत्राचा अवलंब केल्यामुळे राजकीय वास्तवाचे आकलन अधिक शास्त्रशुद्ध बनत चालले आहे असा दावा नव्या राज्यशास्त्राचे समर्थक करतात उदा. मतदान अध्ययनात गणिती व संख्याशास्त्राचा अधिक वापर केला जातो. संख्याशास्त्रीय पद्धतीमुळे दोन घटनातील आंतरसंबंध अधिक सखोलपणे प्रस्थापित करता येऊ लागला. राजकीय घडामोडीच्या गतिशास्त्राचे सप्रमाण विश्लेषण करणे शक्य झाले. गणित व संख्याशास्त्रामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षा रूंदावल्या.

५. **विकासवादी अध्ययने-** तिसऱ्या देशातील जगांनी पाश्चात्य देशातील विकासाची प्रतिमाने आपल्या देशात लागू केली परंतु ती यशस्वी न झाल्यामुळे राज्यशास्त्रज्ञांना विकासाची गमके, व्याख्या बदलाव्या लागल्या. तिसऱ्या जगातील सामाजिक आर्थिक वास्तव तपासून विकासाची नवी प्रतिमाने विकसित करावी लागली. संविधानिक तत्त्वात न बसणाऱ्या म्हणजेच क्रांतीच्या मार्गाने होणाऱ्या राजकीय बदलाकडे अभ्यासकांनी दुर्लक्ष केले होते. परंतु मार्क्सवादी विकासकल्पनेच्या आधाराने या बदलांचा अभ्यास सुरू झाल्याने राज्यशास्त्रात

सर्वसमावेशक विकासवादी अध्ययने मोठया प्रमाणावर होऊ लागली. पाश्चात्य विकास प्रतिमानातील सार्वत्रिकतेचा दावा फोल ठरला.

**टिप- आधुनिक राजकीय विश्लेषणाचे दोष वा मूल्यमापन -**

पारंपरिक राज्यशास्त्रातील दोष दूर करण्यासाठी आधुनिक राज्यशास्त्राचा जन्म झाला पण ते सुद्धा दोषमुक्त नाही. या राज्यशास्त्रावर पुढील आक्षेप घेतले जातात.

१. **तंत्र व आशय फारकत-** आधुनिक राजकीय विश्लेषणात तथ्य संकलनच्या आधारावर संख्याशास्त्रीय काटेकारपणा आणण्याचा प्रयत्न केलेला असला तरी त्यातून निश्चित सिद्धांत मांडता आले नाहीत. तंत्राला जास्त प्राधान्य दिल्यामुळे आशयाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे राज्यशास्त्रात आशयहीन विचारांचे अराजक निर्माण झाले. आधुनिक राज्यशास्त्रात तंत्र व आशय यात फारकत झाली असून तंत्राला आशयापेक्षा अधिक प्राधान्य मिळालेले दिसते अशी टीकाकाराकडून टीका केली जाते.

२. **पद्धतिशास्त्राचा अतिरेक-** आधुनिक राज्यशास्त्राज्ञांनी प्रगत अन्वेषणतंत्रांचा वापर करून राज्यशास्त्राच्या अभ्यासात अधिक शास्त्रीयता, काटेकोरपणा आणल्याचा दावा केला. परंतु पद्धतिशास्त्रावर आत्यंतिक भर दिल्यामुळे राजकीय वास्तवाचे आकलन होण्याच्या मार्गात बाधा निर्माण झाली. परिमाणावर अधिक भर दिल्यामुळे ज्या राजकीय प्रश्नांचे परिमाणन होऊ शकत नाही त्याकडे दुर्लक्ष केले गेले. मानवी व्यवहाराची सूक्ष्मता लक्षात घेता शास्त्रीय पद्धतीने त्यांचे परिमाणन होऊ शकत नाही या वास्तवाकडे आधुनिक राज्यशास्त्राज्ञांनी दुर्लक्ष केल्यामुळे पद्धतिशास्त्राने राज्यशास्त्राचे महत्त्व कमी केले.आधुनिक अध्ययनातून राज्यशास्त्र अधिक शास्त्रीय करण्याचा दावा आधुनिकतावादी करत असलेतरी अन्वेषण पद्धतीवर अधिक भर दिल्यामुळे राजकीय व्यवहार व प्रक्रियामधून निष्कर्ष काढण्यात ते अयशस्वी ठरले.

३. **महत्त्वाच्या प्रश्नांना गौण स्थान-** राज्यशास्त्रातून सामाजिक व राजकीय संदर्भात ज्ञान मिळाले पाहिजे. मात्र अभ्यासकांनी मूलभूत राजकीय प्रश्नांना बाजूला सारून किरकोळ प्रश्नांना महत्व दिले. ज्या प्रश्नाचे संख्याशास्त्रीय मोजमाप होऊ शकेल अशाच प्रश्नांना महत्व दिल्यामुळे महत्त्वाच्या प्रश्नाकडे अभ्यासकांचे दुर्लक्ष झाले. पद्धतिशास्त्राच्या मर्यादांमुळे महत्त्वाचे प्रश्न, सामाजिक आव्हाने, मूलभूत प्रश्न यांना डावलून किरकोळ व असंबद्ध प्रश्नांना राज्यशास्त्रज्ञांनी प्राधान्य दिल्यामुळे राज्यशास्त्रात सारणी, आकडेवारीचे ढीग तयार झाले पण त्यातून विषयाच्या ज्ञानात कवडीची भर पडली नाही.

४. **भाडंवलशाहीस पोषक-** मूल्यमुक्तता, शास्त्रीय काटेकोरपणा आणि परिमाणन यांचा शास्त्र मानल्यामुळे आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी कळतनकळत वर्तमान व्यवस्थेतील चिरंतनत्वाचे समर्थन केले. अमेरिकन राजकीय व्यवस्था निर्दोष आहे तीत बदल करण्याची गरज नाही हे गृहित धरल्याने ते भांडवलशाहीतील दोषांना आवाहन देऊ शकले नाही. आधुनिकतावादयांनी अमेरिकन राजकीय व्यवस्थेवर आधारित विचार मांडल्यामुळे त्या व्यवस्थेतील अनेक गृहित बाबींना ते आव्हान देवू शकले नाहीत. म्हणून त्यांचे विचार भाडंवलशाहीस पोषक आहेत. भाडंवलशाही व्यवस्था मूलतः अन्याय व अविवेकी शोषणावर आधारित असते तिच्यात अनेक अंतर्गत संघर्ष व तणाव आहेत या वस्तुस्थितीला नाकारून तिच्या स्थैर्य व सुरक्षिततेवर भर दिला. सामान्याच्या गरजा, जनआंदालने आणि क्रांतीकारी शक्तीच्या प्रभावाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे बर्नाल म्हणतो की, सामाजिक शास्त्रांना आज खरी गरज प्रकृष्ट तंत्राची नसून मध्यवर्ती प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी लागणाऱ्या धारिष्टयाची आहे.

५. **मूल्यमुक्त संशोधन अशक्य-** तार्किक प्रत्याक्षार्थवाद आणि अनुभववाद हे आधुनिक राज्यशास्त्राचे मुख्य दोन्ही आधार तत्त्वमीमांसा आणि मूल्यप्राधान्यास विरोध करतात. ते संपूर्ण तत्त्वज्ञान व सिद्धांत बाद ठरवतात. सत्याची शास्त्रीय स्पष्टीकरणे त्याज्य मानतात. तत्त्वज्ञानाचे अस्तित्व केवळ भाषिक पातळीवर असते. त्यामुळे जगाचे आकलन करून घेणे हे तत्त्वज्ञानाच्या कक्षेबाहेरील कार्य मानतात. मानवाला रोजच्या दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांना नैतिकचे सोयसूतक नसते असा आधुनिकतावादी दावा करतात. आधुनिकतावादी

मूल्यमुक्त संशोधन करण्याचा प्रयत्न करतात. मूल्यांना गैरलागू वा अशास्त्रीय मानतात. मूल्यांचा खरे खोटेपणा शास्त्राच्या कसोटयावर सिद्ध होत नसल्यामुळे अभ्यासकांनी स्वतःच्या मूल्यात्मक बांधिलकीपासून दूर राहावे पण राजकीय प्रश्नाचे स्वरूप असे असते की मूल्यनिरपेक्ष संशोधन होऊच शकत नाही. संशोधन करतांना योग्य अयोग्य याचा अभ्यासकाकडून कळतनकळत विचार होतच असतो.

**टिप- पारंपारिक व आधुनिक विश्लेषणातील फरक-**

१. पारंपरिक विश्लेषणात घटनात्मक व औपचारिक प्रक्रियेच्या अभ्यासावर भर होतो तर आधुनिक विश्लेषणात अनौपचारिक प्रक्रियेच्या अभ्यासावर भर होतो.

२. पारंपरिक राज्यशास्त्र संस्थेच्या स्थितीशील कार्यपद्धतीवर भर देतात तर आधुनिकतावादी संस्थेच्या गतिमान व विकासशील प्रक्रियेवर भर देतात.

३. पारंपरिक राज्यशास्त्रावर तत्वज्ञान, इतिहास व कायदा यांचा जास्त प्रभाव दिसतो तर आधुनिकतावादावर समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि अर्थशास्त्र याचा जास्त प्रभाव दिसतो.

४. पारंपरिक विश्लेषणात तत्वज्ञानाच्या प्रभावामुळे मूल्य व आदर्श यावर भर देतात तर आधुनिक विश्लेषणात राज्यशास्त्र मूल्यमुक्त करून अधिक शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करतात.

५. परंपरावादी सामाजिक शास्त्राच्या स्वतंत्ररित्या अभ्यासावर भर देतात तर आधुनिकतावादी सामाजिक शास्त्रामध्ये समान सूत्रे शोधुन समग्र अभ्यास करण्याचा प्रयत्न करतात.

६. आधुनिकतावादी अधिक अचुकता आणण्यासाठी संख्यात्मक अध्ययनावर भर देतात तर परंपरावादी संख्याशास्त्राच्या वापराकडे दुर्लक्ष करतात.

७. पारंपरिक विश्लेषक पाश्चिमात्य देशाच्या राजकारण वा संस्थाच्या अभ्यासावर भर देतात तर आधुनिकतावादी गैरपाश्चिमात्य देशाच्या राजकारण व संस्थाच्या अभ्यासावर भर देतात.

८. पारंपरिक राज्यशास्त्रात आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा अभाव दिसतो तर आधुनिक राज्यशास्त्रात आंतरविद्याशाखीय आधारावर राजकीय घटना, वर्तनाचा अभ्यास केला जातो.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. राजकीय व्यवस्था हा ग्रंथ कोणी व केव्हा लिहीला?
उत्तर- राजकीय व्यवस्था हा ग्रंथ डेव्हिड ईस्टनने १९५३ साली लिहीला.

२. पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाची दोन वैशिष्टये सांगा.
उत्तर- पारंपरीक राज्यशास्त्रात अध्ययनात राज्यकेंद्री होते तर अध्ययनात तत्त्वज्ञान, कायदा आणि इतिहासाच्या अध्ययनाला प्राधान्य होते ही पारंपरिक राज्यशास्त्राचे वैशिष्टये सांगता येतात.

३. पारंपरीक राज्यशास्त्राचे दोन अभ्यास दृष्टिकोनाची नावे लिहा.
उत्तर - पारंपरीक राज्यशास्त्राचे तत्वज्ञान विषयक दृष्टिकोन, ऐतिहासिक दृष्टिकोन आणि कायदेविषयक दृष्टिकोन हे महत्वपूर्ण दृष्टिकोन आहेत.

४. पारंपरिक राज्यशास्त्राचे दोन दोष सांगा.
उत्तर- मर्यादित अभ्यासावर भर, शास्त्रीय दर्जा कमी, आंतरविद्याशाखीय दृष्टिकोना अभाव, मर्यादित तंत्राचा वापर हे पारंपारिक राज्यशास्त्राच्या प्रमुख दोष आहेत.

५. आधुनिक राज्यशास्त्राच्या उदयाची दोन कारणे कोणती?
उत्तर- नवोदित आफ्रो-आशियाई राष्ट्राचा उदय, नवोदित राष्ट्राचे नवे प्रयोग, संसदीय लोकशाहीचा पराभव आणि साम्यवादाचा उदय या कारणामुळे आधुनिक राज्यशास्त्राचा उदय झालेला दिसतो.

६. आधुनिक राजकीय व्यवस्थाच्या उदयासाठी लेखन केलेले दोन विचारवंताची नांवे लिहा.
उत्तर- आधुनिक राजकीय व्यवस्थाच्या उदयासाठी डेव्हिड ईस्टन, ग्रॅबिएल आल्मंड, राबर्ट ढॉल,आल्फेड कार्बन इ.विचारवंताची नांवे सांगता येतात.

## प्रकरण २ रे
## राजकीय व्यवस्था

**प्र.१ला राजकीय व्यवस्था म्हणजे काय ते सांगुन राजकीय व्यवस्थेची कार्य स्पष्ट करा?**

**किंवा**

**राजकीय व्यवस्थेतील रूपांतराची कार्य वा आदान प्रदान सिद्धांत स्पष्ट करा?**

राजकीय संस्थाचा अभ्यास पारंपरिक राज्यशास्त्रात केला जात असे. आधुनिक काळात राजकीय संस्था ऐवजी राजकीय प्रक्रियाचा अभ्यास सुरू झाल्याने राज्यशास्त्रात नव्या संकल्पना रूढ झाल्या. राज्यशासना ऐवजी राजकीय व्यवस्था ही संज्ञा वापरली जाऊ लागली. शासन शब्दापेक्षा राजकीय व्यवस्था ही संज्ञा व्यापक आहे. राजकीय प्रक्रियेत राजकीय व्यवस्थेतील सर्व घटकांचा समावेश होतो. म्हणून आधुनिक राज्यशास्त्रात डेव्हीड ईस्टनने राजकीय व्यवस्था ही संकल्पना राज्यशास्त्रात आणली. त्यानंतर ग्रॅबिएल आल्मंड आणि पॉवेल यानी या संकल्पनेचा प्रसार केला. 'परस्परसंलग्न घटकांचा संच किंवा परस्परांशी आंतरक्रिया करीत असलेल्या घटकांचा संघ ' म्हणजे व्यवस्था होय. कोणत्याही व्यवस्थेत काही चल असतात ते परस्परांशी संलग्न असल्यामुळे त्यांचा एक संच झालेला असतो. या संचाभोवती असलेल्या पर्यावरणात जरी काही विक्षेप आले तरीही टिकून राहण्याचे या संघाचे काही मार्ग असतात. संचातील घटक परस्परांशी ठराविक प्रक्रियांद्वारे आंतरक्रिया करतात. ते घटक परस्परावलंबी असतात.

**राजकीय व्यवस्था अर्थ आणि व्याख्या -**

१) **डेव्हीड ईस्टन-** अधिकृत निर्णय घेऊन बंधनकारक रितीने अंमलबजावणी करण्याचा अधिकार प्राप्त झालेल्या समाजातील व्यवस्थेला राजकीय व्यवस्था असे म्हणतात.

२) **मॅक्स वेबर-** राजकीय व्यवस्था म्हणजे असा मानवी समुदाय की, ज्याला विशिष्ट भूप्रदेशावर स्वाभाविक आणि मान्यतापूर्वक पद्धतीने बळाचा वापर करण्याची मक्तेदारी प्राप्त झालेली असते.

३) **गॅबिएल आल्मंड-** राजकीय व्यवस्था ही एक अशी क्रियाप्रतिक्रियात्मक व्यवस्था असते की जी सर्व स्वतंत्र समाजात अस्तित्वात असते. ती संकलन व जुळणीची कार्य पाड पाडीत असतानाच तिला मान्यताप्राप्त बळाचा वापर करण्याचा व स्वतःची अधिसत्ता निर्माण करण्याचा अधिकार प्राप्त झालेला असतो.

**राजकीय व्यवस्थेची कार्य वा कार्यपध्दती -** राजकीय व्यवस्थेला रूपांतराची, क्षमतेची आणि संपोषणाची ही प्रमुख तीन प्रकारची कार्य पार पाडावी लागतात.

**अ) रूपांतराचे कार्य-** राजकीय व्यवस्थेचे सेंद्रिय प्राण्याबरोबर किंवा यंत्राबरोबर तुलना करता येईल. प्राण्यांना चलन-वलनासाठी तसेच यंत्र चालविण्यासाठी शक्तीची आवश्यकता असते. प्राण्यांना त्यांच्या खाद्यातून तर यंत्राला त्यांच्या इंधनातून शक्ती मिळत असते. इंधनाचे शक्तीत रूपांतर होत असते. त्याच प्रमाणे रूपांतराच्या कार्यापासून व्यवस्थेला शक्ती मिळत असते.

१) **आदान कार्य-** प्रत्येक व्यवस्था परिस्थितीच्या संदर्भात कार्य करीत असते. व्यवस्था आणि परिस्थिती याच्यांत आदान आणि प्रदानाच्या सहाय्याने संबंध प्रस्थापित होतात. परिस्थिती राजकीय व्यवस्थेवर दडपण आणण्यासाठी काही मागण्या सादर करते त्याला आदान असे म्हणतात. मागण्याचे आदान आणि पाठिंबाचे आदान हे आदानाचे दोन भाग असतात. परिस्थिती कडून व्यवस्थेकडे काही मूलभूत स्वरूपाच्या मागण्या केल्या जातात. त्या सर्व मागण्या पूर्ण व्हाव्यात ही परिस्थितीची अपेक्षा असते पण कोणतीही व्यवस्था सर्वच्या सर्व मागण्या पूर्ण करू शकत नाही. कारण मानवाच्या गरजा अमर्याद असतात. एक गरज पूर्ण झाली की दुसरी उद्‌भवते. त्यामुळे परिस्थितीकडून सादर झालेल्या मागण्याची पूर्तता करण्याची व्यवस्थेची क्षमता अमर्याद अशू शकत नाही. म्हणून परिस्थितीकडून मागण्याच्या परिपूर्तीसाठी दडपण आल्यानंतर त्या मागण्यासंबंधी निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू होते. या प्रक्रियेत सर्व मागण्या पूर्ण करणे शक्य नसल्याने मागण्याची प्रतवारी ठरवून त्यांना अग्रक्रम दिला जातो आणि त्यानुसार धोरण ठरविले जाते. मागण्याची निवड योग्यायोग्यतेवर केली जाईल असे नाही. काही मागण्या हितसंबंधियाच्या दडपणातून

स्वीकारल्या जातात तर काही योग्यायोग्यतेच्या निकषावर स्वीकारल्या जातात. काही प्रसंगी अयोग्य मागण्या परिस्थितीच्या दडपणाने स्वीकारल्या जातात. कोणत्या मागण्याप्रति हितसंबंधियाकडून दडपण पडेल यावर निर्णय प्रक्रिया अवलंबून असते.

२) **प्रदान कार्य-** परिस्थितीकडून मागण्यांचे दडपण आल्यानंतर निर्णय प्रक्रिया सुरू होते. आदानाचे धोरणात आणि धोरणाचे निर्णयात रूपांतर करण्याची प्रक्रिया प्रदान प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. या प्रक्रियेत तीन भाग पडतात. धोरणाच्या अनुषंगाने जे कार्यक्रम निश्चित केलेले असतील त्यासाठी निश्चित स्वरूपाचे काही नियम तयार करावे लागतात ही नियम निर्मिती प्रक्रिया होय. नियम तयार केल्यानंतर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागते. या प्रक्रियेस प्रशासन प्रक्रिया असे म्हणतात. अंमलबजावणी करतांना नियमांच्या अर्थावरून मतभेद होऊन संघर्ष निर्माण होतात. त्या संघर्षाचे निराकरण करण्यासाठी न्यायदान करावे लागते. या प्रक्रियेस न्यायदानाची प्रक्रिया असे म्हणतात. अशा पद्धतीने कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे शासनाचे प्रमुख तीन विभाग प्रदान प्रक्रियेत कार्यरत असतात.

३) **प्रत्यादान प्रक्रिया-** परिस्थिती कडून सादर झालेल्या सर्व मागण्याची पूर्तता व्यवस्था पूर्ण करू शकत नाही. धोरणाचे निर्णयात रूपांतर झाल्यानंतर निर्णयावरून लोकामध्ये दोन गट तयार होतात. ज्या लोकांची मागणी मंजूर झाली त्यांचे समाधान होते आणि ते निरनिराळया स्वरूपात व्यवस्थेला पाठिंबा देतात. त्यातून व्यवस्थेला स्थैर्य व मजबूती प्राप्त होत असते. ज्या लोकांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत हे असमाधानी लोक व्यवस्थेला विरोध करतात. लोकांच्या असमाधानाच्या प्रमाणात असहकार सुरू असतो. काही लोक सभा, निर्देशने इ.मार्गानी विरोध करतात. काही वेळेस लोक संघटित मार्गाने विरोध करण्यासाठी क्रांतीच्या मार्गाचा अवलंब करून शासन उलथून टाकण्याचा प्रयत्न करतात. निर्णयाच्या संदर्भात सहकार्य करणारे गट आणि विरोध करणारे गटाचे कार्य म्हणजे प्रत्यादान प्रक्रिया होय. निर्णयाचा परिणाम ही प्रक्रिया सुरू होते. प्रत्येक व्यवस्थेत मागण्याचे आदान, पाठिंबाचे आदान आणि असंतुष्टाचा विरोध ही प्रक्रिया सतत सुरू असते. कारण शासनाच्या एका निर्णयावरून संतुष्ट झालेले लोक दुसऱ्या निर्णयावरून असंतुष्ट होऊ शकतात. त्यामुळे व्यवस्थेला पाठिंबा आणि विरोध यांचा एकत्रितरीत्या साकल्याने विरोध करावा लागतो. असंतुष्ट लोकांचे प्रमाण वाढल्यास व्यवस्था बदल होण्याची शक्यता असते. म्हणून प्रत्येक व्यवस्थेला जनतेच्या अधिमान्यतेची गरज असते. व्यवस्थेला योग्य प्रमाणात जनतेच्या पाठिंबा असेल तर व्यवस्थेला स्थैर्य लाभू शकते. अधिमान्यता ही व्यवस्थेच्या स्थैर्य आणि भवितव्यासाठी आवश्यक असते.

अशा प्रकारे प्रत्येक व्यवस्थेत आदान, प्रदान आणि प्रत्यादान हे चक्र सातत्याने चालू असते.

**ब) क्षमतेची कार्य-** परिस्थिती कडून सादर झालेल्या आदानाचे प्रदानात रूपांतर करण्याची व्यवस्थेची पात्रता म्हणजे व्यवस्थेची क्षमता होय. क्षमतेच्या कार्यावर राजकीय व्यवस्थेची स्थिरता आणि यश अवलंबून असते. साधन सामुग्री निर्माण करून लोकांच्या मागण्या पूर्ण करण्याची निस्सारक क्षमता, जनतेचे वर्तन नियंत्रण करण्यासाठी आवश्यक नियंत्रण क्षमता आणि वस्तू, सेवा वितरणाची क्षमता अंगी असल्याशिवाय राजकीय व्यवस्था आदानाचे प्रदानात रूपांतर करू शकत नाही आणि हे कार्य जर व्यवस्था पार पाडू शकली नाही तर तिचे स्थैर्य व सातत्य धोक्यात येते. क्षमतेच्या प्रक्रियेत चार प्रकारच्या मागण्याचा समावेश होतो.

***१) उत्पादन किंवा सेवा क्षेत्रातील मागण्या-*** एखादया विशिष्ट क्षेत्रातील उत्पादन शासनाने आपल्या नियंत्रणाखाली आणावे अथवा स्वतः उत्पादन करावे किंवा महत्त्वाच्या सेवा शासनाने लोकांना पुरवाव्यात. या संदर्भात जनतेच्या मागण्या असतात. या मागण्याची पूर्तता करण्यासाठी व्यवस्थेजवळ उत्पादन क्षमता असावी लागते अन्यथा या मागण्या पूर्ण होऊ शकत नाही. उदा.महाराष्ट्राच्या सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे वेतन व महागाई भत्ता, दोन रुपये किलो तांदूळ इ.प्रकारच्या मागण्या दिसतात. जीवनाश्यक वस्तूचा पुरवठा नियमित व्हावा ही जनतेची व्यवस्थेकडून जनतेची प्राथमिक अपेक्षा असते. मानवाच्या मूलभूत गरजा, शिक्षण आणि आरोग्य आदी सुविधा पुरविण्याची मागणी उद्‌भवते तेव्हा त्या पूर्ण करण्याची क्षमता राजकीय व्यवस्थेजवळ असावी लागते. त्याशिवाय राज्यव्यवस्था आपली मूलभूत जबाबदारी पार पाडू शकणार नाही.

**२) वर्तन नियंत्रणाच्या मागण्या-** राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेला आव्हानित करणारी दुसरी महत्त्वाची जबाबदारी नियंत्रणाच्या क्षेत्रातील असते. व्यवस्थेला व्यक्तीचे वर्तन नियंत्रण करण्यासाठी अनेक प्रकारचे निर्बंध, नियम व कर्तव्यपालनाची सक्ती करणाऱ्या नियमांची निर्मिती करावी लागते. नागरिकांच्या वर्तन नियंत्रणासोबत समाजकंटकाचे निर्दालन करून नागरिकांचे जीवित, वित्त व अधिकर सुरक्षित ठेवणे आवश्यक असते. त्यासाठी वर्तन नियंत्रण करण्याच्या मागण्या व्यवस्थेला पूर्ण कराव्या लागतात. त्यात आरोग्य विषयक, खरेदी विक्री विषयक इ.बाबत वर्तन नियंत्रित करण्याची मागणी समाविष्ट असतात. या मागण्या संदर्भात समाजात दोन गट असल्याने व्यवस्थेवर परस्पर विरोधी दडपणे येतात. नियंत्रणाच्या मागण्यातील हितसंबंधियांकडून येणाऱ्या अंतविरोधी दडपणात योग्य समन्वय साधण्याचे कार्य राजकीय व्यवस्थेला पार पाडावे लागते. उदा.समान नागरी कायदा, दारूबंदी इ. या कार्यात व्यवस्था अपयशी ठरल्यास व्यवस्थेचे स्थैर्य धोक्यात येऊ शकते.

**३) राजकीय सहभागाच्या मागण्या-** समाजातील व्यक्तींना व गटांना उत्पादनातील रास्त वाटा मिळावा ही जनतेची अपेक्षा असते. त्यामुळे ही जबाबदारी राजकीय व्यवस्था टाळू शकत नाही. उत्पादनातील वाटयासोबत व्यक्तींना गुणवत्तेनुसार योग्य तो सन्मान देणे आणि गुणवानांना राजकीय पदे व विकासाची संधी देणे आवश्यक असते. आधुनिक काळात राजकीय व्यवस्थेमध्ये सहभाग मिळावा या उद्देशाने काही मागण्या केल्या जातात. यात मतदानाचा हक्क१८ वर्षावरील प्रौढाना द्यावा, स्त्रियांना ३३% आरक्षण, अकार्यक्षम प्रतिनिधीना परत बोलविण्याचा प्रत्यावाहनाचा अधिकार द्यावा इ.स्वरूपाच्या मागण्या असतात. या मागण्या व्यवस्थेने पूर्ण न केल्यास सहभाग नाकारलेले घटक व्यवस्थेला असहकार्य किंवा विरोध करतात. हा विरोध वाढत गेल्यास व्यवस्थेची स्थिरता धोक्यात येऊ शकते. हा विरोध प्रमाणापेक्षा वाढत गेल्यास क्रांती होऊन व्यवस्थेत बदल होऊ शकतो. म्हणून या मागण्याप्रति प्रतिसाद देणे व्यवस्थेची जबाबदारी असते.

**४) संसूचन संबंधीच्या मागण्या-** राजकीय व्यवस्थेची रूपांतराची प्रक्रिया प्रतिसाद देण्याचा एक भाग असते. परिस्थितीकडून येणाऱ्या मागण्यांना प्रतिसाद देणे हे व्यवस्थेचे प्रमुख कार्य असते. हे कार्य प्रत्येक व्यवस्था करतच असतात. परंतु एखादी राजकीय व्यवस्था मागण्याकडे दुर्लक्ष करून दडवणूक करण्याचा प्रयत्न करते. जनसंपर्क माध्यमाचा वापर करून व्यवस्थेच्या एकतर्फी भूमिकाची मांडणी करते. त्यावेळेस व्यवस्थेच्या अधिमान्यतेचा प्रश्न निर्माण होता. राजकीय संसूचन राजकीय व्यवस्थेतील महत्त्वपूर्ण कार्य करत असते. संसूचनाबाबत परिस्थिती कडून अनेक मागण्या केल्या जातात.उदा. चित्रपट व नाटके यावरील सेंन्सार मंडळ बरखास्त करावे,आकाशवाणी सरकारी नियंत्रणापासून मुक्त करावे, वर्तमानपत्रावरील बंधने कमी करावी इ.प्रकारच्या मागण्या या प्रकारात मोडतात.

प्रत्येक राजकीय व्यवस्थेत चारही क्षमता सारख्या असत नाही. हुकूमशाही व्यवस्थेत नियंत्रणात्मक क्षमता जास्त असते. हुकूमशाही व्यवस्थेत मागण्या नियंत्रित केल्या जातात. परंतु त्याची प्रतिसाद क्षमता कमी असते. याउलट लोकशाहीत प्रतिसाद क्षमता जास्त असते. ज्या व्यवस्थेची उत्पादन क्षमता जास्त असते तेथे मागण्या लवकर मंजूर होतात.

**क) संपोषणाचे कार्य-** वरील दोनही कार्याइतकेच संपोषणाचे कार्य महत्त्वपूर्ण असते. या कार्यात पुढील दोन कार्याचा समावेश होतो.

१) **राजकीय भरती-** एखादया मोटारीचे कार्य व्यवस्थित चालावयाचेअसेल तर वंगणानी आवश्यकता असते. त्याचप्रमाणे वाहनाचे सुटे भाग बदलण्याची गरज असते. त्याप्रमाणे राजकीय व्यवस्थेत कार्य करण्यासाठी विविध भूमिका पार पाडणाऱ्या व्यक्तीची गरज असते. त्यांनी आपल्या भूमिका योग्य प्रकारे बजाविण्यास तयार करणे हे व्यवस्थेचे महत्त्वाचे कार्य असते. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्थेत अनेक उपविभाग अस्तित्वात असतात. या वेगवेगळया विभागात अनेक प्रकारच्या विविध भूमिका व्यक्तींना पार पाडाव्या लागतात. त्या भूमिका पार पाडण्यासाठी योग्य व्यक्तीची नेमणूक करणे, त्यांना प्रशिक्षण देणे हे संपोषणाचे कार्य व्यवस्थेला पार पाडावे लागते. त्यास राजकीय भरतीचे कार्य असे म्हणतात.

**२) राजकीय सामाजीकरण-** समाजाचे राजकीयकरण करणे हे व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण कार्य असते. प्रत्येक राजकीय व्यवस्था दीर्घकालीन चालणारी व्यवस्था म्हणून टिकून राहण्यासाठी प्रत्येक व्यवस्थेला सामाजीककरणाचे कार्य पार पाडावे लागते. यात जनतेवर राजकीय संस्कार करून किंवा राजकारणाबद्दल जागृती व माहिती पुरविणे इ. कार्य सामाजीकरणासाठी करावे लागते. सामाजीकरणाच्या प्रक्रियेत राजकीय संस्कृती, मूल्ये, श्रद्धा, दृष्टिकोन भावी पिढयांना सक्रंमित केल्या जातात. म्हणून राजकीय सामाजिकरण ही एक संस्कार क्रिया मानली जाते. एखादी व्यवस्था योग्य प्रकारे चालावयाची असेल तर त्यासाठी राजकीय सामाजीकरण आवश्यक असते. बदलत्या परिस्थितीनुसार गतिमान होण्यासाठी ही सामाजीकरणाची गरज असते.

**प्र.२ रा व्यवस्थावाद दृष्टिकोन म्हणजे काय ते सांगुन या दृष्टिकोनाचे मुख्य प्रकार सांगा?**

व्यवस्थावाद हा आधुनिक राज्यशास्त्रातील वस्तूनिष्ठ व आंतरशास्त्रीय दृष्टिकोन मानला जातो. डेव्हीड ईस्टन, आल्मंड, पॉवेल व कॉप्लान हे लेखक याचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत. व्यवस्था हा शब्द जीवशास्त्रातून आलेला आहे. लुडविंग फॉन या शास्त्रज्ञाने सर्व भौतिक शास्त्रे परस्परसंबंधित आहेत म्हणून परस्परांच्या मदतीने त्यांचा अभ्यास करावा हा दृष्टिकोन मांडला. टॉलकॉट पार्सन्स यांनी व्यवस्थावादाचा अभ्यास समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी सर्वप्रथम केला. तर डेव्हीड ईस्टनने The Political System ग्रंथात हा दृष्टिकोन राज्यशास्त्रात आणला. गॅबिएल आल्मंड यांनी संरचना-कार्यवादाच्या स्वरूपात तर कार्ल डॉयश यांनी संसूचनलक्षी संशोधनात व्यवस्थात्मक दृष्टिकोन अवलंब केला. राज्यशास्त्रात शास्त्रयुद्ध सिद्धांत मांडणी करणे या दृष्टिकोनामुळे शक्य होईल हा विश्वास ईस्टन यांनी व्यक्त केला.

**व्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेचा अर्थ आणि व्याख्या-** व्यवस्था म्हणजे विशिष्ट सीमारेषेच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या परस्परावंलबी संबंधातून निर्माण होणारी कार्यात्मक रचना होय. उदा.शरीर हे एक व्यवस्था आहे. शरीराचे विविध अवयव त्यातील एक उपव्यवस्था आहे. शरीराचे अवयव स्वतंत्र काम करित असले तरी शरीराबाहेर काढल्यास ते मृत होतील. व्यवस्था म्हणजे परस्परसंलग्न व परस्परांशी आंतरक्रिया करणाऱ्या घटकाचा संच असते. म्हणजे एकमेकाशी संबंधित घटकाचा संच समजून विश्लेषण करणे याला व्यवस्था विश्लेषण असे म्हणतात.

राजकीय व्यवस्था म्हणजे काय? या प्रश्नावर वेगवेगळी मते आहेत. आल्मंडच्या मते राजकीय व्यवस्था ही समाजात अधिकृत आदेश देणारी आणि त्यांची बंधनकारकरितीने अंमलबजावणी करणारी व्यवस्था होय. राजकीय व्यवस्था शब्द प्रयोगामुळे समाजातील समस्यांचा अभ्यास करतांना तुटकपणे अभ्यास न करता इतर ज्ञानशाखाच्या मदतीने समग्र विचार केला पाहिजे म्हणून हा दृष्टिकोन आंतरविद्याशाखीय मानला जातो. व्यवस्थावादाचा उपयोग संपूर्ण राजकीय समाजाच्या अभ्यासासाठी करता येतो. उदा.शरीरात अंतर्गत व्यवस्था असतात. तसेच राजकीय व्यवस्थेत विविध उपव्यवस्था असल्यामुळे त्यांचा अभ्यास व्यवस्थावाद दृष्टिकोनानुसार होऊ शकतो. व्यवस्थावाद दृष्टिकोनाच्या अंतर्गत दोन विचार प्रवाह आढळतात.

**अ) डेव्हिड ईस्टनचा आदान-प्रदान दृष्टिकोन-** ईस्टनेने राजकीय व्यवस्था आणि पर्यावरण यांच्यातील आंतरसंबंधावर लक्ष केंद्रित केले. आहे. राज्यव्यवस्थेच्या कक्षा स्पष्ट करण्यासाठी तो राजकीय जीवनाची पुढीलप्रमाण व्याख्या करतो. "समाजासाठी अधिकारपूर्ण धोरण ठरवणे आणि ते अंमलात आणणे या प्रक्रिया ठळकपणे प्रभावित करणाऱ्या सर्व प्रकारच्या कृती राजकीय जीवनाचा भाग असतात. समाजासाठी होणारी धोरणाची निर्मिती व अंमलबजावणीसाठी ज्या ज्या कृती करतो त्यास राजकीय कृती असे म्हणतात. संपूर्ण समाजासाठी अधिकारयुक्त मूल्य निर्धारण करणे हे राज्यव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण कार्य असते." ईस्टनच्या मते कोणत्याही समाजात मूल्यांचे अधिकृत निर्धारण करणाऱ्या अंतर्गत क्रियाचा संच म्हणजे राजकीय व्यवस्था होय. मूल्याचे अधिकृत निर्धारण करण्याचा अधिकार राजकीय व्यवस्थेला असल्यामुळे इतर सामाजिक व्यवस्थापेक्षा वेगळी वा श्रेष्ठ असते. मूल्य म्हणजे समाजाच्या दृष्टीने ज्यांना किंमत वा महत्त्व अशा गोष्टी उदा.शहरातील सहदारीच्या भागात वाहन धारकांची रस्ता रूंदीची मागणी आहे कारण त्यातून त्यांची सोय होणार आहे.म्हणून सोय हे एक मूल्य आहे.

मूल्यनिर्धारणासाठी राजकीय व्यवस्थेला विविध प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. अंतर्गत व बाहय घटकाकडुन सतत काही मागण्या होत असतात त्याला आदान असे म्हणतात. आदान मार्फत व्यवस्थेवर दडपण पडून व्यवस्थेला मागण्यांचे रूपांतर धोरणात करावे लागते. मागण्यांवर व्यवस्थेने केलेली उपाययोजना म्हणजे प्रदान होय. प्रदानावर अनुकूल किंवा प्रतिकूल प्रतिक्रिया समाजातून येतात. त्यातून व्यवस्थेला पाठिंबा किंवा विरोध निर्माण होतो. त्याला प्रत्यादान म्हणतात. प्रत्यादानातून नवीन मागण्या निर्माण होतात. त्यामुळे आदान प्रक्रियेला चालना मिळते. अशा पद्धतीने आदान-प्रदान व प्रत्यादान प्रक्रिया राजकीय व्यवस्थेत सातत्याने चालू असते.

आदानाचे प्रदानात रूपांतर करणे राज्यव्यवस्थेचे मौलिक कार्य असले तरी तिला स्वतःचे असे प्रयोजन व साध्य असते. त्या साध्याच्या दिशेने वाटचाल करतांना वारंवार तणाव येतात या प्रसंगी राजकीय व्यवस्था नियंत्रणात्मक अधिकार वापरून तर प्रसंगी पाठिंबा बळकट करून राज्यव्यवस्था त्या तणावावर मात करीत असते. राज्यव्यवस्था तणावांवर नियंत्रण करण्यासाठी वेळ पडल्यास आपल्या अंतर्गत रचनेत बदलही करते. माहितीची देवाणघेवाण करण्याच्या अधिक प्रभावी पद्धती अंमलात आणते. राजकीय व्यवस्था नुसती टिकून राहणे महत्त्वाचे नसते तर कार्यक्षम राहणे आवश्यक असते. तिच्या माध्यमातून अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण जोपर्यंत होत राहिल तोपर्यंत तिची कार्यक्षमता कायम राहिल. त्यामुळे राज्यशास्त्रीय अध्ययनासाठी राजकीय व्यवस्था हे एकक निवडून तिचे आंतरक्रियात्मक विश्लेषणाला पर्याय नाही असे प्रतिपादन ईस्टनने केलेले आहे.

**ईस्टनच्या दृष्टिकोनाची वैशिष्टये-**

१. संपूर्ण व्यवस्था हा विश्लेषणाचा मुख्य घटक असून व्यवस्थेचे बाहय व अंतर्गत व्यवस्थेशी होणारे संबंध संशोधनाचे मुख्य क्षेत्र असते.
२. राजकीय व्यवस्थेची निर्मिती समाजात होत असल्याने सामाजिक व राजकीय संदर्भात मानवी वर्तनाचे प्रमुख पैलू हा दृष्टिकोन विचारात घेतो.
३. राजकीय व्यवस्था बंदिस्त नसून गतिमान असते. नवी आवाहने व आघात निर्माण झाल्यास व्यवस्था प्रतिकार क्षमता वापरते. म्हणून व्यवस्थेचे स्थैर्य कायम राहून आवाहनाचे रूपांतर परिवर्तनात होते.
४. राजकीय व्यवस्थेला निश्चित सीमा असते. स्थल काल व परिस्थितीनुसार सीमा बदलत असते. प्रत्येक राजकीय व्यवस्थेच्या अंतर्गत व बाहय सीमा भिन्न-भिन्न असतात.
५. राजकीय व्यवस्थेचे समर्थन हा महत्त्वपूर्ण घटक असतो. व्यवस्थेवर कितीही आघात झालेला असला तरी पुरेसे समर्थन असेल तर व्यवस्थेची प्रतिकार क्षमता वाढत जाते. आदान व प्रत्यादानाचे रूपांतर प्रदानात होत असेल तर व्यवस्थेचे समर्थन वाढते.

**परिक्षण वा दोष-** ईस्टनने राज्यशास्त्राला दिलेले योगदान श्रेष्ठ असले तरी या दृष्टिकोनात पुढील उणिवा आहेत.

१. गतिमान व परिवर्तनाबद्दल विचार मांडताना संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थेला पोषक असते असे ईस्टनला वाटते पण क्रांतीमुळे व्यवस्थेत वेगाने परिवर्तन होते याबद्दल तो कोणतेही विचार मांडत नाही.
२. सत्ता, प्रभाव आणि जनसमुहाच्या राजकारणाचा पुरेसा सखोल विचार व्यवस्थावादात ईस्टनने केलेला नाही.
३. राजकीय म्हणजे काय? याचे स्पष्टीकरण ईस्टने यांनी न केल्यामुळे सामाजिक व राजकीय आंतरक्रियात भेद स्पष्ट करणे अवघड जाते.
४. अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण हे ईस्टनचे शब्द संदिग्ध आहेत. त्यातून राजकीय व्यवस्थेची कोणतीच ठोस कल्पना येत नाही. राजकीय व्यवस्थेचे स्पष्टीकरण न होता केवळ संकल्पनीकरण होते. परिणामी तर्कदृष्टया शंकास्पद, संकल्पनात्मक दृष्टया किचकट, अनुभवप्रामाण्याच्या दृष्टीने कुचकामी अशी अत्यंत अमूर्त संरचना ईस्टनच्या प्रतिपादनातून उभी राहते, अशी टीका युजीन मीहानने केली आहे.
५. ईस्टने राजकीय व्यवस्था संज्ञा वापरतो पण राजकीय व्यवस्थे संदर्भात स्पष्टीकरण देत नाही त्यामुळे क्रेस हा लेखक राजकारणाबद्दलची पोकळ दृष्टी असे व्यवस्थावादाचे वर्णन करतो.

**ब) ग्रॅबिएल आल्मंडचा रचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन स्पष्ट करा?**

ईस्टनने मांडलेल्या आदान प्रदान दृष्टिकोनाच्या आधारावर आल्मंडने The Developing Nation ग्रंथात रचनात्मक कार्यवाद दृष्टिकोन मांडला. कोणत्याही राजकीय व्यवस्था कार्य करते तेव्हा तिला रचनेची आवश्यकता असते. फ्रेंच विचारवंत मॉन्टेक्स्युने सत्ता विभाजनाचा सिद्धात मांडला. या सिद्धांतानुसार कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ या शासनाच्या तिन्ही संस्था एका व्यक्तीच्या हातात न ठेवता एकमेकापासून स्वतंत्र ठेवाव्यात हे तत्व सत्ताविभाजन सिद्धात मांडले. या सिद्धाताचा प्रभाव अमेरिकेच्या राज्यघटनेवर पडलेला आहे. त्या आधारावर आल्मंडने रचनात्मक कार्यवादाची मांडणी केली.

आल्मंडने व्यवस्थात्मक दृष्टिकोनाचा अवलंब तौलनिक राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी केला. त्यांने राज्यव्यवस्थेतील संरचनाचा विचार कार्याच्या माध्यमातून करतो. प्रत्येक राज्यव्यवस्थेला काही कामे पार पाडावीच लागतात. ती कामे एखादी राज्यव्यवस्था किती कार्यक्षमतेने पार पाडते यावरून ती राजकीय विकासाच्या कोणत्या पायरीवर आहे हे ठरवता येते. या कार्याच्या अनुषंगाने अभ्यासक काही प्रश्न उपस्थित करतात. राजकीय व्यवस्थेत अमूक कार्य कोण करते? कोणत्या यंत्रणेमार्फत करतो? किती कार्यक्षमपणे करतो? या प्रश्नाच्या उत्तरामधून राज्यव्यवस्थांचा अभ्यास केला जाऊ शकतो. एका राजकीय व्यवस्थेतील संरचना व कार्य यांची तुलना दुसऱ्या राजकीय व्यवस्थेची संरचना व कार्य यांच्याशी करता येईल हा विश्वास आल्मंडने व्यक्त केला.

**रचनात्मक कार्यवाद अर्थ व व्याख्या-** "विशिष्ट परिसिमेत आपल्या अंतर्गत घटकांशी परस्परसंबंध ठेवून कार्य करणारी यंत्रणा म्हणजे व्यवस्था होय" व्यवस्थेतील घटकांचा परस्परांशी निश्चित संबंध असावा लागतो. व्यवस्थेला निश्चित कार्य असते. ते योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी व्यवस्थेच्या घटकांमध्ये समन्वय असणे आवश्यक असते.

राजकीय व्यवस्था म्हणजे समाजात अधिकृत आदेश देणारी आणि अंमलबजावणी करण्याचा अधिकार असलेली संस्था होय. राजकीय व्यवस्था ही संकल्पना सर्वांना मान्य केली आहे. प्रत्येक व्यक्तीला जीवनात अनेक भूमिका पार पाडव्या लागतात. त्या भूमिकेवरून राजकीय व्यवस्थेचे स्वरूप ठरते. उदा.राजकीय नेता, पिता, मतदान, अभिनेता अशा अनेक भूमिका व्यक्ती पार पाडते. म्हणजे व्यक्ती एकाच वेळेस सामाजिक व राजकीय व्यवस्थेचा घटक बनु शकते. व्यक्तीची भूमिका बदलली तर व्यवस्थेचे स्वरूप बदलते.

राज्यव्यवस्था जसजशी विकसित होत जाते तसतशी राजकीय रचना बिगर-राजकीय प्रश्नांपासून अलग होत होतात. कार्यानुसार राजकीय संरचनेतील वेगळेपणा स्पष्ट होत जातो. बदलत्या काळाच्या व परिस्थितीच्या गरजांनुसार नव्या राजकीय संरचना निर्माण होणे आवश्यक असते. या प्रक्रियेला आल्मंड राजकीय संरचनांचे भिन्नीभवन नाव दिले आहे. हे राजकीय भिन्नीभवन राजकीय व्यवस्थेच्या वाढ राजकीय विकासाचे लक्षण असते. संरचनेच्या भिन्नीभवनाच्या आधारे राज्यव्यवस्थेतील विकास प्रक्रियेचा अभ्यास केला जाऊ शकतो.

**रचना -** प्रत्येक व्यक्तीस समाजात व राजकीय व्यवस्थेत विशिष्ट स्थान असते. त्या स्थानानुसार विशिष्ट कार्य व्यक्तीला करावी लागतात. निश्चित कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या यंत्रणेला रचना म्हणतात. रचनेत कार्याला महत्त्व नसून व्यक्तीच्या भूमिकेला महत्त्व असते. राजकीय व्यवस्थेची रचना पुढील प्रमाणे

**राजकीय व्यवस्था**

| | | | |
|---|---|---|---|
| कायदेमंडळ | | कार्यकारीमंडळ | न्यायमंडळ |
| उपव्यवस्था | | उपव्यवस्था | उपव्यवस्था |
| लोकसभा | राज्यसभा | कार्यालयीन प्रमुख | न्यायाधीश |
| सभापती | | लेखनिक | वकिल |
| सचिव | | शिपाई | आरोपी |
| मार्शल | | | साक्षीदार |
| प्रेषक | | | प्रेषक |

**राजकीय व्यवस्थेची कार्य-** आल्मंडच्या मते राजकीय व्यवस्था सर्वसमावेश्यक असून व्यवस्थेच्या अंतर्गत सुरू असलेल्या आदान-प्रदान प्रक्रिया परस्परावलंबी असतात. या आंतरक्रियेच्या कोणत्याही क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल वा परिवर्तन झाल्यास त्यांचा परिणाम इतर सर्व क्षेत्रात होतो. त्यामुळे संपूर्ण व्यवस्थेत परिवर्तन होऊ शकते. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत विशिष्ट संरचना विशिष्ट कार्य पार पाडतात. विशिष्ट संरचनेला आपले कार्य पार पाडता आले नाही तर नव्या संरचनेमार्फत ती कार्य पार पाडली जातात. राजकीय व्यवस्थेचे स्थैय, अस्तित्वास पोषक कार्यांना विधायक कार्य तर मारक कार्यांना घातक कार्य असे म्हणतात. या कार्यात आद्रानाची चार कार्य आणि प्रदानाची सात कार्य अशी सात कार्य आल्मंडने सांगितलेली आहेत. ती पुढील प्रमाणे होत.

**अ) आदान कार्य -**

१. **राजकीय सामाजीकरण आणि राजकीय भरती-** राजकीय सामाजीकरणाच्या मार्फत लोकांवर राजकीय संस्कार करून राजकारणातील अनुभव व ज्ञान उपलब्ध करून देता येतो. त्यामुळे लोक राजकीय व्यवस्थेत सहभागी होतात. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत शासनाचे वेगवेगळे स्तर असतात. त्या वेगवेगळया स्तराना ज्या नियुक्ता, नेमणुका कराव्या लागतात त्याला राजकीय भरती असे म्हणतात. राजकीय भरतीच्या माध्यमातून लोकांना राजकीय सहभाग मिळवून देता येतो. व्यवस्थेत सातत्याने भरती ही चालू असते. राजकीय भरतीच्या माध्यमातून शासनाच्या पातळयावर कार्यक्षम, लायक अधिकाऱ्यांची नियुक्ती करून राजकीय व्यवस्था कार्यक्षमपणे पार पाडू शकते. त्यामुळे राजकीय भरतीचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण असते.

२. **हितसंबंधाचा अविष्कार-** व्यक्ती आणि व्यक्तीसमूह ज्या प्रक्रियेनुसार आपल्या मागण्या निर्णय घेणाऱ्या शासनातील श्रेष्ठीसमोर ठेवतात. त्या प्रक्रियेला हितसंबंधाचे प्रकटीकरण किवा अविष्कार म्हणतात. हितसंबंधाचे प्रकटीकरण सभा, संमेलने, भाषणे, परिषदा, मोर्चे, निदर्शने, घेराव यासारख्या कृतीतून घडते. हे कार्य राजकीय पक्ष वा हितसंबंधी संघटना करत असतात.

३. **हितसंबंधाचे सुसूत्रीकरण-** राजकीय व्यवस्थेत हितसंबंधाचे सुसूत्रीकरण करावे लागते. विविध हितसंबंधाचा समन्वय करून त्यानुसार धोरण निश्चित करावे लागते. काही विशिष्ट व्यक्तीना भरती करून हे कार्य साधले जाते. राजकीय पक्ष हे हितसंबंधाचे सुसूत्रीकरणाचे मुख्य साधन असते. विशिष्ट हितसंबंधी किंवा आपल्या मागण्यांच्या परिपूर्तेसाठी एकत्र येऊन गट किंवा राजकीय पक्ष स्थापन करून राजकीय प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजेच हितसंबंधाचे सुसूत्रीकरण होय.

४. **राजकीय संसूचन-** राजकीय संसूचनामुळे समाज आणि राजकीय व्यवस्था यात त्यामुळे संपर्क प्रस्थापित होतो. राजकीय संसूचन म्हणजे जनतेच्या मागण्या वेगवेगळया साधनाच्या माध्यमातून राजकीय व्यवस्थेशी संपर्क साधुन पोहचविण्याचे कार्य करत असतात. त्या माहितीच्या आधारावर निर्णय प्रक्रिया वा प्रदान प्रक्रिया होत असते. निर्णय अंमलात आणल्यानंतर ज्या गोष्टी प्रत्यादान प्रक्रियेत लक्षात येतात त्या व्यवस्थेकडे पोहचविण्याचे कार्य राजकीय संसूचन यंत्रणेमार्फत पार पाडले जाते. हे कार्य वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, चित्रपट, दूरचित्रवाणी माध्यमे राजकीय संसूचनाचे कार्य करतात.

**ब) प्रदान कार्य-** नियम निर्मिती, नियमांची अंमलबजावणी आणि नियमावर न्यायदान ही आल्मंडने राजकीय व्यवस्थेची प्रदानात तीन पारंपारिक कार्य सांगतिली आहेत. त्यात तो कोणताही बदल करत नाही. तो प्रत्यादानाचा उल्लेख करत नाही कारण हितसंबंधाचा अविष्कार व सुसूत्रीकरण दोन्ही कार्याचा समावेश आदानात केलेला असल्याने त्याला प्रत्यादान कार्याची आवश्यकता वाटत नाही.

वरील कार्य कार्यक्षमपणे पार पाडण्यावर राजकीय व्यवस्थेचे संतुलन अवलंबून असते. संतुलन म्हणजे राजकीय व्यवस्थेच्या विविध घटकांमध्ये समतोल राहून व्यवस्था स्थिर राहते. नव्याने आलेले बदल सामावून घेण्याची क्षमता व्यवस्थेत असली पाहिजे. परिवर्तनाच्या आदानाशी राजकीय व्यवस्था कशी तोंडमिळविणी यावरून तिची क्षमता ठरत असते. साधनसामुग्री काढून घेण्याची, व्यक्ती व समूहास नियंत्रण करण्याची आणि वस्तू व सेवा वितरित करण्याची क्षमता व्यवस्थेजवळ असली पाहिजे. याशिवाय देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून येणाऱ्या मागण्यांना प्रतिसाद देण्याची

आणि आकर्षण व निष्ठा टिकवून ठेवणारी प्रतीके निर्माण करण्याची क्षमता असावी लागते. कारण राजकीय व्यवस्थेतील अभिजनांकडून आणि पर्यावरणाकडून, इतर घटकांकडून राज्यव्यवस्थाकडून आवाहने उभी केली जातात. ती समर्थपणे पेलता आलीत तर राज्यव्यवस्था स्थिर व संतुलित राहते.

**दोष वा टिका-** आल्मंडच्या सिद्धांत पुढील दोष आहेत.

१. आल्मंडने राजकीय व्यवस्थेची उद्दिष्टये व कार्य व स्पष्ट केलेली असले तरी आंतरक्रियेचे स्वरूप व प्रत्यादानाचे याचे स्पष्टीकरण केलेले नाही. आंतरक्रिया कोणत्या सूक्ष्म कारणांमुळे निर्माण होतात हे या दृष्टिकोनाद्वारे समजू शकत नाही. त्यामुळे कार्याचे सूक्ष्म विवेचन झालेले नाही.
२. आल्मंडने आदान कार्य आधुनिक पद्धतीने सांगितले पण प्रदान कार्य परंपरागत पद्धतीने आहेत. शासनाच्या तीन विभागाच्या कार्याचा समावेश आहे.
३. हा दृष्टिकोन स्थैर्य, संतुलन यावर आत्यंतिक भर देत असल्यामुळे हा दृष्टिकोन स्थितिवादी व पुराणमतवादी ठरला आहे.
४. हा दृष्टिकोन व्यक्तीचा विचार अन्य व्यक्तीशी होणाऱ्या तिच्या आंतरक्रियेच्या अनुषंगाने करतो. व्यक्तीच्या फक्त बाह्य व व्यक्त राजकीय भूमिकाचा अभ्यास करतो.
५. रचनात्मक कार्यवादामुळे विकसित आणि विकसनशील देशातील तुलनात्मक अभ्यास होऊ शकेल असा दावा केला. पण रचनात्मक कार्यवाद पश्चिमी प्रगत व्यवस्थाच्या अभ्यासासाठी वापरता येते म्हणून हा दृष्टीकोण अपूर्ण व संदिग्ध आहे अशी टिका केली जाते.
६. मार्क्सवादाला पाश्चात्य पर्याय उभा करण्याचा हेतू कार्यवादाच्या उभारणीमार्ग उद्देश होता. त्या आधारावर प्रत्येक व्यवस्थेच्या ठिकाणी अस्तित्व सातत्य असते. त्या बळावर ती सर्व ताण-तणाव व अरिष्टे यांच्यावर मात करू शकते असे प्रतिपादन या दृष्टिकोनाच्या पुरस्कर्त्यांनी केले आहे पण भांडवलशाही व्यवस्थेतील अंतर्विरोध कमी होण्याऐवजी वाढत गेल्याने त्याचा प्रयत्न विफल ठरला ही टीका केली जाते.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

**१.** राजकीय व्यवस्था म्हणजे काय?
उत्तर- डेव्हीड ईस्टनच्या मते अधिकृत निर्णय घेऊन बंधनकारक रितीने अंमलबजावणी करण्याचा अधिकार प्राप्त झालेल्या समाजातील व्यवस्थेला राजकीय व्यवस्था असे म्हणतात.
**२.** राजकीय व्यवस्थेच्या रूपांतराच्या कार्यातील महत्वपूर्ण कार्य स्पष्ट करा.
उत्तर- रूपांतराच्या कार्यात आदान कार्य, प्रदान कार्य आणि प्रत्यादान कार्य ही तीन कार्य महत्वपूर्ण आहेत.
**३.** रचनात्मक कार्यवादाची संकल्पना कोणी आणि कोणत्या ग्रंथात मांडली.
उत्तर- ग्रॅबिएल आल्मंडने The Developing Nation ग्रंथात रचनात्मक कार्यवाद दृष्टिकोन मांडला आहे.
**४.** राजकीय व्यवस्था ही संकल्पना राज्यशास्त्रात कोणी व कोणत्या ग्रंथात मानली आहे.
उत्तर- राज्यशास्त्रात डेव्हीड ईस्टने The Political System ग्रंथात मांडलेली आहे.
**५.** राजकीय व्यवस्थेच्या संपोषणाची दोन कार्य कोणती?
उत्तर- राजकीय सामाजीकरण आणि राजकीय भरती हे राजकीय संपोषणाची दोन प्रमुख कार्य आहेत.
**६.** ग्रॅबिएल आल्मंडनी सांगातिलेली आदानाची कार्य सांगा.
उत्तर- आल्मंडने राजकीय भरती आणि राजकीय सामाजिकरण, हितसंबंधाचे एकत्रीकरण व अविष्कार आणि राजकीय संसूचन ही कार्य सांगितली आहेत.
**७.** राजकीय क्षमतेच्या मागण्यातील दोन मागण्या कोणत्या आहेत.
उत्तर- उत्पादन व सेवा क्षेत्रातील मागण्या, वर्तन नियंत्रण करण्याच्या मागण्या, राजकीय सहभागाच्या मागण्या, राजकीय संसूचनासंबंधीच्या मागण्या इत्यादी मागण्याचा समावेश राजकीय क्षमतेच्या मागण्यात होता.

## प्रकरण ३ रे
## राजकीय संस्कृती

**प्र.१ ला. राजकीय संस्कृतीची व्याख्या सांगुन राजकीय संस्कृतीवर प्रभाव पाडणारे घटक वा घटक स्पष्ट करा?**

**राजकीय संस्कृतीचा अर्थ-** प्रत्येक राष्ट्राला स्वतःची विशिष्ट अशी संस्कृती असते. त्या संस्कृती बद्दल राष्ट्राला अभिमान देखील असतो. समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची काही गुणधर्म असतात. ते गुणधर्म व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडवतात. ते गुणधर्म सामाजिक व राजकीय परिस्थितीतून निर्माण होतात. प्रत्येक व्यक्तीचे राजकीय व्यक्तिमत्त्व भिन्न असते. हे व्यक्तिमत्त्व राजकीय चर्चा व भाषणातून व्यक्त होते. एखादी व्यक्ती शेजारिल राष्ट्रावर आक्रमण करावे हे मत मांडते तेव्हा त्या व्यक्तीचे राजकीय व्यक्तिमत्त्व आक्रमक मानले जाते. त्याच व्यक्ती सारखी मते समाजातील बहुसंख्य लोकांकडून मांडली जात असतील तर तो देश वा समाज आक्रमणवादी मानला जातो. परिणामतः त्या देशाची संस्कृती आक्रमक मानली जाते. प्रत्येक देशाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती भिन्न-भिन्न असल्याने प्रत्येक देशाची राजकीय संस्कृती भिन्न भिन्न असते.

राजकीय संस्कृती ही सामाजिक संस्कृतीचा भाग असते. समाजाशास्त्रात संस्कृती या संकल्पना ज्या अर्थाने वापरली जाते, त्यात अर्थाने राज्यशास्त्राज्ञांनी राजकीय संस्कृती संकल्पना वापरली आहे. समाजाच्या सभासद म्हणून व्यक्तीने मिळविलेल्या ज्ञान, कला, श्रद्धा, नीती, कायदे, रूढी व इतर क्षमता या सर्वांचा एकत्रित समुच्चय म्हणजे संस्कृती होय. व्यक्ती ज्या समाजात व समुदायात वाढते तेथील लोकांच्या राजकारणाविषयीच्या धारणा, भावना व जाणिवा ती शिकत असते आणि ती आपल्या व्यक्तिमत्त्वातून भिनवत असते. राजकीय व्यवस्थेविषयी लोकांच्या अभिवृत्ती, श्रद्धा, जाणिवा व अभिमुखता असतात त्यांचा अंतर्भाव त्या समाजाच्या राजकीय संस्कृतीत होत असतो. राजकीय प्रक्रियांना अर्थपूर्णता व आकार राजकीय संस्कृतीत मिळते.

१) **मॅक्रेटिस** - एखादया राजकीय समाजाने सामान्यपणे स्वीकारलेले राजकीय उद्दिष्टये म्हणजे राजकीय संस्कृती होय.
२) **सिडने व्हर्बा-** अनुभवातून निर्माण झालेल्या श्रद्धा, देशातील प्रतिके व मूल्य यांची गोळाबेरीज म्हणजे राजकीय संस्कृती होय.
३) **आल्मंड** - ज्या मूल्यांच्या व प्रेरणाच्या चौकटीत एखादी राजकीय व्यवस्था कार्य करत असते. ती चौकट म्हणजे राजकीय संस्कृती होय.
४) **वीर-** शासनसंस्थेचे नियंत्रण कसे ठेवावे व कशावर ठेवावे या संबंधीची मूल्ये, श्रद्धा, व भावनिक दृष्टिकोन यांचा समुच्चय म्हणजे राजकीय संस्कृती होय.

**राजकीय संस्कृतीवर प्रभाव पाडणारे घटक वा आधार-** प्रत्येक राजकीय व्यवस्थेवर ज्या विशिष्ट वा प्रेरणा लोकात दिसून येतात. त्यांच्या निर्मितीमागे काही कारणे असतात. या कारणांनाच राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक किंवा राजकीय संस्कृतीवर प्रभाव पाडणारे घटक असे म्हणतात येईल ते घटक पुढीलप्रमाणे होत.

१. **भौगालिक वा नैसर्गिक परिस्थिती-** देशाची भौगोलिक संरचना हा घटक लोकांच्या अभिवृत्तींना देण्याबाबत निर्णायक महत्त्वाचा असतो. दुर्गम भागात राहणाऱ्या जनजातींच्या राजकीय संस्कृतीत बदल होण्याची शक्यता फार कमी असते. कारण बाह्य जगाशी त्यांचा संबंध फार कमी असतो. याउलट जे प्रदेशात दळणवळणाच्या दृष्टीने सुलभ असते तेथील संस्कृती झपाटयाने बदलण्याची शक्यता असते. समाजात काही मूल्य भौगालिक परिस्थितीतून जन्माला येतात.उदा. भौगालिकदृष्टया इंग्लंड चारही बाजूने समुद्राने वेढलेला असल्याने परकिय आक्रमणाची भिती इंग्लंड नव्हती. त्यामुळे इंग्लंडला सुरक्षितता लाभल्याने तेथे लोकशाहीचा उदय व विकास झाला याउलटआफ्रिका खंडात घनदाट जंगले व दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने तो खंड

मागासलेला राहिला. पूर्व व पश्चिम पाकिस्तानचा भूप्रदेश सलग नसल्यामुळे पाकिस्तानचे तुकडे होऊन बांगलादेश स्वतंत्र झाला याचा अर्थ भौगालिक परिस्थिती राजकीय संस्कृतीवर खूप प्रभाव पडतो.

२. **आर्थिक परिस्थिती-** हा राजकीय संस्कृतीचा महत्त्वाचा आधार असतो. औद्योगिक समाजात स्थानिक किंवा प्रांतिक निष्ठांपेक्षा राष्ट्रीय निष्ठा प्रभावी असतात. वाढत्या औद्योगिकीकरणातून राष्ट्रीय निष्ठाची मोठया प्रमाणावर विकसित होत असते. देशाच्या आर्थिक परिस्थितीचा राजकीय संस्कृतीवर परिणाम होतो. आर्थिक सुबत्ता असलेल्या देशात लोकशाही यशस्वी होते. याउलट आर्थिकदृष्टया बिकट परिस्थिती असलेल्या देशात हुकूमशाही निर्माण होते. उदा. इटलीत फॅसिझम ज्या देशाचा औद्योगिकरण व शहरीकरण कमी असते तेथील राजकीय संस्कृती संकुचित असते. शेतकरी वर्गामध्ये शिक्षणाचा अभाव, संसूचन साधनाची कमतरता यामुळे सनातनी प्रवृत्तीसोबत शासकीय कृत्याविषयी तिरस्कार व अज्ञानाची भावना मोठया प्रमाणावर आढळते. तसेच शेतीप्रधान देशात शेतकरी विखुरलेला असल्याने तो संघटित नसतो. त्यामुळे त्यांचा शासनाचा प्रभाव पडत नाही याउलट औद्योगिकरण झालेल्या देशात कामगार वर्ग एकाच शहरात राहत असल्याने तो लवकर एकत्र येतो. संघटनेच्या जोरावर शासनावर प्रभाव पडतो. त्यामुळे उद्योग प्रधान देशात राजकीय जागृती व मतदानाचे प्रमाण जास्त असते.

३. **सामाजिक परिस्थिती-** सामाजिक रचनेचा राजकीय संस्कृतीवर प्रभाव पडतो. सामाजिक परिस्थितीत वर्ग, वर्ण, भाषिक मतभदे आणि धार्मिक संबंधाचे स्वरूप इत्यादीचा समावेश असतो.सामाजिक परिस्थितीत पुढील घटकाचा समावेश होतो**.**

   a. **वर्ग, वर्ण व जात-** विवेकशील राजकीय व्यवस्था निर्माण करणाऱ्या दृष्टीने वर्ग-भेदातीत समाज निर्माण करणे आवश्यक असते. कारण वर्ग आणि वर्ण या घटकाचा राजकीय संस्कृतीवर प्रभाव पडत असतो. वांशिक संघर्षामुळे राजकीय व्यवस्थेची स्थिरता धोक्यातअसल्याची वा देशाची तुकडे पडल्याची उदाहरणे दिसून येतात. उदा. भिन्न वंशियाना एकत्र राहणे अशक्य झाल्याने तुर्की साम्राज्याचे विघटन झाले. अमेरिकेसारख्या अत्यंत प्रगत राजकीय संस्कृती असलेल्या देशामध्येही आजही निग्रो विरूद्ध गोरे हा छुपा संघर्ष अस्तित्वात असल्याचे दिसून येतो. दक्षिण आफ्रिकेतील काळा गोरा यांच्यातील संघर्ष आधुनिक काळातातील प्रमुख उदाहरण सांगता येईल.

   वर्ण या घटकाचा राजकीय संस्कृतीवर प्रभाव पडतो. कनिष्ठ वर्गातील लोक साम्यवाद व समाजवादाला पाठिंबा देतात तर उच्चवर्णीय भांडवलशाहीला पाठिंबा देतात. भारतात वर्णव्यवस्था आणि जातिभेद, अस्पृश्यता इत्यादींचा भारताच्या राजकीय संस्कृतीवर परिणाम झालेला दिसतो. जात या घटकांचा राजकीय संस्कृतीवर सर्वात जास्त प्रभाव पाडणारा घटक आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक वर्ष होऊनही राजकीय पक्षांना प्रचार मोहिमेत जातीय आवाहनाचा आधार घ्यावा लागतो. निवडणुकीत तिकिट वाटप करतांना किंवा महत्त्वपूर्ण पद देतांना जातीचा विचार केला जातो. मतदार सुद्धा जातीचा आधारावर मतदान करतो. उदा. महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा जातीचे लोकसंख्येमुळे वर्चस्व निर्माण झालेले आहे.

   b. **भाषा-** भाषिक एकता व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य मानली जाते. आधुनिक काळात निर्माण झालेली राष्ट्र राज्य एक भाषिक स्वरूपाची आहेत. युरोपात भाषेच्या आधारावर राष्ट्र वा राष्ट्रक निर्माण झालेली दिसतात. उदा. जर्मनी-जर्मन भाषा,स्पेन-स्पॅनिश भाषा. भाषेच्या आधारावर परस्परविरोधी प्रक्रिया निर्माण झालेल्या दिसतात. जर्मनी भाषिकांना एकत्र आणून राष्ट्र उभारणी फ्रेडरिक द गेट आणि बिस्मार्क यांची कामगिरी ही एकत्रीकरणाची प्रक्रिया आहे तर एका साम्राज्यामध्ये किंवा देशामध्ये असलेल्या सांस्कृतिक आणि भाषिक भेदामुळे विघटनाची प्रक्रिया होऊन देशाचे तुकडे पडल्याची उदाहरणे आहेत. उदा.पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान हे इस्लाम धर्म समान असूनही भाषा भेदामुळे बांगलादेश फुटून निघाला. बहुभाषिकत्व हे भारताच्या राजकीय संस्कृतीचे वैशिष्टये आहे. यातून भाषावार प्रांतरचनेची कल्पना पुढे

येऊन भारतात बहुभाषिक लोकांना एकत्रित ठेवण्यासाठी भाषावार प्रांतरचना करून संघराज्याची निर्मिती करण्यात आलेली आहे.

c. **धर्म-** राजकीय संस्कृती निश्चित करणारा धर्म हा महत्त्वपूर्ण सामाजिक घटक आहे. धर्म ही व्यक्तीच्या जीवनातील अत्यंत जिव्हाळयाची बाब असते. धर्माबाबत मानवीची संवेदनक्षमता सर्वात तीव्र असते. एकेकाळी धर्माच्या नावावर संहारक युद्धे झालेली दिसतात. धर्माच्या आधारावर राष्ट्रनिर्मितीसोबत राष्ट्रविघटनाची प्रक्रियाही झालेली दिसते. भारतात ब्रिटिश काळात धर्माच्या आधारावर द्विराष्ट्रवादास ब्रिटिशांनी प्रोत्साहन दिल्यामुळे हिंदूस्थानची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्र उदयाला आलेली दिसतात. आजही अनेक देश धर्माधिष्ठीत दिसतात. उदा.मध्य पूर्वतील अनेक देश इस्लाम धर्मावर आधारित आहेत. ज्या राष्ट्रातील राजकारणात धर्माचा आधार घेतला जातो तेथे बुद्धिपेक्षा परंपरेला जास्त महत्त्व असते. धर्माचा आधार घेणारी राजकीय व्यवस्था परंपराप्रधान आहे. समाजाच्या दैनंदिन व्यवहारामध्ये कायदा आणि करार यापेक्षा रूढी, परंपरेला अधिक महत्त्व असते. अनेक देशात धर्मावर आधारित राजकीय पक्ष निर्माण झालेले दिसतात. उदा. भारतात हिंदू महासभा धार्मिक वेगळेपणाचा राजकीय सहभागावर निश्चित परिणाम होतो. धर्मभिन्नतेमुळे कायदे सुद्धा वेगवेगळे तयार करावे लागतात. उदा. भारतात मुस्लिमासाठी स्वतंत्र कायदे आहेत. परंतु आधुनिक काळात धर्म आणि राजकारणाची फारकत करण्याची संकल्पना अनेक राष्ट्रामध्ये रूजलेली असल्याने धर्मनिरपेक्षता तत्त्वाला मोठया प्रमाणावर अधिमान्यता मिळत आहे.

४. **शिक्षण पद्धती-** राजकीय व्यवस्था आणि राजकीय संस्कृतीच्या जडणघडणीत शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. संस्कार हा संस्कृतीचा आधार असतो. शिक्षण हे संस्काराची पाठशाला आहे. शिक्षणामुळे ज्ञानात भर पडते. विचारात परिपक्वता येते. विवेचनात तर्कशुद्धता येते, विवेकवाद आणि विज्ञानवादास प्रोत्साहन मिळाल्याने राजकीय अंधश्रद्धा कमी होण्यास हातभार लागतो. पाश्चिमात्य देशात आधुनिकीकरणात शिक्षणाने प्रभावी भूमिका बजावली. पाश्चात्य शिक्षण पद्धतीतून व्यक्ति स्वातंत्र्याची कल्पना जन्मास आल्यामुळे जगातल्या अनेक देशात क्रांती घडून आल्या. जॉन लॉक, रूसो, मिल, ग्रीन हे आधुनिक स्वातंत्र्य संकल्पनेचे प्रणेते आधुनिक शिक्षणपद्धतीतून निर्माण झाले. त्यांनी उदारमतवादी लोकशाहीला तात्त्विक आणि सैद्धांतिक सामर्थ्य प्राप्त करून दिले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे शिल्पकार टिळक, गांधी व नेहरू पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीतून निर्माण झालेत. शिक्षणातून सर्वसामान्य नागरिकांची बौद्धिक पात्रता वाढते. शिक्षित व्यक्ती बुद्धिनिष्ठ दृष्टीने प्रत्येक गोष्टीचा विचार करतो. सुशिक्षित माणूस भावनांना बळी पडत नाही. शिक्षणामुळे देशातील तंत्रज्ञानाची पातळी उंचावते. या तांत्रिकतेचा देशाच्या शासन आणि प्रशासनावर निश्चित पडत असतो. साक्षरता आणि राजकीय सहभाग यांचा ही संबंध दिसून येतो. कारण जास्त साक्षरता असलेल्या देशात राजकीय सहभाग व जागृती जास्त परिणाम दिसून येतो.

५. **इतिहास-** ऐतिहासिक घडामोडीच्या परिणामातून राजकीय संस्कृतीतही फेरबदल होत असतात. राष्टांच्या ऐतिहासिक विकास कोणत्या पद्धतीने झाला. त्यावर त्या देशाची राजकीय संस्कृती अवलंबून असते. ऐतिहासिक घटनांचा मानवी मनावर खोलवर प्रभाव पडत असतो. एखाद्या राष्ट्रावर परकीयांनी प्रदीर्घ काळ राज्य केलेले असेल तर शासितांच्या संस्कृतीवर शासकांचा निश्चित प्रभाव पडत असतो. उदा. इंग्रजांनी केलेल्या दीडशे वर्ष राजवटीची छाप भारतीय संस्कृतीवर मोठया प्रमाणावर पडलेला आहे. इंग्लंड मध्ये राजा व प्रजा यांच्यात अनेक करार झालेत. इंग्लंडचा विकास संथपणे झाला. हा इतिहासाचा वारसा भावी पिढयांमध्ये मूल्य निर्माण करणारा ठरतो. भारताची धर्मावर आधारित फाळणी झाल्यामुळे भारताने स्वातंत्र्यानंतर धर्माला महत्त्व देण्याऐवजी धर्मनिरपेक्ष तत्त्वाला महत्त्व दिलेले आहे.

६. **राजकीय व्यवस्थेचे स्वरूप-** राजकीय संस्कृतीचा राजकीय व्यवस्थेवर प्रभाव पडत असतो तसाच राजकीय व्यवस्थेचा राजकीय संस्कृतीवर प्रभाव पडत असतो. राजकीय व्यवस्था ज्या प्रकारची असते त्याला अनुकूल

राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत काही राजकीय मूल्यांची जोपासना केली जाते तर काही मूल्यांचे खच्चीकरण केले जाते. लोकशाहीप्रधान देशात स्वातंत्र्य मूल्यांचा आदर केला जातो. विरोधकाची मते मान्य केली जातात. मात्र हुकूमशाही देशात व्यक्तिस्वातंत्र्याचा गौण स्थान दिले जाते. दडपशाहीच्या मार्गाने विरोध आणि विरोधकांना नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. राजकीय संसूचनाची वृत्तपत्रे, रेडिओ, दूरचित्रवाणी इत्यादी नियंत्रण ठेऊन त्यांचा वापर शासनमान्य मूल्यांच्या प्रसारासाठी करून जनतेचे ब्रेन वॉशिग करण्याचा प्रयास केला जातो. प्रत्येक व्यवस्था विशिष्ट प्रकारचे विचार व्यक्तीवर लादण्याचा प्रयत्न करतात. उदा.साम्यवादी देशात लहानपणापासून शाळेत व कुंटुंबात मुलाना साम्यवादाचे धडे दिले जातात. या पद्धतीने राजकीय व्यवस्था देशाच्या राजकीय जीवनाला वळण देण्याचा प्रयत्न करतो.

**टिप- राजकीय संस्कृतीची स्वरूप व वैशिष्टये-** राजकीय संस्कृतीची पुढील वैशिष्टये सांगता येतात.

१. **राजकीय संस्कृती सामाजिक संस्कृतीची उपसंस्कृती असते-** राजकारण हे समाजात अस्तित्वात येत असते आणि समाजातील घटकांनी प्रभावित होत असते. राजकारणाचे मूळ समाजात आढळते म्हणून राजकीय संस्कृतीचे मूळ देखील सामाजिक संस्कृतीत आढळते. समाजाने मान्य केलेली मूल्ये ही सामाजीकरणाच्या माध्यमातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनलेली असतात. त्यामुळे समाजाचे राजकीय दृष्टिकोन व व्यक्तीचे राजकीय दृष्टिकोन यात बऱ्यादा साम्य दिसून येते. व्यक्तीच्या सामाजिक दृष्टिकोनावर राजकीय दृष्टिकोन आणि राजकीय मते अवलंबून असतात. समाज दैववादी, अंधश्रद्धेवर भर देणारा असेल तर दुष्काळ व महापूराबद्दल शासनाला दोष देणार नाहीत त्यासाठी राजकीय मोर्चा व आंदोलने करणार नाहीत याउलट समाज साक्षर व जागृत असेल तर या नैसर्गिक संकटाबद्दल सरकारला जबाबदार मानल जाईल. म्हणजे एकंदरीत सामाजिक मूल्यांच्या प्रभाव राजकीय मूल्य व संस्कृतीवर पडत असल्याने राजकीय संस्कृती सामाजिक संस्कृतीची उपसंस्कृती असते.

२. **राजकीय संस्कृती स्वायत्त व अलग असू शकते-** सामाजिक संस्कृतीचा राजकीय संस्कृती ही उपसंस्कृती असली तरी आल्मंडसारखे अभ्यास राजकीय संस्कृती ही सर्वसाधारण संस्कृतीशी संबंधित असूनही मोठया प्रमाणात अलग किंवा स्वायत्त असू शकते. व्यक्तीची वैयक्तिक मते सार्वजनिक मताहून अलग असू शकतात. त्यामुळे राजकीय संस्कृती व सामाजिक संस्कृती एकमेकांपासून अलग व सवायत्त असू शकते उदा. डॉ. आंबेडकराबद्दल आदर बाळगणारे व्यक्ती मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबाचे नाव देण्यास विरोध करीत होत्या. भाषा व प्रांतविषयक निष्ठा योग्य मानणारे संसद सदस्य सभागृहातील चर्चेत अशा गोष्टींना अयोग्य ठरवतात. त्यामुळे सामाजिक संस्कृतीपेक्षा राजकीय संस्कृती भिन्न बऱ्यादा अलग असते.

३. **राजकीय संस्कृती गतिमान असते-** राजकीय संस्कृती ही स्थिर स्वरूपात नसते तर गतिमान असते. बाह्य देशाचा प्रभाव, वाढते औद्योगिकीकरण, नवीन नेतृत्वाचा प्रभाव, शिक्षण व दळणवळण साधनातील वाढ, लोकसंख्येतील बदल इत्यादी कारणामुळे राजकीय संस्कृती सतत बदल असते. ब्रिटिश राजवटीने संसदीय लोकशाही भारतात रूजविण्याचा प्रयत्न केल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला दिसतो. १९१७ साली रशिय राज्यक्रांतीच्या प्रभावातून अनेक देशात समाजवादास अनुकूल विचार रूजलेले दिसतात. राजकीय संस्कृतीच्या बदलातून संस्कृतीचा एक निश्चित वारसा विकसित असतो. तो बदल राजकीय सामाजीकरणाच्या प्रक्रियाद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिला जातो. राजकीय संस्कृतीच्या गतिमानतेतून नवीन राजकीय मूल्य व परंपरा विकसित होत असतात.

४. **राजकीय संस्कृती अलिखित असू शकते-** राजकीय संस्कृती ही बऱ्याच प्रमाणात अलिखित असते. देशाच्या संविधानात ती संपूर्णपणे प्रतिबिंबित होतेच असे नाही. राजकीय मूल्य राज्यघटनेत लिखित स्वरूपात प्रस्थापित केली जातात. तेव्हा राजकीय संस्कृतीला लिखित स्वरूप प्राप्त होते. परंतु सर्व राजकीय मूल्य लिखित स्वरूपात असू शकत नाही. काही मूल्य अलिखित असू शकतात. उदा.परराष्ट्राचा राष्ट्रप्रमुख भारत भेटीवर आल्यास त्यांच्या स्वागतासाठी पंतप्रधानाने विमान तळावर हजर राहावे राजकीय मूल्य अलिखित आहे. तसेच कायद्या

बनविणारे राजकीय नेते हे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सनदी सेवकापेक्षा श्रेष्ठ असतो. हे संकेत अलिखित असले तरी राजकीय संस्कृतीचा एक भाग बनून राहतात.

५. **राजकीय संस्कृती एकजिनसी नसते-** राजकीय संस्कृती कधीही संपूर्णपणे एकजिनशी नसते. कारण सामाजिक जीवनात अनेक भेद दिसून येतात. समाजात जात, भाषा, धर्म व लिंग इ. घटकावरून विविधता दिसून येते. प्रत्येक घटकाचे आचार विचार यांच्यात विविधता असल्याने समाजात अनेक उपसंस्कृत्या अस्तित्वात असतात. समाजात एकाच वेळेस हिंदू आणि मुस्लमानांची वेगवेगळी उपसंस्कृती अस्तित्वात असते. समाज हा परस्पर विरोधी मते असणाऱ्या व्यक्तीचा मिळून बनलेला असतो. त्याप्रमाणे राजकीय संस्कृतीत ही विविधता दिसून येते. उदा. भारतातील काही लोक संसदीय लोकशाहीला तर काही अध्यक्षीय लोकशाहीला पाठिंबा देतात तर काही साम्यवादाला समर्थन देतांना दिसतात म्हणजे समाजात राजकीय मूल्यामध्ये तफावत असल्याने राजकीय संस्कृती ही विविधता दिसून येते.त्यामुळे राजकीय संस्कृती एकजिनसी नसते. राजकीय संस्कृतीत एकजिनशीपणा का दिसून येत नाही याबाबत अभ्यासकांनी तीन कारणे सांगितलेली आहेत. समाजात असणारे गट व भेद, राजकीय व्यवस्थेच्या विविध रचनांत असलेले गट आणि परस्परविरोधी मूल्यांचे अस्तित्व व प्रभाव इत्यादी कारणामुळे राजकीय संस्कृतीत एकजिनसीपणा दिसून येत नाही.

**टिप- राजकीय संस्कृतीची प्रतीके-**

सर्वसामान्य व्यक्तिला धर्म व आधात्म ही तत्वे समजत नाही पण ते ईश्वराला मूर्तीच्या रूपात समजू शकतात. त्याचप्रमाणे राज्यघटना, कायदे हे प्रत्येकाला समजेल असे नाही. परंतु राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत सर्वांना समजते. धार्मिक क्षेत्रात जशी भक्तीची प्रतीके असतात. त्याप्रमाणे राजकीय क्षेत्रात प्रतीके निर्माण केली जातात. राष्ट्राबद्दल आत्मियता निर्माण करण्यासाठी प्रत्येक देशात राजकीय प्रतीके निर्माण केली जातात. राष्ट्राबद्दल आस्था निर्माण करण्यासाठी लोकांमध्ये ज्या प्रतिमा निर्माण केल्या जातात त्यालाच राजकीय संस्कृतीची प्रतीके असे म्हणतात. उदा.रशियात विळा हातोडा भारतात राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत प्रतिकांचा उपयोग करून लोकांच्या भावना उत्तेजीत केल्या जातात. ही भावनिक तीव्रता राजकीय संस्कृतीसाठी पोषक ठरते. राष्ट्रीय प्रतीके विशिष्ट हेतूने तयार केली जातात. प्रतीकाचा वापर वेगवेगळया कारणासाठी केला जातो.

१. **राष्ट्राबद्दल श्रद्धा वाढविण्यासाठी-** जनतेच्या मनात राष्ट्राबद्दल श्रद्धा वाढविण्यासाठी राजकीय प्रतीके निर्माण केली जातात. राष्ट्राबद्दल प्रेम, जिव्हाळा असल्याशिवाय राष्ट्र टिकू शकत नाही. ती भावना वाढीस लावण्यासाठी राजकीय प्रतीकांचा वापर केला जातो.उदा.राष्ट्रगीत सुरू असतांना उभे राहणे.

२. **राजकीय स्थैर्य व ऐतिहासिक परंपरेबद्दल आदर निर्माण करण्यासाठी-** राजकीय व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी प्रतीकाचा वापर अतिशय उपयुक्त मानला जातो. प्रत्येक देशात काही ऐतिहासिक परंपरा असतात. त्या परंपरेबद्दल जनतेला अभिमान असल्यामुळे त्या जोपासल्या जाव्यात असे जनतेला वाढते. म्हणून ऐतिहासिक परंपरेबद्दल आदर निर्माण करण्यासाठी प्रतीकांचा वापर केला जातो. उदा.शिवाजी महाराजाच्या संदर्भात कल्याणाच्या सुभेदाराच्या सुनेची कथा या प्रतीकाच्या माध्यमातून परंपरा कायमस्वरूपी जनतेच्या मनात रूजविता येतात.

३. **सर्वंकष व्यवस्थेला बळकट करण्यासाठी-** सर्वंकष सत्तावादी राज्यपद्धती ह्या दमनकारी असतात. त्यांच्या सत्तेला जनतेची अधिमान्यता नसल्यामुळे या सर्वंकष राजवटी आपल्या सत्तेला अधिमान्य मिळविण्यासाठी काही प्रतीके निर्माण करून भावनिक वातावरण निर्मिती करत असते. विशिष्ट प्रतीकावर जनतेत श्रद्धा निर्माण केल्यास लोकांना त्याग करण्यास प्रवृत्त करता येते. सर्वंकष सत्तावादी आपल्या व्यवस्थेला पाठिंबा मिळविण्यासाठी प्रतीकांचा वापर करतात.उदा.हिटलरच्या काळात सार्वजनिक कवायत

४. **विशिष्ट विचाराने समाज संघटित करण्यासाठी-** समाज चांगल्या विचारांनी संघटीत करण्यासाठी ऐतिहासिक व्यक्ती व राजकीय नेतृत्वाने प्रतीकाची निर्मिती केलेली दिसते. त्यांचे जीवन व कामगिरी याची सतत आठवण

कायम ठेवावी म्हणून देखील प्रतीके निर्माण केली जातात. उदा. महापुरूषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करणे

५. **नव्या शासन व्यवस्थेचे समर्थन करण्यासाठी-** प्रत्येक देशात शासन व्यवस्था बदलत असते. पण काही वेळा जुन्या राजवटीला असणारी सहानुभूती व तिचे अवशेष नष्ट करण्यासाठी नव्या राजवटीला वेगळी प्रतीके निर्माण केली जातात. नव्या शासन व्यवस्थेचे स्मरण करण्यासाठी प्रतीकांचा वापर केला जातो. उदा. लालबहादुर शास्त्रीची जय जवान, जय किसान ही घोषणा.

६. **आंतरराष्ट्रीय क्षेत्रात-** आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सुद्धा नव्या कल्पना रूजविण्यासाठी असतात तेव्हा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रतीकांचा वापर केला जातो. उदा. आंतरराष्ट्रीय बालक वर्षाच्या निमित्ताने छोटया मुलास कवेत घेणारे पालक आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा भावनिक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रतीकाचा वापर होता.

अशा प्रकारे राजकीय संस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने राजकीय प्रतीके अत्यंत महत्त्वाचे आहे.

**टिप- राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण वा प्रकार-** आल्मंड व व्हर्बा यांनी The Civil Culture या ग्रंथात इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, इटली, मॅक्सिको इ.प्रदेशाचा अभ्यास करून राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला. देशाच्या औपचारिक रचनेविषयी लोकांचा दृष्टिकोन कोणता आहे, हा प्रथम निकष होय तर शासनातील विविध अधिकारपदे भूषविणाऱ्या लोकांविषयी जनतेचा दृष्टिकोन कोणता हा दुसरा निकष होय. शासनाच्या धोरण व कार्यक्रमाविषयी जनतेचा दृष्टिकोन कोणता निकष आहे तर राजकीय व्यवस्थेप्रति व्यक्तिगत प्रतिक्रिया हा अंतिम निकष होय. थोडक्यात जनतेला राजकीय व्यवस्थाविषयी कितपत ज्ञान आहे. व्यवस्थेसंबंधी जनतेच्या भावना कशाआहेत. व्यवस्थेची मूल्य ठरविण्यासाठी कोणत्या कसोटया वापरल्या गेल्या. इ.निकषाच्या आधारावर त्यांनी राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला आणि त्या आधारावर आल्मंड आणि व्हर्बा यांनी राजकीय संस्कृतीचे पुढील तीन प्रकार पाडलेले आहेत.

१. **संकुचित राजकीय संस्कृती -** यात समाज परंपरा प्रधान असतो. आदिम अवस्थेतील पारंपरिक टोळी वा मागासलेल्या समाजामध्ये संकुचित राजकीय संस्कृती आढळते. या समाजात श्रमविभागणी व कामाचे विशेषीकरण झालेले नसल्यामुळे राजकीय, आर्थिक व धार्मिक भूमिकांची सरमिसळ झाल्यामुळे जनतेच्या मनात देशातील राजकीय, आर्थिक व धार्मिक घटनाबद्दल स्पष्टता नसते. समूहाचा किंवा टोळीचा प्रमुख सामाजिक, आर्थिक सर्वच प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडीत असतो. त्यांच्या आज्ञेचे पालन सर्व लोक करीत असल्यामुळे स्वतंत्र निर्णय घेण्याची किंवा राजकीय व्यवस्थेचे मूल्यमापन करण्याची त्यांच्याकडून अपेक्षा नसते. समाजाला प्रक्रियेविषयी फारसे ज्ञान नसते. राजकीय जागृती मर्यादित असते. जनतेला राजकारणात रस नसल्याने ती तटस्थ राहते. राजकारणात जनता सहभागी होत नसल्यामुळे राजकीय जागृती आढळून येते नाही. अशा संस्कृतीला संकुचित राजकीय संस्कृती असे म्हणतात.उदा. आफ्रिका खंडातील मागासलेल्या देशात ही संस्कृती दिसून येते.

२. **आज्ञाकित राजकीय संस्कृती-** या संस्कृतीत जनतेला राजकारण व राजकीय प्रक्रिये विषयी माहिती असते. राज्यकर्ते नेमके काय करतात यांची जनतेला माहिती असते. राजकीय घडामोडीचे लोकांना ज्ञान असते. परंतु धोरण निर्मितीत त्यांचा सहभाग नसतो. राजकारणात भाग घेण्याची इच्छा नसते. आपल्या मागण्याचा पाठपुरावा कसा करावा. मागण्याचे राजकीय निर्णयात कसे रूपांतर घडवून आणावे या संबंधी माहिती नसते. राजकारणात आपण भाग घेतला तर यश लागेल की नाही याची खात्री नसल्याने राजकारणात बाबत ते निष्क्रीय बनतात. परिणामतः आज्ञा पालनाचे राजकीय मूल्य प्रभावी बनते. उदा.सरकारने शेतकऱ्यांसाठी सवलतीचे धोरण आखले आहेत ते शेतकऱ्यांना कळते पण शेती मालाला चांगला भाव नसतांना ही चांगला भाव मिळण्याची मागणी शासनाकडे कशी न्यावी हे कळत नसल्यामुळे शेतकरी निष्क्रीय बनतात.या संस्कृतीला आज्ञाकित राजकीय संस्कृती म्हणतात. परतंत्र वसाहतीमध्ये जिथे लोकांना आपल्या राजकीय व्यवस्थांबद्दल अभिमानाची व तिरस्काराची भावना असते. लोकांना फक्त राजकीय सत्तेविषयी माहिती असते.

तिच्याप्रति अनुकूल वा प्रतिकूल भावनिक अभिमुखता तयार झालेली असते. शासनाच्या इष्ट की अनिष्ट याबद्दलचा मूल्यात्मक निर्णयही ते करू शकतात पण त्यांचे आकलन व प्रतिसाद प्रदान प्रक्रियापुरता मर्यादित असतो. संपूर्ण राजवट अन्यायकारी वाटत असली तरी ते तिचा प्रभावी प्रतिकार करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांची नापसंती निष्क्रिय असते. अशा प्रकारच्या राजकीय संस्कृतीला आज्ञांकित राजकीय संस्कृती असे म्हणतात.

३. **सहभागी राजकीय संस्कृती-** सर्व सामान्य नागरिकांना राजकीय प्रक्रियेविषयी माहिती असते. नागरिक आपले हक्क व कर्तव्य विषयी जाणीव असते. शासनाची धोरणे, शासनाची उद्दिष्टये याबद्दल सततपणे आपले मत व्यक्त करत असतात. राजकीय व्यवस्थेच्या कार्याविषयी लोक सातत्याने मूल्यमापन करीत असतात. लोक आपले प्रश्न शासनाकडे नेतात आणि सोडवून आणतात. सामान्य जनता सुद्धा राजकारणाविषयी जागृत असल्याने राजकारणात सक्रिय सहभाग दाखवतात. व्यक्तीच्या ज्ञानात्मक, भावनात्मक, मूल्यमापनात्मक अभिमुखता राजकारणाविषयी सकारात्मक स्वरूपाच्या असल्यामुळे लोक स्वच्छेने राजकारणात सहभागी होतात. नागरिक स्वतः ला राजकीय व्यवस्थेचे जबाबदार घटक मानतात. भावनिकरीत्या राजकीय व्यवस्थेशी जोडले असतात. राजकीय घटकांच्या अनुकूल व अयोग्य कार्याविषयी प्रतिसाद व्यक्तीकडून व्यक्त होत असतात. राजकीय व्यवस्थेचा एक कृतिशील घटक म्हणून तत्पर राहण्याची तळमळ व्यक्तीच्या ठिकाणी असते. अशा ठिकाणी सहभागप्रधान राजकीय संस्कृती असते. उदा. इंग्लंड व अमेरिकासारख्या विकसित देशात या प्रकारची संस्कृती आढळून येते.

आल्मंड व व्हर्बा राजकीय संस्कृतीचे तीन प्रकार पाडलेले आहेत. ते आदर्श स्वरूपाचे आहेत. कोणत्याहीदेशात राजकीय संस्कृती पूर्णपणे सहभागी, आज्ञांकित किंवा संकुचित स्वरूपाची नसते. प्रत्येक देशात व समाजात काही घटक राजकीय सहभाग घेणारे, काही घटक आज्ञा पालन करणारे, काही घटक राजकारणाविषयी अज्ञभिन्न व उदासीन होतात. त्यामुळे प्रत्येक देशात तिन्ही प्रकारचे मिश्रण दिसून येते.

**टिप- डॉ.फायनर यांनी राजकीय संस्कृतीचे केलेले वर्गीकरण सांगा.**

डॉ. फायनर यांनी राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण करतांना लष्कर व राजकीय नेता यांच्या संबंधावर वर्गीकरणात भर दिलेला आहे. राजकीय व्यवस्थेतील लष्कराचे स्थान आणि लष्करी हस्तक्षेपाची शक्यता आणि नागरी समाजाच्या लष्करावर प्रभाव आहे की लष्कराचा नागरी समाजावर प्रभाव आहे या निष्कर्षा वरून राजकीय संस्कृतीचे फायनरने चार प्रकार केले आहेत.

१. **परिपक्व राजकीय संस्कृती-** इंग्लंड व अमेरिका देशात परिपक्व राजकीय संस्कृती दिसून येते. नागरी सत्ता सर्वश्रेष्ठ मानली जाते. लष्कर नागरी सत्तेशी एकनिष्ठ असते. सैन्याच्या कृती नागरी सत्तेच्या आदेशाप्रमाणे चालत असतात. शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रशासन सैन्यावर अवलंबून नसते. उदा. अमेरिकेचा अध्यक्ष हा सैन्याचा तिन्ही दलाचा प्रमुख असतो. त्यांच्या आज्ञाप्रमाणे लष्कराला कार्य करावे लागते. अशा देशात लष्कराने नागरी जीवनात हस्तक्षेप केला तर त्याविरूध्द तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होतात. या समाजात लष्करी हस्तक्षेप अयोग्य मानला जातो. त्यामुळे लष्कराला तटस्थ राहावे लागते.

२. **विकसित राजकीय संस्कृती -** या प्रकारच्या संस्कृतीत जनता संघटित असते. मात्र त्यांचे ध्रुवीकरण घडलेले असते. शासकीय कामकाजाच्या पद्धती लोकांना प्रचलित असतात. परंतु सार्वभौमत्वाचा वापर कोणी व कसा करावा याबाबत जनतेत मतभेद असतात. लष्करी सत्तेला समाजात विरोध असतो. समाजातील वेगवेगळया गटात अधिमान्यता मिळावी यासाठी पराकोटीचे संघर्ष चालू राहतात. समाजातील वाढता मतभेदाचे निवारण करण्याच्या नावाने राजकीय जीवनात लष्कर हस्तक्षेप करून राजकीय सत्ता हस्तगत करतात किंवा एखादया राजकीय गटाला पाठिंबा देऊन त्या गटाला सत्तेवर बसवितात. राजकीय सत्ता लष्कराच्या पाठिबावर आधारलेले असल्याने जनतेच्या विरोधाला आणि विरोधकांना किमत नसते. उदा. बिस्मार्कच्या काळापासून तर हिटलरच्या काळापर्यंत जर्मनीत विकसित राजकीय संस्कृती होती.

३. **कनिष्ठ राजकीय संस्कृती-** इराण, इराक, पाकिस्तान या देशात ही संस्कृती दिसून येते. समाज राजकीयदृष्टया संघटित नसतो. समाजात राजकीय जागृती फारशी नसते. समाजात अनेक गट असतात. ज्या गटाला लष्कराचा पाठिंबा असतो त्या गटाला सत्ता मिळते. अनेकदा सत्तांतर लष्कराच्या मदतीने घडवून आणले जाते. लष्कराच्या मदतीने सत्ता टिकविली जाते. लोकमत संघटित नसल्याने सैन्याचा हस्तक्षेप राजकीय जीवनात मोठया प्रमाणावर असतो. बऱ्यादा सत्ता लष्कराच्या ताब्यात असते. नागरी जीवनावर लष्कराचा प्रभाव असल्यामुळे लष्कर शांतता व सुव्यवस्थेसोबत अनेक प्रशासकीय कार्य देखील पार पाडत असते. नागरी जीवनात वारंवार लष्करी हस्तक्षेपाला अशा देशात सामोरे जावे लागते. या राजकीय संस्कृतीला फायनर कनिष्ठ राजकीय संस्कृती असे म्हणतो.

४. **अतिअल्प राजकीय संस्कृती-** आफ्रिका खंडातील मागासलेल्या देशात ही राजकीय संस्कृती असते. या संस्कृतीत समाज जागृत नसतो. राजकीय प्रक्रियेविषयी जनतेमध्ये अजिबात जाणीव नसते. समाज टोळया टोळयामध्ये विखुरलेला असतो. संपूर्ण सत्ता लष्कराच्या ताब्यात असते. लोक लष्करी सत्तेला विरोध करत नाही. लष्करी सत्ता लोकमताची कदर करीत नाही. नागरिकांना नागरिक म्हणून न वागविता गुलाम म्हणून वागविले जाते. संपूर्ण सत्ता लष्करांच्या ताब्यात असल्यामुळे नागरी व प्रशासकीय जीवनातील सर्व निर्णय, कार्यक्रम आणि धोरणावर लष्कराचा प्रभाव असतो.

**टिप- राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे घटक -** राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणण्यासाठी अनेक कारणे असतात. काही वेळेस हेतूपुरस्कर सामाजीकरण करून संस्कृतीत बदल घडवून आणला जातो. कधी कधी क्रांतीच्या माध्यमातून बदल घडवून आणला जातो तर बिगर राजकीय क्षेत्रातील काही संस्थाना हाताशी धरून किंवा प्रचार तंत्राचा अवलंब करून राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणला जातो. राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारी माध्यमे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) संसुचन माध्यमे-** वृत्तपत्र, रेडिओ, आकाशवाणी, दूरदर्शन ही प्रसिद्धी माध्यमे आहेत. या माध्यमाचा वापर करून शासन संस्था जनतेच्या राजकीय मूल्यामध्ये बदल घडवून आणतात. या माध्यमामुळे शासनसंस्थेला जनतेच्या राजकीय सामाजीकरण करणे फार सोपे झाले आहे. या माध्यमावर नियंत्रण ठेवून विशिष्ट विचार लोकांपर्यंत सातत्याने पोहचविता येतात. राजकारणाविषयी ज्ञान व जागृती वाढविण्यासाठी आधुनिक काळात या साधनाचा मोठया प्रमाणावर उपयोग केला जात असतो. भारतात राजकीय पक्षांना आकाशवाणी व दूरदर्शनवर निवडणूकीच्या काळात विशिष्ट वेळ दिला जातो. या साधनाच्या माध्यमातून तुटक उपसंस्कृतीचे रूपांतर एकोप्याच्या संस्कृतीत करता येते. व्यवस्थेविषयी आपुलकीची भावनाही विकसित करता येते. या माध्यमावर सरकारचे नियंत्रण असेल तर साचेबंध संस्कृती निर्माण होईल.उदा.साम्यवादी देशात ही साधने सरकारच्या नियंत्रणात असतात. मात्र या साधनाना स्वायत्त असेल तर विविध अंगी राजकीय संस्कृती निर्माण होईल. राजकीय ऐक्य निर्माण करणे, राजकीय माहिती पुरविणे, नव्या व्यवस्थेला लोकप्रिय करणे, जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविणे इ. कार्य ही माध्यमे पार पडतात.

**२) विचारप्रणाली-** राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी अनेक देशात विचारप्रणालीचा आधार घेतला जातो. मागस समाजातील पारंपरिक तुटकता व संकुचित गटनिष्ठा नाहीशा करून सुयोग्य निष्ठा निर्माण करण्यासाठी विचारप्रणाली मांडली जात असते. विशिष्ट विचारसरणी जनतेसमोर सतत मांडल्यास राजकीय संस्कृतीत हवा तसा बदल घडवून आणता येतो. लोकांना संमोहित करणारी विचारसरणी जर वारंवार मांडण्यात आली तर ती जनतेच्या मनात खोलवर रूजते. जनतेत कष्ट व त्याग भावना निर्माण करणे, लोकांत समुदान प्रवृत्ती निर्माण करणे, समान बंधविषयक जाणीव लोकांत निर्माण करणे, अधिकारपदस्थ अभिजनांच्या सत्तेस सनदशीरता मिळवून देण्यासाठी आणि नव्या व्यवस्थेला नैतिक पाठिंबा मिळविणे विचारप्रणालीमुळे शक्य होते. उदा.स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही समाजवाद धर्मनिरपेक्षता,अलिप्ततावाद इ.विचारसरणी नेहरूनी मांडून जनतेत रूजविण्याचा प्रयत्न केला.

३) **राजकीय संघटन-** पारंपरिक किंवा जुन्या सांस्कृतिक चौकटी मोडून टाकण्यासाठी लोकांच्या राजकीय अभिजन महत्त्व देतात. राजकीय संघटन म्हणजे राजकीय क्षेत्रात जनतेचे ऐक्य साधणे किंवा जनतेला संघटित करणे होय. निवडणुकामुळे राजकीय संघटन घडून येते. नवीन राज्यात लोकात राष्ट्रीय व राजकीय जाणीव निर्माण करण्याचे माध्यम म्हणून निवडणुकाचा विचार केला जातो. निवडणुकाच्या काळात विशिष्ट मूल्यांच्या संगोपनासाठी किंवा संवर्धनासाठी लोकांना संघटित केले जाते. निवडणूक काळात उमेदवार व राजकीय कार्यकर्ते मतदाराशी संपर्क प्रस्थापित करतात. प्रचार मोहिमेमुळे राजकीय जाणीव निर्माण होऊन राजकीय कार्यक्रम जनते पर्यंत पोहवतात. निवडणुकामुळे राजकीय संस्कृतीच्या बदल प्रक्रियेस गती मिळते. उदा. इंदिरा गांधीने बँकाचे राष्ट्रीयकरण करून समाजवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गोरगरिबांना आकर्षण निर्माण होऊन आपल्या कल्याणासाठी इंदिरा गांधीना विजयी केले. निवडणुकामुळे राजकीय संघटन चांगल्या पद्धतीने होत असते. निवडणुकामुळे व्यवस्थानुकूल दृष्टिकोन मोठया प्रमाणात निर्माण होण्यास मदत मिळते.

४) **राजकीय पक्ष-** राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे हे महत्त्वाचे माध्यम आहे. व्यक्ती व गट विचारांचे माध्यम म्हणून कार्य करतात. याशिवाय आर्थिक, सामाजिक आणि राजकीय उद्दिष्ट निश्चित करून जनतेत नवीन मूल्य व्यवस्था राजकीय पक्ष निर्माण करतात. राजकीय पक्षाद्वारे राजकीय संस्कृतीला नवीन वळण दिले जाते. प्रत्येक पक्ष अधिवेशन भरवतो. राजकीय कार्यक्रम व जाहीरनामा प्रसिद्ध केले जातात. जनतेला राजकीय शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. राजकीय पक्ष विविध प्रकारचे राजकीय तत्वज्ञान लोकांपुढे मांडतात. नव्या नव्या कल्पना व विचाराचे वाहक म्हणून राजकीय पक्षाकडे पाहिले जाते. राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात व निवडणुकीनंतरही विशिष्ट प्रश्नांवर लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतात. स्वतः स्वीकारलेली राजकीय मूल्य लोकांत रूजविण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्षामुळे राजकीय संस्कृतीत शीघ्र पद्धतीने बदल घडवून आणतात.

५) **बाहय प्रभाव शक्ती-** प्राचीन काळी दळणवळण साधनाचा विकास न झाल्यामुळे एका देशात घडणाऱ्या घटनाचा प्रभाव इतर देशावर परिणाम करत नव्हता. त्यामुळे राष्ट्रीय संस्कृतीचे अलगीकरण मोठया प्रमाणावर आढळत होते. मात्र आधुनिक काळात दळणवळण साधनाच्या विकासामुळे जग लहान बनत चालले. दळणवळण साधनाच्या विकासामुळे भौगोलिक सरहद्दींचा प्रभाव कमी झाला. जगात काना कोपऱ्यात घडलेल्या घटनेचा परिणाम इतर देशावर लगेच पडतो. उदा. भारतात बाबरी मशिद जमीनदोस्त झाल्याबरोबर पाकिस्तान व बांगलादेशात हिंदूच्या मंदिरावर हल्ले सुरू झाले. बाहेरील देशांच्या घटनांचा प्रभाव एखादया देशावर त्वरीत पडू शकतो. या घटनामुळे देशातील राजकीय संस्कृती प्रभावित होऊन त्यात वेगाने बदल घडू शकतात.

६) **प्राथमिक गट-** कुटुंब व शाळा हे राजकीय संस्कृतीला आकार देणारे प्राथमिक गट मानले जाते. या गटाचा राजकीय संस्कृतीवर खूप प्रभाव पडत असतो. लहान मुलांवर संस्कार घडविण्यात कुटुंब व शाळा अग्रसेर असतात. म्हणून राजकीय व्यवस्था सुद्धा या प्राथमिक गटाच्या माध्यमातून आपल्याला अनुकूल राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. उदा.हिटलरच्या काळात शाळेमध्ये नाझीचे तत्वज्ञान शिकविले जायचे स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. भारतात लोकशाही यशस्वी करण्यासाठी सामाजिक जीवनाचे लोकशाहीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी भारतीय समाजात सामाजिक समता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी परंपरागत जातीय निष्ठावर कठोर प्रहार करावे लागतील ही जाणीव विकसित होऊ लागल्यामुळे शालेय अभ्यासक्रमात व्यापक बदल घडवून आणले जात आहेत. कारण प्राथमिक गटात या भावनेचे अस्तित्व मोठया प्रमाणात दिसते. म्हणून प्राथमिक गटाचे राजकीय सामाजीकरण करून राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणला जातो.

वरिल घटना व्यतिरिक्त क्रांती, युद्धातील पराभव, निर्वासितांना दिलेला आश्रय इ.घटक सुद्धा राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणतात. १९६२ साली झालेल्या भारत चीन युद्धामुळे भारतात लष्करीकरणाची गरज मोठया प्रमाणावर विशद केली जाऊ लागली.

**टिप- राजकीय संस्कृतीचे महत्त्व-** राजकीय संस्कृती हे प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करीत असते. राजकीय संस्कृतीचे महत्त्व आधुनिक काळात मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. त्याची कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

१. **राजकीय व्यवस्थेवर प्रभाव-** कोणत्याही राजकीय संस्कृतीचा तेथील राजकीय व्यवस्थेवर प्रभाव हमखास पडत असतो. त्या दृष्टीने राजकीय संस्कृतीचे महत्त्व लक्षात येते. उदा. इंग्लंडची राजकीय व्यवस्था उदारमतवादी स्वरूपाची आहे. याचे कारण तेथील लोकांची विशिष्ट अशी राजकीय संस्कृती होय. राजकीय व्यवस्थेला राजकीय संस्कृतीमुळे आकार प्राप्त होत असतो.

२. **नवे बदल जाणून घेण्यासाठी-** विसावे शतक हे राजकीय स्थित्यंराचे शतक मानले जाते. या शतकातील झालेले औद्योगिकरण, नागरीकरण आणि शास्त्रीय शोधामुळे राज नवे नवे बदल घडत आहेत. त्याचा परिणाम देशादेशांतील राजकीय व्यवस्थेवर होत आहेत. विसाव्या शतकातील ज्ञानाच्या परिस्फोटामुळे मानवी वर्तनात अमुलाग्र बदल होत आहेत. या बदलाचा परिणाम राजकीय संस्कृतीवर देखील होत आहेत. आधुनिक काळात मानवी सुरक्षितता आणि शांततेचे नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. स्पर्धातून असुरक्षिततेची भावना वाढत आहे. मानवी व्यवहार अशाश्वत होत आहेत. ह्या सर्वांचे आकलन होण्यासाठी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उकल होण्यासाठी राजकीय संस्कृतीचे महत्त्व व अभ्यास अतिशय महत्त्वाचा ठरला आहे.

३. **जागतिक स्थित्यंरे समजण्यासाठी-** जग हे सतत गतिमान असते. त्यामुळे नव्या जगात झपाटयाने होणारे बदल समजून घेण्यासाठी राजकीय संस्कृतीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जुन्या रूढी, परंपरा झपाटयाने नष्ट होत आहेत. त्यांची जागा आधुनिक समाजरचना आणि रूढी, परंपरा घेत आहेत. देशात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर रोज नवे नवे परिवर्तन होत आहेत. त्यांची जागा नव्या गोष्टी होत आहे. हे आधुनिकीकरण जगात सर्वत्र सारख्या वेगाने होत नाही. काही देशात ते अत्यंत वेगाने तर काही देशात अत्यंत मंद गतीने होत आहेत. हे असे का घडते आहे याची माहिती असणे जरूरीचे आहे. त्यांचे अध्ययन करण्यासाठी राजकीय संस्कृतीचे अध्ययन होणे गरजेचे आहे.

४. **नव्या मूल्यांचे आकलन होण्यासाठी-** जगाच्या व्यवहारात काळाप्रमाणे बदल होणे ही अपरिहार्य प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून जुनी मूल्यव्यवस्था कालबाहय होऊन नवी मूल्ये, नव्या श्रद्धा निर्माण होत आहेत. उदा. जुनी पोलिसी राज्याची संकल्पना नष्ट होऊन त्यांची जागा कल्याणकारी राज्याची संकल्पना उदयास येत आहे. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढत आहे. राज्याच्या वाढत्या कार्यक्षेत्रामुळे व्यक्ती जीवनात राज्याचा हस्तक्षेप वाढत चालला आहे. व्यक्तीचे राज्यावरचे अवलंबित्व वाढत आहे. त्यातून व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचे नव्याने अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे. या नव्या बदलाचे आकलन होण्यासाठी राजकीय संस्कृतीचे महत्त्व असाधारण स्वरूपाचे आहे यात शंका नाही. त्यामुळे राजकीय संस्कृतीचे अध्ययन मोठया प्रमाणावर करणे गरजेचे आहे.

५. **तीव्र सामाजिक संघर्षाचा अभ्यास-** वाढत्या औद्योगिकरण, नागरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे स्थलांतराचे प्रमाण वाढत आहे. या स्थलांतरातून सामाजिक गटात विविधता वाढत आहे. सामाजिक गटातील विविधतेचे रूपांतर तीव्र सामाजिक संघर्षात होत आहे. हा संघर्षाचे निराकरण करणे शासनाच्या शक्तीबाहेरचे कार्य होऊन बसते. सामाजिक संघर्ष तीव्र असण्याचे कारण म्हणजे त्या प्रदेशात धर्म, जात, वंश, लिंग इत्यादीच्या आधारावर निर्माण झालेले विविध गट आहेत. या विविध सामाजिक विविधता असलेल्या गटात राष्ट्रीय निष्ठा निर्माण करण्याचा प्रयास सुरू आहे. काही देशात फार प्रयोग नवीन राजकीय यंत्रणा निर्माण करून सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. उदा. भारतात असलेली धर्म, भाषा आणि प्रदेशाबाबत असलेल्या विविधतेचा प्रश्न सोडविण्यासाठी संघराज्यात्मक व्यवस्था निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. राजकीय संस्कृतीचा अर्थ सांगा.
   उत्तर- प्रत्येक राष्ट्राला स्वतःची विशिष्ट अशी संस्कृती असते. त्या संस्कृती बद्दल राष्ट्राला अभिमान देखील असतो. मॅक्रेटिसच्या मते एखादया राजकीय समाजाने सामान्यपणे स्वीकारलेले राजकीय उद्दिष्टये म्हणजे राजकीय संस्कृती होय.
२. राजकीय संस्कृतीत प्रतीकांचा वापर कोणत्या कारणासाठी केला जातो.
   उत्तर- राष्ट्राबद्दल आत्मियता निर्माण करण्यासाठी, जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठी आणि राजकीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी राजकीय संस्कृतीत प्रतीकाचा वापर केला जातो.
३. राजकीय संस्कृतीची दोन वैशिष्टये सांगा.
   उत्तर- राजकीय संस्कृती सामाजिक संस्कृतीची उपसंस्कृती असते, राजकीय संस्कृती गतिमान वा अलिखित असू शकते तसेच राजकीय संस्कृती एकजिनशी नसते ही राजकीय संस्कृतीची दोन वैशिष्टये सांगता येतात.
४. राजकीय संस्कृतीचे आल्मंड केलेले प्रकार कोणते?
   उत्तर- आल्मंडने संकुचित राजकीय संस्कृती, आज्ञाकित राजकीय संस्कृती आणि सहभागी राजकीय संस्कृती हे तीन प्रकार पाडलेले आहेत.
५. राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणणारे दोन घटक सांगा.
   उत्तर- राजकीय संस्कृतीत संसूचन माध्यमे, राजकीय पक्ष, बाहय प्रभाव शक्ती आणि राजकीय विचारप्रणाली हे बदल घडवून आणणारे घटक आहेत.
६. डॉ. फायनर यांनी केलेले राजकीय संस्कृतीचे केलेले दोन प्रकार लिहा.
   उत्तर- परिपक्व राजकीय संस्कृती, विकसित राजकीय संस्कृती, अतिअल्प राजकीय संस्कृती आणि कनिष्ठ राजकीय संस्कृती हे राजकीय संस्कृतीचे प्रकार डॉ. फायनर यांनी केलेले प्रकार आहेत.
७. राजकीय संस्कृतीचे महत्त्व आधुनिक काळात का आहे.
   उत्तर- जागतिक स्थित्यंरे समजण्यासाठी, नव्या मूल्यांचे आकलन होण्यासाठी, नवे बदल जाणून घेण्यासाठी राजकीय संस्कृतीचे महत्त्व वाढत आहे.
८. राजकीय संस्कृतीचे दोन आधारभूत घटक कोणते?
   उत्तर- भौगोलिक परिस्थिती, इतिहास, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती आणि राजकीय व्यवस्थेचे स्वरूप ही राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक आहेत.

## प्रकरण ४ थे
## राजकीय सामाजीकरण

**प्र.१ला. राजकीय सामाजीकरण म्हणजे काय ते सांगुन राजकीय सामाजीकरणाची वैशिष्टये सांगा?**

सामाजीकरण ही एक जुनी संकल्पना आहे. तिचा अभ्यास समाजशास्त्रात केला जात असे. सामाजीकरण संस्काराशी निगडित असलेली प्रक्रिया आहे. सामाजीकरण प्रक्रियाद्वारे समाज जीवनात मूल्याचे सातत्य पिढयापिढया टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक नवी पिढी आधीच्या पिढीकडून संस्कृतीचा वारसा घेते आणि नंतरच्या पिढीकडे ती संक्रमित करते. ही प्रक्रिया अखंडपणे सुरू राहते. ही प्रक्रिया जाणतेअजाणतेपणे घडत असते. सामाजिक जीवनाशी प्रस्तुत असलेले सहजशिक्षण म्हणजे सामाजीकरण होय. सामाजीकरण प्रक्रियेचा जो भाग राजकीय जीवनाशी संबंधित असतो त्याला राजकीय सामाजीकरण म्हटले जाते. आधुनिक काळात राजकीय सामाजीकरण संकल्पनेचा अभ्यास राज्यशास्त्र दुसऱ्या महायुध्दानंतर होऊ लागला. समाजातील वेगवेगळया घटकांकडून राजकीय माहिती व मूल्य लोकांमध्ये जाणीवपूर्वक रूजविण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजीकरण होय. राजकीय संस्कृती आणि सामाजीकरण हे परस्परांशी संबंधित आहे. राजकीय संस्कृती सतत बदलत असते. हे बदल राजकीय सामाजीकरण प्रक्रियेमुळे होतात. राजकीय सामाजीकरण प्रक्रियेद्वारे व्यक्तीला राजकारणाबद्दल माहिती वा ज्ञान प्राप्त होते. व्यक्तीचे सामाजीकरण झाल्यास व्यवस्थेची स्थिरता टिकू शकते व म्हणूनच विसाव्या शतकातील सर्व राजकीय व्यवस्था आणि नव्या निर्माण झालेल्या राजकीय व्यवस्था स्वतः स्वीकारलेल्या मूल्य, कार्यक्रम आणि धोरणाला लोकांची मान्यता मिळावी म्हणून लोकांचे विशिष्ट दिशेने सामाजीकरणावर भर देतांना दिसत आहे.

**राजकीय सामाजिकरण अर्थ व व्याख्या -**

१) **आईस्टाईन-** प्रत्येक मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या सहवासात आल्यानंतर जे शिकतो किंवा त्यांच्याशी जे काही संसूचन करतो ते शिक्षण आणि संसूचन म्हणजे राजकीय सामाजिकरण होय.

२) **डेव्हिड ईस्टन-** व्यक्तीचा राजकीय पिंड घडवणारी आणि व्यक्तीला राजकारणाबद्दल ज्ञान प्राप्त करून देणारी प्रक्रिया तसेच आयुष्याच्या प्रत्येक अवस्थेत प्राप्त होणारे ज्ञान म्हणजे राजकीय सामाजिकरण होय.

३) **रूश व अल्थॉफ-** व्यक्तीस राजकीय व्यवस्थेची ओळख ज्या प्रक्रियेमुळे होते व राजकारणाविषयी व्यक्तीची संवेदना व प्रतिक्रिया जी प्रक्रिया ठरविते ती प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया आहे.

**राजकीय सामाजीकरणाची वैशिष्टये-** राजकीय सामाजीकरण ही आधुनिक युगातील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. राजकीय सामाजीकरण ही एक शैक्षणिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची काही ठळक वैशिष्टये सांगता येतात.

१) **सतत घडणारी प्रक्रिया-** राजकीय सामाजीकरण हे सतत घडत असते. त्यात कधीही खंड पडत नाही. ही प्रक्रिया एक शैक्षणिक प्रक्रिया असल्यामुळे कधीही खंड पडत नाही. म्हणून ही प्रक्रिया स्थिर नसून गतिमान असते. मनुष्य जन्मभर शिकत असतो. लहानपणा पासून ते वृद्धकाळा पर्यंत त्यांचे शिक्षण चालू राहते. राजकीय मूल्य आणि दृष्टिकोन निर्माण करण्याची प्रक्रिया सतत चालू असते. उदा. कुटुंबात लहान मूल निष्ठा, आज्ञापालन हे गुण शिकते वडिलाबद्दल मुलांत निष्ठा असेल तर मोठेपणी नेत्याबद्दल त्यांच्या मनात निष्ठा निर्माण होते. बालपणी व तरूणपणी संस्कार लवकर होतात. कारण त्यांचे मन अधिक संस्कारक्षम असते. वाढत्या वयाबरोबर ज्ञान व अनुभव वाढत जातो. म्हणून वृद्ध व प्रौढ माणसाची मने निश्चित असल्याने ते शिकण्यापेक्षा शिकविण्याच्या स्थितीत अधिक असतात. सामाजीकरण ही प्रक्रिया सातत्याने चालू असली तरी तिचा वेग कमी जास्त असतो.

२) **दृष्टिकोनाची निर्मिती-** राजकीय सामाजीकरणाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकामध्ये विशिष्ट दृष्टिकोन निर्माण होत असतात. प्रत्येक राजकीय व्यवस्था निर्मितीच्या वेळेस काही मूल्यसोबत घेऊन जन्मास येते. ती व्यवस्था आपल्या मूल्यांचे बीजारोपण व्यवस्थेतंर्गत राहणाऱ्या लोकामध्ये करत असते. त्या मूल्यांच्या आकलनातून लोकांच्या राजकीय भूमिका बनत असतात. म्हणून प्रत्येक राजकीय व्यवस्था आपल्या अनुकूल मूल्य, श्रद्धा, प्रेरणा, राजकीय संस्कार सामाजीकरण प्रक्रियेद्वारे करत असते. त्यासाठी विविध कार्यक्रम, कायदे, घोषणा व आपल्या कार्याच्या माध्यमातून राजकीय सामाजीकरण करण्याचा प्रयत्न राजकीय व्यवस्थेकडून केला जात असतो. उदा. लोकशाही शासन व्यवस्थेत राहणारा नागरिकांचे सामाजीकरण लोकशाही मूल्य आणि श्रद्धा रूजवून केले जात असल्यामुळे त्यांच्यात लोकशाही दृष्टिकोन विकसित होत असतो.

३) **सुप्त वा उघड स्वरूपातील कार्य-** सामाजीकरणाची प्रक्रिया समाजात दोन प्रकार घडत असते. काही वेळेस सामाजीकरण कळतनकत वा आपोआप घडते तर काही वेळा हेतूपुरस्कर सामाजीकरण घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. सामाजीकरणाची प्रक्रिया काही वेळेस सुप्त स्वरूपात कार्यरत असते. एखादया घरात आई वडिल विशिष्ट पक्षाच्या विचाराने भारलेले असतील. त्या पक्षाच्या लोकाचे येणे जाणे व चर्चा सुरू असते. पक्ष नेत्याचे फोटो घरात असतील तर या वातावरणाचा परिणाम त्या घरातील मुलांवर होतो. त्या घरातील मुलांना हेतूपुरस्कर राजकीय शिक्षण दिले जात नाही मात्र नकळत राजकीय क्षेत्राशी संबंध येत असतो. रस्त्याने एखादी व्यक्ती जात असतांना रस्त्याच्या बाजूला चालू असलेल्या सभेतील भाषण नकळत तिच्या कानावर पडते आणि त्यातून तिचे विचार तयार होऊ शकतात. या व्यक्त वा गुप्त स्वरूपाचे सामाजीकरण असे म्हणतात. याउलट राजकीय सामाजीकरण घडवून आणण्यासाठी एखादी व्यक्ती, संस्था किंवा व्यवस्था जाणीवपूर्वक प्रयत्न करत असेल तर त्या सामाजीकरणास उघड स्वरूपाचे सामाजीकरण असे म्हणतात. शाळा व महाविद्यालयात जे राजकीय शिक्षण दिले जाते ते उघड स्वरूपाचे असते. महाविद्यालयात वर्ग प्रतिनिधीची निवड होते. त्यामुळे लहान वयात निवडणूक म्हणजे काय यांची ओळख होऊन सामाजीकरण घडून येते. हुकूमशाही देशात बालपणातच सक्तीने हुकूमशाहीला अनुकूल सामाजीकरण घडवून आणले जाते.

४) **अनुभवजन्य प्रक्रिया-** राजकीय सामाजीकरण ही अनुभवजन्य प्रक्रिया आहे. राजकीय सामाजिकरण ही प्रक्रिया अनुभवावर आधारलेली आहे. समाजातील प्रत्येक घटकाला राजकीय घडामोडीचा अनुभव येतात. सर्व लोकांचे अनुभव सारखे नसतात. त्यामुळे सर्वाचे राजकीय सामाजीकरण सारख्या रितीने होत नाही. काही व्यक्ती अधिक संस्कारक्षम असतात. त्यामुळे त्यांचे सामाजीकरण लवकर घडते. अनुभवाच्या आधारे व्यक्ती राजकीय निर्णय घेत असते. उदा.एखादया राजकीय पक्षा विषयी लोकांचा अनुभव चांगला नसेल तर लोक निर्णय बदलतात. १९७७ च्या निवडणुकीत आणीबाणीच्या अनुभवामुळे लोकांनी कॉंग्रेस पक्षाला मतदान केले नाही.

५) **प्रभावाची विविधता-** राजकीय सामाजीकरणाचे समाजातील वितरण विषम स्वरूपाचे असते. राजकीय व्यवस्थेद्वारे दिले जाणारे संस्कार समान असले तरी त्यांचा प्रभाव सर्वांवर सारख्या प्रमाणात पडत नाही. उदा. एखादा नेत्याचे भाषण काहींना खूप आवडेल तर काहींना ते अजिबात आवडणार नाही. राजकीय सामाजीकरण ही शैक्षणिक प्रक्रिया आहे. प्रत्येकांची ग्रहण व आकलन क्षमता भिन्न भिन्न असल्यामुळे सामाजीकरणाचा वेगातही फरक असतो. उदा. मतदान प्रशिक्षणात एखादयाला नुसते प्रात्यक्षिक दाखविले तरी तो शिकतो. काहींना प्रात्यक्षिक दाखवूनही प्रत्यक्ष कृती करण्याची संधी द्यावी लागते. काही लोक वारंवार सूचना देऊन ही शिकत नाही काही लोक एकदाच सूचना दिल्यावर शिकतात याचा अर्थ राजकीय सामाजीकरण एकाच पद्धतीने होत नाही. प्रत्येकाच्या राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया दुसऱ्यापेक्षा भिन्न असते.

६) **सामाजीकरण ही एक संस्कार क्रिया-** सामाजिकरण ही जुनी संकल्पना असून तिचा अभ्यास समाजशास्त्रात केला जात असे. आधुनिक काळात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रयत्नांनी सामाजीकरण घडवून आणले जाते. शासन वेगवेगळया योजना, रूढी व परंपरेच्या माध्यमातून सामाजीकरण करण्याचा प्रयत्न करत असते. अनुकरण, शिक्षण व प्रेरणा या प्रक्रियेतून सामाजीकरण घडवून आणले जाते.

a. **अनुकरण-**व्यक्ती अनुकरणाने बऱ्याच गोष्टी शिकत असते. परंपरावादी समाजामध्ये अनुकरणाचा प्रभाव जास्त असतो. राजकीय कार्यक्रम, मूल्य आणि दृष्टिकोन स्वीकारतांना बुद्धिनिष्ठ पद्धतीने विचार केला जात नाही. पूर्वापार चालत आलेला दृष्टिकोन तसाच स्वीकारला जातो. पिढयापिढया एकाच पक्षाला पाठिंबा देणाऱ्या व्यक्ती परंपरेतून राजकीय दृष्टिकोन स्वीकारतात. व्यक्ती चिकित्सक पद्धतीने राजकीय विचाराचा स्वीकार न करता मित्र, गुरू, आपला प्रेरणास्थान यांनी स्वीकारलेल्या मूल्यांचे अनुकरण करून राजकीय सामाजीकरण करत असतो.

b. **शिक्षण-** शिक्षणाच्या माध्यमातून वेगवेगळया गोष्टीचे ज्ञान व्यक्ती प्राप्त करत असते. ज्ञान वाढविणे, दृष्टिकोन अधिक बुद्धिनिष्ठ बनविणे हा शिक्षणाचा प्रधान हेतू असतो. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती आपले पूर्वग्रह, गैरसमज आणि अज्ञानाला दूर सारून सारासार विचार करून राजकीय मूल्यांना स्वीकृती देत असतो. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीच्या ज्ञानात प्रगभता आणि परिपक्वता येत जाते. म्हणून सुशिक्षित व्यक्तीचा राजकीय दृष्टिकोन अज्ञाना व्यक्तीपेक्षा भिन्न असतो.

c. **प्रेरणा-** काही व्यक्ती इतरांच्या अनुकरण किंवा नक्कल करून तर काही व्यक्ती शिक्षणातून राजकीय सामाजीकरण होत असते. मात्र काही व्यक्तीचे राजकीय वर्तन वा कृती प्रेरणा व चेतनेवर अवलंबून असते. त्यांना चेतना मिळाल्याशिवाय ते कार्य तत्पर होत नाही.

या तीन प्रक्रियातून व्यक्तीचे सामाजीकरण घडवून आणले जाते.

**प्र. २ रा. राजकीय सामाजीकरणाची साधने किंवा माध्यमे स्पष्ट करा?**

समाजातील वेगवेगळया संस्था राजकीय सामाजीकरण घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतात.

१) **कुटुंब संस्था-** राजकीय सामाजीकरण प्रक्रियेत कुटुंबसंस्थेस प्रथम स्थान दिले जाते. कुटुंब संस्था ही ज्ञानाची पहिली खिडकी मानली जाते. प्रत्यक्ष सत्तेचा संबंध लहानपणी कुटुंबात येत असतात. आई वडिल आणि कुटुंबातील इतर सदस्य लहान मुलावर प्रभाव टाकत असतात. आज्ञापालन, निष्ठा इ. अनेक गुण कुटुंबातून मुलांमध्ये विकसित केले जातात. हे गुण व्यक्तीत मोठे वा परिपक्व झाल्यावर राजकीय वर्तनात दिसून येतात. वडिलाबद्दल आदर असेल तर समाजातील नेत्याबद्दल देखील आदर निर्माण होतो. कुटुंबाचे संस्कार इतके मजबूत असतात की त्यांचे अस्तित्व दीर्घकाळ पर्यंत असते. म्हणून आई वडिलांची राजकीय मते मुलामध्ये निर्माण होतात. उदा. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत वडिलाचा कल ज्या पक्षाकडे असेल त्याच पक्षाला ७०% मुलांनी मतदान केलेले दिसते. म्हणून साम्यवादी देशात हेतूपुरस्कर कुटुंबात राजकीय शिक्षण दिले जाते. काही विचारवंत कुटुंबात होणाऱ्या राजकीय सामाजीकरणाचा सखोल व व्यापक परिणाम होता असे मानतात. कारण व्यक्तीचे प्रदीर्घ काळ कुटुंबात वास्तव्य असते. व्यक्तीच्या गरजा कुटुंबात पूर्ण होतात व्यक्ती अनेक गोष्टींच्या बाबतीत कुटुंबावर अवलंबून असतो. व्यक्ती अनुकरणाची प्रवृत्ती असल्यामुळे अनेक व्यक्ती कुटुंबातील राजकीय मूल्याचे अनुकरण करत असतो. कुटुंबाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दर्जा व्यक्तीला जन्माबरोबर आपोआप लाभत असल्यामुळे कुटुंबाची राजकीय भूमिकाही व्यक्तीच्या अगवळणी पडत असते. मात्र कुटुंबात होणारे राजकीय सामाजीकरण बहुतांशी परंपराप्रधान व जैसे थे-वादी स्वरूपाचे असते. कुटुंबाद्वारे होणारे राजकीय सामाजीकरण व्यापक असले तरी व्यक्ती प्रौढ झाल्यावर किंवा अनुभवातून राजकीय जीवनाचे आकलन करू लागल्यास तिच्या धारणा बदलू शकतात. त्यामुळे सर्व व्यक्तीच्या मतावर कुटुंबाचा प्रभाव असेलच असे नाही.

२) **शिक्षण संस्था-** कुटुंबात औपचारिक शिक्षण दिले जाते पण शिक्षण संस्थेत औपचारिक व आनौपचारिक शिक्षण दिले जाते. शालेय जीवनातील अनुभव व्यक्तीच्या राजकीय क्षमतेवर प्रभाव पाडू शकतात. कुटुंबातील अधिकारविषयक पारंपरिक कल्पनांनाच्या विरोधात भावना शाळा हे माध्यम निर्माण करू शकते. म्हणून सर्वंकष व्यवस्थेत कुटुंबाचा प्रभाव कमी करण्यासाठी शाळा या माध्यमाचा वापर केला जात असतो. शिक्षण संस्थेतून होणारे राजकीय सामाजीकरण शास्त्रीय पद्धतीने होत असते. शाळा, महाविद्यालयात विशिष्ट पद्धतीने संस्कार केले जातात. शिक्षणातून शिकविले जाणारे विविध विषयातून राजकीय सामाजीकरण केले जात असते. त्यातून त्यांची मनोवृत्ती तयार होत असते. आल्मंड आणि व्हर्बाच्या मते व्यक्तीचे शिक्षण जितके अधिक तितके राजकीय ज्ञान अधिक असते. शिक्षित व्यक्तीचा राजकीय चर्चत सहभाग अधिक असतो. शाळेत प्रत्यक्ष राजकीय शिक्षण दिले जात नाही तर अप्रत्यक्षरीत्या म्हणजे राष्ट्रीय नेत्या जयंत्या, सांस्कृतिक कार्यक्रम, अध्यापन इत्यादी माध्यमातून सामाजीकरण केले जात असते. शिक्षण संस्थेवर जर सरकारचे नियंत्रण असेल तर सरकारला हवी असलेली विचारसरणी अमलात आणली जाते. उदा.साम्यवादी देशात साम्यवादाला पूरक विचार शाळेत शिकविले जातात. याउलट लोकशाहीत मुक्त व खाजगी शिक्षण असल्याने वेगवेगळया विचाराना वाव दिला जातो. शिक्षण वेगवेगळया विचाराची ओळख करून देणारी आणि इतिहासाचे मर्म सांगणारी प्रक्रिया असल्याने सामाजीकरणात तिचे मोलाचे योगदान आहे. ज्या देशात शिक्षणाचे प्रमाण जास्त असते तेथे परिवर्तनाची गती जास्त असते. तरीही शिक्षणाचा प्रभाव हा विशिष्ट स्वरूपाचा नसून सर्वसाधारण स्वरूपाचा असतो. तो प्रत्यक्ष असण्यापेक्षा परिस्थितीजन्य असतो. कारण शाळेत शिकणारी मूले इतर घटकांच्या प्रभावाखाली आल्याने त्यांचे दृष्टिकोन दृढ होतात. त्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेत संघर्ष निर्माण होतात. तरीही राजकीय व्यवस्थेतील मूल्ये नवीन पिढयांना शिकविण्याचे कार्य शिक्षणसंस्था करत असतात. चारित्र्य, कर्तव्य भावना, राष्ट्रप्रेम, गटनिष्ठा व शिस्त या राजकारणासाठी उपयुक्त गोष्टींचे ज्ञान शिक्षणाद्वारे होत असते. त्यामुळे राजकीय सामाजीकरणामध्ये शाळा या माध्यमाचा प्रभाव पडत असतो.

३) **राजकीय पक्ष-** आधुनिक काळात राजकीय पक्षाद्वारे होणारे सामाजीकरण सर्वात प्रभावी आणि विस्तृत स्वरूपाचे असते. लोकांच्या पाठिब्यावर राजकीय पक्षांना निवडणुकीत यश मिळवून सत्ता मिळत असते. त्यामुळे राजकीय पक्ष सत्ता संपादनासाठी एकत्र येत असले तरी राजकीय व्यवस्थेला आकार देण्याचे आणि लोकमत घडविण्याचे कार्य राजकीय पक्ष कुशलतेने पार पाडत असतात. प्रत्येक पक्ष लोकमतांचा पाठिंबा मिळविण्यासाठी आपल्या विचारसरणीचा प्रसार करीत असतात. निवडणुकीच्या काळात व सत्ता मिळविण्याकरिता प्रचार, सभा, जाहीरनामा व अधिवेशन इ.मार्गाचा अवलंब करतात. या मार्गातून व्यक्तीला राजकीय जाणीव व जागृती निर्माण होते व त्यांचे राजकीय सामाजीकरण होते. जनता व शासन यातील महत्त्वपूर्ण दुवा म्हणून राजकीय पक्ष कार्य करतात. मतदारांच्या हितसंबंधाना आपल्या पक्षाच्या जाहीरनाम्यात स्थान देऊन जनतेचा आकर्षिक करण्याचा प्रयत्न करतात. सत्ताप्राप्तीनंतर जनहिताच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करून राजकीय जागृती करून राजकीय सामाजीकरणाचा प्रयत्न करतात. सर्वंकष व्यवस्थेत एकपक्षीय राजवट असल्याने तेथे वेगळया प्रकारच्या राजकीय सामाजीकरणाचा अवलंब केला जातो. जनतेच्या मागण्या व अधिकार नियंत्रित केले जात असतात. बळाचा वापर, आकर्षक व मोहक कार्यक्रम व आश्वासनाचा वापर, राष्ट्रप्रेमाच्या भावनेचा अवलंब करून तेथे जनतेचे राजकीय सामाजीकरण करण्याचा प्रयत्न केले जात असतो. सर्वंकष राजवटीत एका चौकटीत राजकीय सामाजीकरणाचा प्रयास केला जातो. एखादया राजकीय घटनेविषयी किंवा व्यवस्थेविषयी लोकांची विचारसरणी बनविण्यात राजकीय पक्ष प्रमुख भूमिका पार पाडत असतात. विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव तरूण व लहान बालकावर पार पाडण्यासाठी राजकीय पक्ष संघटना बांधणीचे कार्य करतात. उदा. रशियात यंग पायोनिअर्स व कोमसोमोल, भारतात विविध पक्षाच्या युवक संघटना

४) **व्यक्तिचे कार्यक्षेत्र वा दबाबगट-** प्रत्येक व्यक्ती उपजीवकेसाठी नोकरी किंवा व्यवसाय करीत असते. ज्या ठिकाणी ती काम करत असते. तिथे देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया चालू शकते.

कामगार कारखान्यात काम करतात. त्यांच्या संघटना असतात. कारखान्यात कामगार राजकीय विषयावर चर्चा करतात. आपले हितरक्षणासाठी संघटना स्थापन करतात. संघटना आपले प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय पक्षाशी बांधिलकी पत्करतात. संघटना विशिष्ट पक्षाशी संलग्न झाल्यास कामगार विशिष्ट पक्षाबद्दल सहानुभूती निर्माण होते आणि सहानुभूतीतून विशिष्ट प्रकारची विचारसरणी विकसित होत असते. उदा.इंटक काँग्रेस पक्ष आपल्या व्यावसायिक हितसंबंधाचे रक्षण करणे हे संघटनेचे ध्येय असते. हे हितरक्षण ज्या मार्गाने पूर्ण होईल त्या मार्गाचा अवलंब संघटना अवलंबतात. अशा वेळी हितसंबंधास पोषक राजकीय भूमिका दबाबगटांना घ्यावी लागते. त्यामुळे त्यास अनुकूल राजकीय दृष्टिकोनाचा स्वीकार केल्यामुळे कळतनकत सदस्यांचे राजकीय सामाजीकरण होत असते.

५) **सांस्कृतिक संघटना-** मोकळया वेळेत किंवा फुरसतीचा वेळ घालविण्यासाठी व्यक्ती वेगवेगळया संघटनेच्या कार्यात भाग घेत असतात. उदा.महिला मंडळ संघटनेचे सदस्य नियमितपणे एकत्र येत असतात. संघटनेचे कार्य करतांना राजकीय समस्या व राजकारणावर चर्चा होते. राजकारणात सहभाग घ्यावा याबद्दल प्रोत्साहन दिले जाते या सर्व कृतीतून एक विशिष्ट राजकीय दृष्टिकोन विकसित होऊन राजकीय सामाजीकरण घडवून येते. निवडणुकीच्या काळात या संघटनेच्या कार्यात विशेष उठाव मिळत असतो. तसेच बहुसंख्य राजकीय नेते आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात सांस्कृतिक गटातील सहभागातून सुरू करतात यावरून या राजकीय सामाजीकरणाचे महत्त्व लक्षात येते.

६) **प्रसार माध्यमे-** वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी, रेडिओ ही संसूचन माध्यमे आहेत. प्रसार माध्यमाचे राजकीय सामाजीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. वर्तमान पत्रातून अग्रलेख राजकीय बातम्या, व्यंगचित्र इ.माध्यमातून राजकीय जागृती घडवून आणली जाते. वृत्तपत्र खाजगी मालकीची असेल तर सामाजीकरण योग्य होईल याउलट सरकारच्या मालकीचे असेल तर सामाजीकरण चुकीचे सामाजीकरण होण्याची शक्यता असते. टि.व्ही या माध्यमातून निरक्षर लोकाचे राजकीय सामाजीकरण घडवून आणता येते. जाहिराती, राजकीय चर्चा, मुलाखती, बातम्या इ.माध्यमातून ही सामाजीकरण घडवून आणतात. हुकूमशाही देशात या साधनावर सरकारची मालकी असल्यामुळे सामाजीकरणात विविधता दिसून येत नाही. वृत्तपत्रानंतर नभोवाणी हे माध्यम राजकीय सामाजीकरणात प्रभावी भूमिका बजावत असते. या माध्यमाचे वैशिष्टये म्हणजे निरक्षर लोकांचेही हे माध्यम सामाजीकरण घडवून आणत असते. भौगोलिकदृष्टया दूरवरील भागातही नभोवाणी माध्यमाच्या माध्यमातून सामाजीकरण घडवून आणता येईल. आधुनिक काळात दूरचित्रवाणी हे अत्यंत प्रगत माध्यम आलेले आहे. या माध्यमाच्या माध्यमातून एकाच वेळेस राजकीय बातम्याचे वार्ताकन आणि चित्राकन करता येते. थेट प्रसारणामुळे प्रत्यक्ष घटनेच्या अनुभव येत असल्याने संसूचनाच्या इतर माध्यमापेक्षा हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे.

७) **प्रतीके-** प्रतीके सुद्धा राजकीय प्रवृत्ती विकसित करण्यात प्रभावी भूमिका बजावत असतात. विशिष्ट समाजातील राजकीय प्रतीकाच्या सहाय्याने औपचारिक सामाजीकरण घडवून आणले जाते. भारतात १५ऑगस्ट, प्रजासत्ताक दिन, चीन मध्ये मे दिन, इंग्लंड मध्ये राज्यारोहण समारंभ इ.कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकासमोर इतिहास उभा केला जातो. आणि त्यातून राजकीय सामाजीकरण घडवून आणले जाते. प्रतीकाच्या माध्यमातून ऐतिहासिक सातत्य व राजकीय एकात्मतेचे दर्शन घडत असते. त्यातून राजकीय दृष्टया महत्त्वपूर्ण गोष्टींविषयी भावनात्मक प्रतिसाद व दृष्टिकोन निर्माण होत असतात. त्या दृष्टिकोनाच्या आधारावर राजकीय निर्णय घेतले जातात.

८) **राजकीय व्यवस्थेचा प्रत्यक्ष संबंध-** राजकीय व्यवस्थेची स्थापना लोकांसाठी असल्यामुळे जनतेचा राजकीय व्यवस्थेशी नेहमी संबंध येत असतो. पोलिस, नेते, तलाठी इ या न त्या कारणाने संबंध येतो. त्यातून राजकीय ज्ञान मिळते आणि राजकीय सामाजीकरण घडते. प्रत्यक्ष संपर्काच्या माध्यमातून होणारे सामाजीकरण इतर माध्यमातून झालेल्या सामाजीकरणापेक्षा प्रभावी व वास्तवतावादी असते.

९) **अनुभव-** राजकीय सामाजीकरणात अनुभव हा महत्त्वपूर्ण घटक असतो. कारण व्यक्तीची राजकीय वर्तणूक अनुभवावर आधारित असते. व्यक्ती राजकीय अनुभव नसल्यास व्यक्ती त्याविषयी प्रतिक्रिया व्यक्त करणार नाहीत. म्हणून नव्याने स्थापन राजकीय पक्षाबद्दल जनता निश्‍चित व्यक्त करू शकत नाही. व्यक्तीच्या अनुभवावर व्यक्तीचा राजकीय दृष्टिकोन ठरत असतो. उदा. संप, निदर्शने केल्याशिवाय शासन मागण्या मान्य करीत नसेल तर जनता त्याच मार्गांचा अवलंब करते राजकीय सामाजिकरण प्रक्रियेत सर्वांना येणारे अनुभव समान नसल्यामुळे सर्वांचे राजकीय सामाजीकरण समानरीतीने होत नाही. लोकांचा अनुभव बदल्यास लोकांचा राजकीय निर्णयही बदल असतो. उदा. इंदिरा गांधीनी लादलेल्या आणीबाणीमुळे त्यांच्या पक्षावर विश्वास कमी होऊन जनतेने १९७७ साली जनता पक्षाला निवडून दिले होते.

१०) **शासनसंस्था-** राजकीय सामाजीकरणातील एक अत्यंत महत्त्वाचे माध्यम म्हणजे शासन होय. शासनाकडून अंमलात आणल्या जाणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम, प्रचार यांच्या माध्यमातून जनतेच्या राजकीय मतात बदल घडवून आणू विशिष्ट प्रकारचे राजकीय सामाजीकरण घडवून आणण्याचा प्रयत्न करत असतात. कारण प्रत्येक शासनाला जनतेच्या अधिमान्यतेची गरज असते. ही अधिमान्यता आपोआप मिळत नसते म्हणून शासन विविध समाजघटकांसाठी कल्याणकारी योजनाची आखणी करून त्या घटकाला खूश करून अधिमान्यता मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. जनतेत राजकीय निष्ठा विकसित झाल्यास आपोआप आज्ञापालन घटत असते म्हणून शासनव्यवस्था राजकीय सामाजीकरणाच्या माध्यमातून हे कार्य पार पाडत असते.

वरिल साधनाच्या सहाय्याने राजकीय सामाजीकरण घडवून आणले जाते. याशिवाय शेजारी, धर्मसंस्था, इ.घटक ही सामाजीकरण घडवून आणण्याचे काम करतात.

**टिप- राजकीय सामाजीकरणाचे प्रकार किंवा वर्गीकरण-** राजकीय सामाजीकरण पुढील प्रकार पडतात.

१) **औपचारिक व अनौपचारिक राजकीय सामाजीकरण** - राजकीय व्यवस्थेचे पद्धतशिरपणे अध्ययन करून मिळविलेले ज्ञान म्हणजे औपचारिक राजकीय सामाजीकरण होय. या सामाजीकरणाच्या माध्यमातून हेतूपुरस्कर व शास्त्रीय पद्धतीने राजकीय जागृती निर्माण होऊन जनतेला राजकीय चेतना मिळावी म्हणून प्रयत्न केले जातात. त्यास औपचारिक राजकीय सामाजीकरण असे म्हणतात. उदा.महाविद्यालयात दिले जाणारे शिक्षण होय. याउलट सभा, संमेलने, राजकीय चर्चा यातून कळत-नकळत राजकारणाबदल ज्ञान प्राप्त होते. या सामाजीकरणामागे कोणताही विशिष्ट हेतू नसतो. राजकीय माहितीच्या आधारावर राजकीय दृष्टिकोन विकसित होत असतात या प्रकारे अनौपचारिक राजकीय सामाजीकरणाचे प्रक्रिया घडत असते.

२) **संस्थात्मक आणि बिगर संस्थात्मक राजकीय सामाजीकरण-** काही संस्था जाणीवपूर्वक राजकीय प्रशिक्षण व ज्ञान देण्याचा प्रयत्न करतात. राजकीय विषयावर चर्चा घडवून आणतात. आपल्या सदस्यांनी राजकारणात उघड सहभाग घ्यावा म्हणून प्रोत्साहन देत असतात. या प्रयत्नातून विशिष्ट राजकीय दृष्टिकोन विकसित होऊन स्वतंत्र राजकीय समाजाची निर्मिती होते. उदा.राजकीय पक्ष आपल्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करतात यालाच संस्थात्मक राजकीय सामाजीकरण म्हणतात. याउलट राजकीय घटना, स्वातंत्र्य आंदोलनातून मिळणारे अनुभव इत्यादीतून ही राजकीय सामाजीकरण प्रक्रिया घडते. ही प्रक्रिया घडविण्यास कोणत्याही संस्था घडविण्यास कोणतीही संस्था जबाबदार नसते. समाजात राजकारणासंबंधित विविध घटना घडत असतात. या घटनातून व्यक्तीच्या विचार प्रक्रियेला चालना मिळून राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया पार पाडत असते.

३) **सुप्त वा उघड स्वरूपातील राजकीय सामाजिकरण-** सामाजीकरणाची प्रक्रिया समाजात दोन प्रकार घडत असते. काही वेळेस सामाजीकरण कळतनकत वा आपोआप घडते तर काही वेळा हेतूपुरस्कर सामाजीकरण घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. सामाजीकरणाची प्रक्रिया काही वेळेस सुप्त स्वरूपात कार्यरत असते. एखादया घरात आई वडिल विशिष्ट पक्षाच्या विचाराने भारलेले असतील. त्या पक्षाच्या लोकाचे येणे जाणे व चर्चा सुरू असते. पक्ष नेत्याचे फोटो घरात असतील तर या वातावरणाचा परिणाम त्या घरातील मुलांवर होतो. त्या घरातील मुलांना हेतूपुरस्कर राजकीय शिक्षण दिले जात नाही मात्र नकळत राजकीय क्षेत्राशी

संबंध येत असतो. रस्त्याने एखादी व्यक्ती जात असतांना रस्त्याच्या बाजूला चालू असलेल्या सभेतील भाषण नकळत तिच्या कानावर पडते आणि त्यातून तिचे विचार तयार होऊ शकतात. या व्यक्त वा गुप्त स्वरूपाचे सामाजीकरण असे म्हणतात. याउलट राजकीय सामाजीकरण घडवून आणण्यासाठी एखादी व्यक्ती, संस्था किंवा व्यवस्था जाणीवपूर्वक प्रयत्न करत असेल तर त्या सामाजीकरणास उघड स्वरूपाचे सामाजीकरण असे म्हणतात. शाळा व महाविद्यालयात जे राजकीय शिक्षण दिले जाते ते उघड स्वरूपाचे असते. महाविद्यालयात वर्ग प्रतिनिधीची निवड होते. त्यामुळे लहान वयात निवडणूक म्हणजे काय यांची ओळख होऊन सामाजीकरण घडून येते. हुकूमशाही देशात बालपणातच सक्तीने हुकूमशाहीला अनुकूल सामाजीकरण घडवून आणले जाते.

**टिप- राजकीय सामाजीकरणाची आवश्यकता, गरज वा महत्त्व -**

राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया ही प्राचीन काळापासून महत्त्वपूर्ण मानली जाते. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या सारख्या विचारवंताच्या विचारात ही अप्रत्यक्षपणे या संकल्पनेला महत्त्व दिलेले दिसते. १९५९ मध्ये हर्बर्ट हायमन यांनी Political Socialiation नावाचा ग्रंथ लिहून या विषयाकडे लक्ष वेधले. दुसऱ्या महायुद्धानंतर ही संकल्पना राज्यशास्त्रात मोठया प्रमाणावर अभ्यासली जाऊ लागली आहे. या संकल्पनेची उपयुक्तता लक्षात आल्याने ह्या संकल्पनेचे महत्त्व आधुनिक काळात वाढत आहेत. त्यांची कारणे पुढील प्रमाणे

१) **राजकीय व सामाजिक व्यवस्थेतील दुवा-** मानवाचे राजकीय वर्तन व सामाजिक वर्तन यांचा परस्पराशी संबंध असतो. त्यांचा एकमेकावर प्रभाव पडतो. म्हणून मानवाचे राजकीय वर्तन समजून घेण्यासाठी त्यांचे सामाजिक वर्तन विचारात घेणे आवश्यक असते. तसेच राजकीय व्यवस्थेची उभारणी सामाजिक व्यवस्थेवर झालेली असते. कोणत्याही देशाच्या राजकारणाचा पाया सामाजिक परिस्थितीतून विकसित होत असतो. कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, जात, वर्ण इत्यादी सामाजिक घटकाचा राजकीय वर्तनावर प्रभाव पडत असतो. याचा अर्थ राजकीय कृतीवर सामाजिक कृतीचा प्रभाव पडत असतो. या परस्परसंबंधित कृतीचे अध्ययन करण्यासाठी राजकीय सामाजीकरणाचा उपयोग होत असतो.

२) **आंतरशास्त्रीय दृष्टिकोन-** सामाजिक शास्त्राचा अभ्यास करतांना आधुनिक काळात आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा अवलंब केला जातो. समाजशास्त्र व राज्यशास्त्र हे दोन्ही महत्त्वाची सामाजिक शास्त्रे आहेत. या दोन्ही शास्त्राचा परस्पराशी असलेला संबंध समजून घेण्यासाठी राजकीय सामाजिकरण प्रक्रियाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

३) **राजकीय वर्तनाचा अभ्यास-** एखादी व्यक्ती जेव्हा राजकीय वर्तन करते. त्या वर्तना मागची मनोभूमिका समजून घेणे आवश्यक असते. ही मनोभूमिका समजून घेण्यासाठी त्या व्यक्तीचे सामाजीकरण कसे झाले याचा अभ्यास करावा लागतो. त्यासाठी राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया अभ्यासाने गरजेचे आहे. मानवाचा राजकीय सहभागामागण्या कारणांचा शोध राजकीय सामाजीकरण प्रक्रियेच्या माध्यमातून करता येतो.

४) **राजकीय बदलाचे आकलन-** बदल आणि परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृति रचनेमुळे राजकीय रचनेत बदल होत असतात. हे राजकीय बदल कोणत्या मार्गाने होत असतात, बदलाची गती किती आहे, बदल योग्य मार्गानी होत आहेत की नाही, बदलातून समाजव्यवस्थेत होणारे फायदे इत्यादी साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकीय सामाजीकरण प्रक्रियेच्या मदतीने राजकीय बदलाचे आकलन करता येते.

५) **राजकीय व्यवस्थेचा अभ्यास-** राजकीय व्यवस्था कालसापेक्ष असते. तिच्यात काळाप्रमाणे बदल होत असतात. ते बदला का झाले, कोणी घडवून आणले, या बदलामुळे व्यवस्थेवर काय परिणाम झाला या प्रश्नाची उत्तरे राजकीय सामाजीकरणाच्या अध्ययनातून मिळत असतात. म्हणून ही प्रक्रिया अभ्यासणे आवश्यक असते.

६) **राजकीय सहभागाची निर्मिती-** लोकशाही प्रशासनात व्यक्तीचा सहभाग असणे गरजेचे आहे. राजकीय सामाजीकरण प्रक्रियेच्या माध्यमातून राजकीय संस्काराची पेरणी करून जनतेला राजकीय दृष्टया कृतिप्रवण

करता येते हे कृतिप्रवण नागरिक राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात म्हणून राजकीय सामाजीकरण प्रक्रियेतून राजकीय सहभागाला चालना मिळत असते.

**७) राजकीय व्यवस्थेच्या स्थैर्य आकलन-** प्रत्येक देशात स्वत:ची अशी राजकीय व्यवस्था असते. काही ठिकाणी ती अल्पकाळ टिकते तर काही ठिकाणी दीर्घकाळ टिकते असे का घडते या कारणाचे आकलन राजकीय सामाजीकरण प्रक्रियेतून होऊ शकते. उदा. पाकिस्तान लोकशाही स्थिर होऊ शकली नाही यांचे कारण पाकिस्तानातील मुस्लिम लीग व इतर पक्षांनी ब्रिटिश काळात टाकलेल्या बहिष्कारामुळे लोकशाही प्रक्रियेविषयी आस्था निर्माण होऊ न शकल्यामुळे तेथे लोकशाहीला यश मिळू शकले नाही. म्हणून कोणत्याही राजकीय व्यवस्थेच्या स्थैर्याचा अभ्यास राजकीय सामाजीकरण प्रक्रियाद्वारे केला जाऊ शकतो.

**टिप- राजकीय सामाजीकरण आणि राजकीय संस्कृती परस्परसंबंध-**

राजकीय संस्कृती आणि सामाजीकरण हे परस्परांशी संबंधित आहे. राजकीय संस्कती सतत बदलत असते. हे बदल राजकीय सामाजीकरण प्रक्रियेमुळे होतात. राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य आणि सातत्य राजकीय संस्कृती आणि तिच्या विकासावर अवलंबून असते. राजकीय स्वरूप ठरविणारी आणि जडणघडण करणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजीकरण होय. राजकीय संस्कृती मध्ये बदल घडवून आणणारी आणि तिला स्थैर्य देणारी ही प्रक्रिया आहे. या प्रक्रियेद्वारे संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे राजकीय ज्ञानाचे संक्रमण केले जाते. सामाजीकरणामुळे व्यक्तीला राजकारणाविषयी ज्ञान प्राप्त होते. त्या ज्ञानातून व्यक्तीची राजकीय मते तयार होतात. त्या मतातूनच राजकीय संस्कृती आकार घेत असते. आज जगात प्रत्येक देशाची राजकीय संस्कृती भिन्न भिन्न दिसून येते. कारण त्या संस्कृतीला आकार देणारी राजकीय सामाजीकरणाची प्रक्रिया प्रत्येक देशात वेगवेगळी असते. देशाच्या राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणावयाचा असेल तर त्या देशातील राजकीय सामाजीकरणाच्या प्रक्रियेत बदल घडवून आणावा लागेल. कारण राजकीय सामाजीकरणावर राजकीय संस्कृती निश्‍चित होत असते. आल्मंडच्या मते राजकीय संस्कृती व संस्कृतीची संरचना टिकवून धरण्याच्या दृष्टीने व लोकात नवीन मूल्यव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण असते.

राजकीय सामाजीकरण ही राजकीय संस्कृतीचे स्वरूप ठरविणारी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. ज्या प्रक्रियेमुळे व्यक्ती राजकीय व्यवस्थेशी परिचित होते. राजकारणाचे विषयी ज्ञान प्राप्त होते. या ज्ञानावरून व्यक्तीच्या प्रतिक्रिया ठरत असतात. याचा अर्थ राजकीय संस्कृतीला आकार देण्यास राजकीय सामाजीकरणाची मदत होत असते. राजकीय संस्कृती आणि राजकीय सामाजीकरण परस्पर संबंधित आहे. राजकीय संस्कृती ही सतत बदलत असते. समाजातील बदलाबरोबर असते. हे जे बदल होतात त्याचे मुख्य कारण राजकीय सामाजीकरण होय. राजकीय संस्कृतीत होणारे बदल आणि स्थैर्य हे सुद्धा राजकीय सामाजीकरणामुळे घडते. एखादया देशातील राजकीय संस्कृतीचे स्वरूप निश्‍चित समजून घ्यायचे असेल तर राजकीय सामाजीकरणाचा अभ्यास करणे आवश्यक असते. एखादया देशाची राजकीय संस्कृती अशीच का आहे तशीच हा नाही. हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तरे शोधण्यासाठी राजकीय सामाजीकरणाचा विचार आवश्यक आहे. राजकीय सामाजीकरण हे राजकीय संस्कृतीचे स्वरूप ठरविणारी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. ज्या प्रक्रियेमुळे व्यक्तीला राजकारणाबद्दल आवड वा ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे राजकीय संस्कृती आणि राजकीय सामाजीकरण सोबत अभ्यास करणे आवश्यक आहे.

**राजकीय व्यवस्था आणि राजकीय सामाजीकरण-**राजकीय व्यवस्था कालसापेक्ष असते. राजकीय व्यवस्थेत काळाप्रमाणे नेहमी बदल होत असतात. ते बदल कोणी घडवून आणले. त्या बदलाचा व्यवस्थेवर काय परिणाम झाला इ. प्रश्नांची माहिती घेण्याकरिता राजकीय सामाजीकरण प्रक्रियेची मदत घ्यावी लागते. एखादी राजकीय व्यवस्था काळाच्या ओघात नष्ट का झाली. उदा.रशियाचा साम्यवाद कोसळला हे समजून घेण्यासाठी सामाजीकरणाच्या अध्ययनाची गरज आहे. कारण जनतेच्या मनावर ताण ठेवून सत्ता उपभोगण्याची प्रवृत्ती राजकीय नेत्यात दिसून येते. म्हणून लोकांची राजनिष्ठा वाढावी याकरिता विशिष्ट राजकीय संस्कार राजकीय व्यवस्थाकडून केले जातात. अनेक राजकीय व्यवस्था स्वत:चे स्थैर्य टिकविण्यासाठी प्राचीन काळापासून प्रयत्न करतांना दिसतात. उदा. प्लेटोचा आदर्श नागरिक निर्माण

करण्यावर भर होतो. कारण राजकीय व्यवस्थेत घडणाऱ्या घटना राजकीय नियम व कायदयाप्रमाणे घडत नसतात. प्रत्यक्षात राजकीय वर्तन नेते वा शासकाच्या श्रद्धा व मूल्यावर अवलंबून असतात जर राजकीय व्यवस्थेची संस्थात्मक चौकट नागरिकांच्या प्रवृत्तीशी जुळणारी नसेल तर ती टिकून राहत नाही. उदा. पाकिस्तानातील नागरिकांची मनोवृत्ती लोकशाहीला अनुकूल नसल्यामुळे तेथे लोकशाही दीर्घकाळ टिकत नाही. प्रत्येक राजकीय व्यवस्था आपल्याला अनुकूल मनोवृत्ती निर्माण करण्यासाठी सामाजीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून प्रयत्न करते. उदा. रशियात साम्यवाद असतांना लहानपणापासून शाळेत मुलांना साम्यवादाचे संस्कार केले जात. राजकीय व्यवस्थेबद्दल आपलेपणा निर्माण करण्यासाठी सामाजीकरणाचा वापर केलो जातो. कारण राजकीय व्यवस्थेस अनुकूल प्रवृत्ती जनतेत निर्माण झाल्यास राजकीय व्यवस्थेस स्थैर्य लवकर प्राप्त होते. म्हणून नव्याने उदयास आलेल्या देशात जनतेचे राजकीय सामाजीकरण घडवून आणण्याकरिता विशेष प्रयत्न केले जातात. कारण या प्रक्रियेवर व्यवस्थेचे स्थैर्य वा अस्थैर्य अवलंबून असते. राजकीय सामाजीकरण नीट न झाल्यास राजकीय व्यवस्था नष्ट होण्याचा धोका असतो .म्हणून प्रत्येक राजकीय व्यवस्थेला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी राजकीय सामाजीकरण प्रक्रियेचा आधार ध्यावा लागतो.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे**

१. राजकीय सामाजीकरणाचे दोन प्रकार सांगा.
उत्तर- राजकीय सामाजीकरणाचे औपचारिक व अनौपचारिक सामाजिकरण, संस्थात्मक व बिगर संस्थात्मक आणि सुप्त व उघड सामाजीकरण हे प्रकार सांगता येतात.

२. राजकीय सामाजीकरणाची दोन माध्यमे कोणती?
उत्तर- राजकीय सामाजीकरणाची कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, राजकीय पक्ष आणि प्रसार माध्यमे ही माध्यमे होत.

३. अप्रत्यक्ष राजकीय सामाजीकरण म्हणजे काय?
उत्तर -अप्रत्यक्ष राजकीय सामाजीकरण म्हणजे जे सामाजीकरण करण्यासाठी हेतूपुरस्कर प्रयत्न केले जात नाही. कळत नकळतपणे वा अचानक एखादया प्रसंग वा घटनेतून सामाजीकरण घडते त्यास अप्रत्यक्ष राजकीय सामाजिकरण असे म्हणतात.

४. राजकीय सामाजीकरणाची दोन वैशिष्टये लिहा.
उत्तर- राजकीय सामाजीकरण ही सतत घडणारी प्रक्रिया आणि अनुभवजन्य प्रक्रिया आहे. तसेच राजकीय सामाजीकरण हे सुप्त वा उघड स्वरूपातील चालणारी प्रक्रिया असून ती एक संस्कार क्रिया आहे.

५. राजकीय सामाजीकरण म्हणजे काय?
उत्तर - डेव्हिड ईस्टनच्या मते व्यक्तीचा राजकीय पिंड घडवणारी आणि व्यक्तीला राजकारणाबद्दल ज्ञान प्राप्त करून देणारी प्रक्रिया तसेच आयुष्याच्या प्रत्येक अवस्थेत प्राप्त होणारे ज्ञान म्हणजे राजकीय सामाजीकरण होय.

६. राजकीय सामाजीकरणाची आवश्यकता का असते ते सांगा.
उत्तर- राजकीय वर्तन, राजकीय व्यवस्थेचा अभ्यास, राजकीय बदलाचे आकलन, राजकीय व्यवस्था स्थैर्याचे आकलन करण्यासाठी राजकीय सामाजीकरणाची आवश्यकता आहे.

७. राजकीय सामाजीकरणाची प्राथमिक साधने कोणती?
उत्तर- कुटुंब संस्था आणि शिक्षणसंस्था ही राजकीय सामाजीकरणाची प्राथमिक साधने आहेत.

८. सुप्त राजकीय सामाजीकरण म्हणजे काय?
उत्तर- जे राजकीय सामाजीकरण व्यक्तीच्या कळतनकत वा आपोआप घडत असते. ते घडवून आणण्यासाठी हेतूपुरस्कर प्रयत्न करत नाही त्यास सुप्त व गुप्त स्वरूपातील राजकीय सामाजीकरण असे म्हणतात.